Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

Approved [illegible] & Berar.

मराठी चवथें पुस्तक

66म
१० ध

प्रकाशक—
सी. [illegible] न्युकेशनल बुकडेपो, जबलपूर, नागपूर, अमरावती.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

❀ ओ३म् ❀

पुस्तक-संख्या ..... 66 म / १०८

पंजिका-संख्या २११०६/२३.२.२००२

पुस्तक पर सर्व प्रकार की निशानियां लगाना वर्जित है । कोई महाशय १५ दिन से अधिक देर तक पुस्तक अपने पास नहीं रख सकते। अधिक देर तक रखने के लिये पुनः आज्ञा प्राप्त करनी चाहिये ।

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मध्यप्रांतांतील प्राथमिक शाळांकरिता मंजूर झालेली.

सुलभ वाचनपाठमाला

मराठी चवथें पुस्तक

CHECKED 1973

संपादक

गंगाधर गोविंद कानेटकर, एम्. ए.

प्रोफेसर, स्पेन्स् ट्रेनिंग कॉलेज, जबलपूर.

ब. पं. तांदळे.

शिक्षक, बेसिक नॉर्मल स्कूल, वर्धा.

स्टाक प्रमाणीकरण १२-४-१९८५

प्रकाशक

एज्युकेशनल बुकडेपो.

जबलपूर, नागपूर, अमरावती.

66 म

२१९०६ 22.3.52

१०(व)

आवृत्ति आठवी] किंमत ०-५-९ [सन १९४३

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

हें माझें पुस्तक आहे.

नांव.....

शाळा.....

मुक्काम.....

पोष्ट.....

तहसील.....

जिल्हा.....

प्रांत.....

देश.....

माझें वजन.....

मांझी उंची.....फू.....इं.

माझी छाती.....इंच.

माझी जन्म तारीख.

..... | ..... | .....

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

प्रस्तावना

प्रस्तुत वाचनपाठमाला मध्यप्रांतांतील प्राथमिक शाळांच्या पहिल्या चार वर्गांकरितां खास रचण्यांत आली आहे. मध्यप्रांतांत सन १९२६ सालापासून आतांपर्यंत चालू असलेली "सामान्यज्ञानप्रवेशिका" भाग १-२ हीं पुस्तकें स्वतंत्र स्वरूपांत पुरवणी पाठ्यपुस्तकें म्हणून यापुढे चालू राहूं नयेत, व त्यांमधील प्रमुख विषयांचा समावेश होतां होईतों एकाच वाचनपाठमालेंत व्हावा, असा इ. स. १९३० सालीं नेमलेल्या कमिटीने अभिप्राय दिला; त्या अभिप्रायास अनुसरून भाषाज्ञान, चारित्र्यसंवर्धन, मानवी स्वभावाचें दिग्दर्शन याबरोबरच भोवतालच्या परिस्थितीचें ज्ञान देणारे पाठही प्रस्तुत पुस्तकांत घातले आहेत.

पाठ सुलभ व मनोरंजक होतील अशी शक्य तितकी काळजी घेतली आहेत. इंग्रजींतील उत्कृष्ट बालवाङ्मय व शालोपयोगी क्रमिक पाठ्यपुस्तकें याचें अवलोकन करून त्यांतील उपयुक्त कल्पनांचा होईल तितका उपयोग प्रस्तुत मालेंत करण्याचा यत्न केला आहे. तो कितपत साधला आहे. हें ठरविण्याचा अधिकार तज्ज्ञांचा आहे.

अलीकडे मराठींत चांगलें बालवाङ्मय निर्माण होऊं लागलें आहे. ही अभिनंदनीय गोष्ट आहे. अशा बालोपयोगी

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

गद्य व पद्य वाङ्मयांतून उत्कृष्ट उतारे देण्याचा उपक्रमहि प्रस्तुत मालेंत केला आहे. या प्रयत्नास उदारपणें साहाय्य करणारे कवि, लेखक व प्रकाशक या सर्वांचा संपादक आभारी आहेत. नवीन रचना करतांनाहि जुन्यांतील उत्कृष्ट वाङ्मयाकडे दुर्लक्ष होतां कामा नये, असें प्रस्तुत संपादकांचें मत आहे. त्यास अनुसरून मुंबईकडील जुनीं वाचनपुस्तकें व या प्रांतांतील जुनीं वाचनपुस्तकें यांमधील कांहीं पाठ मे. डिसिल्व्हा साहेब यांच्या अभ्यासक्रमाप्रमाणें नवीन शब्दांचा उपयोग करून व पाठाचे शेवटी नवीन पद्धतीचे प्रश्न घालून तयार केले आहेत. खरें चांगलें वाङ्मय जुनाट व टाकाऊ असें कधींच होत नाहीं. यामुळे ही सुधारलेली नवीन आवृत्ति विद्यार्थ्यांना आणि शिक्षकांना अधिक आवडेल अशी आशा आहे.

संपादकद्वय.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सुलभ वाचनपाठमाला

चवथें पुस्तक

अनुक्रमणिका

	धड्याचें नांव		पृष्ठ
१	ईशस्तवन (कविता)—म. कृ. गोळवेळकर	...	१
२	पोट आणि अवयव	...	२
३	वेडकाची कहाणी	...	५
४	शूर बाबर	...	९
५	नकल्या आणि कुणबी	...	१३
६	उद्योग व नशीब (कविता)—रामदास	...	१६
७	अंद्रोक्लीस आणि सिंह	...	१७
८	दगडी कोळसा	...	२१
९	मिताहार व व्यायाम (भाग १ ला)	...	२५
१०	„ „ (भाग २ रा)	...	२९
११	रामशास्त्री प्रभुणे	...	३१
१२	सीतागीत (कविता)—मोरोपंत	...	३५
१३	वाघ व सिंह	...	३९
१४	ताजमहाल	...	४३
१५	नागपूरची सफर (पत्र १ लें)	...	४६

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

१६	नागपूरची सफर (पत्र २ रें)	...	५०
१७	शबरीगीत (कविता)—बा. गो. मायदेव	...	५४
१८	कर्जापायीं बेजार झालों	...	५६
१९	सहकारी पेढ्या	...	६०
२०	थोरले बाजीराव पेशवे (भाग १ ला)	...	६४
२१	,, ,, (भाग २ रा)	...	६७
२२	चहा	...	७०
२३	स्फुट अभंग (कविता)—तुकाराम	...	७६
२४	खलीफाचें न्यायचातुर्य (भाग १ ला)	...	७८
२५	,, ,, (भाग २ रा)	...	८१
२६	मी श्रीमंत कसा झालों ?	...	८४
२७	बालवीर	...	८९
२८	रबर	...	९५
२९	दोन देणग्या	...	९९
३०	चिमणा सरदार (कविता)— भ. श्री. पंडित		१०४
३१	शेतकीचें प्रदर्शन (भाग ला)	...	१०६
३२	,, ,, (भाग २ रा)	...	१०९
३३	देवी अहल्याबाई होळकर	...	११४
३४	कोलंबस	...	१२०
३५	द्रौपदी व सत्यभामा	...	१२६
३६	स्फुट श्लोक (कविता)—वामन पंडित	...	१३०
३७	हजरत महंमद पैगंबर	...	१३२
३८	हॉस्पिटल	...	१३५

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

३९	लवाड कोल्हा व भोळसट हरण	...	१४०
४०	कांही साथीचे रोग	...	१४६
४१	अन्योक्तिसंग्रह (कविता)	...	१५२
४२	वाघाची शिकार	...	१५३
४३	घोषयात्रा	...	१५९
४४	दळणवळणाचीं साधनें	...	१६२
४५	सृष्टि-ज्ञान व यंत्रांचा उपयोग	...	१६७
४६	बालभक्त प्रह्लाद (भाग १ ला)	...	१७३
४७	,, ,, (भाग २ रा)	...	१७६
४८	कसें हो साधतें तुम्हांला हें बाई ?	...	१८०
४९	केवढें कौर्य हें! कविता)—ना. वा. टिळक	...	१८४
५०	भेडाघाटची यात्रा (भाग १ ला	...	१८६
५१	,, ,, (भाग २ रा)	...	१८९
५२	म्युनिसिपॉलिटी	...	१९३
५३	अश्वत्थामा व कर्ण	...	१९९
५४	गुराख्याचें गाणें (कविता)—भा. रा. तांबे	...	२०६
५५	सती सावित्री (भाग १ ला)	...	२०८
५६	,, ,, (भाग २ रा)	...	२११
५७	जन्मभूमि (कविता)—वासुदेवशास्त्री खरे	...	२१६
५८	हा हिन्द देश माझा ! (कविता)—आनंदराव टेकाडे		२१७

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सुलभ वाचनपाठमाला

मराठी चवथें पुस्तक



धडा १ ला

ईशस्तवन

पद

प्रभुकीर्तिगान मधुर सकल सृष्टि करितसे
महिमा जगांत धवल भरुनि रम्य किति दिसे ॥१॥
उत्फुल्ल नील कमल विमल शोभतें सरीं
तव चरणीं कुसुमवृष्टि सृष्टि ही करी ॥२॥
रचनेस तुझ्या सतत विभो ! दाविती रवी
गगनांत चंद्र तेंवि तुझी प्रकटि थोरवी ॥३॥
अति मंद वात सुटुनि कुसुमगंध दरवळे
हा गंध नसुनि यशचि तुझें पसरलें कळे ॥४॥

म. कृ. गोळवेलकर.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

धडा २ रा

पोट आणि अवयव

प्राचीन काळीं रोमन लोकांत श्रेष्ठ व कनिष्ठ वर्गांत हक्कांबद्दल झगडा सुरू होता. वारंवार युद्धप्रसंग पडल्यामुळे गरीब लोक करांच्या ओझ्याखाली दडपून गेले. आम्हांला हक्क मुळीच नाहीत व कर मात्र आम्ही द्यावयाचे, हा न्याय कोठला ? असें ते म्हणूं लागले; व याउपर आम्ही सरकारदेणें मुळीच देणार नाही. असें त्यांनी साफ सांगितलें.

या आणीवाणीच्या प्रसंगीं नागरिकांची समजूत घालण्याकरितां रोमनसरकारने अँग्रिपा नांवाच्या शाहाण्या मुत्सद्द्यास पाठविलें. तो लोकांस जाऊन भेटला व म्हणाला, "गड्यांनो, मी तुम्हांस एक गोष्ट सांगतों ती ऐका. कोणे एके काळीं हात, पाय इत्यादि अवयव हे पोटावर रुसले. ते म्हणूं लागले की, आम्हीं मोठे श्रम करून मिळवावें आणि ह्या पोटाने रिकामें बसून खावें, हें रास्त आहे काय ? त्या अवयवांचीं दुःखें जिभेने मोठ्या युक्तीने तिखटमीठ लावून वर्णिलीं, ती म्हणाली, 'अहो, हे हात पाय खपून व श्रम कष्ट भोगून जें मिळवितात, तें सारें ह्या पोटाकडे जातें. हें पोट तर कांहीच काम करीत नाही व ह्या पासून आम्हांला कांहीच लाभ नाही;असें असतां,आम्हीच सर्वदा ह्याची भर करावी, हा आम्हांवर मोठा जुलूम आहे !' तें भाषण ऐकून सर्व अवयवांनी तिची वाहवा केली. हात लाग-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

लेच म्हणाले, "इतःपर पोटाकरितां आम्ही कोणत्याहि कामास बोट लावणार नाही.' पाय म्हणाले, 'ह्या पोटाचें ओझें आज पर्यंत आम्ही वाहत आलों, तें आता वाहणार नाही,' दात म्हणाले, 'ह्याच्याकरितां ह्यापुढे आम्ही एक घासहि चावणार नाही.' हें त्यांचें बोलणें ऐकून पोट म्हणालें, 'बाबांनो, तुम्ही असा वेडेपणा करूं नका ! जें करणें तें विचारपूर्वक करा. तुम्ही मला जें काय काय आणून देतां, तें मीच मात्र भोगतों असे नाही, तर तुमच्या सर्वांच्या पोषणासाठी मी जिकडे तिकडे तें वांटून देतों.' अशी त्याची त्याने पुष्कळ समजूत केली, पण ती वायां गेली. कां तर क्रोधादिकांच्या आवेशापुढे बुद्धीचें कांही चालत नाही. शेवटी अवयवांकडून पोटास कांही मिळेनासें झाल्यामुळे पोट अगदीं कृश होऊन शरीराचा अस्थिपंजर मात्र उरला. पोटाकडून अवयवांचें पोषण न झाल्यामुळे तेहि अर्थात् अशक्त झाले. अशी जेव्हा त्यांची अवस्था झाली, तेव्हा त्यांस पश्चात्ताप होऊन ते पूर्वीप्रमाणे पोटाकरितां आपापलीं कामें करण्यास राजी झाले, पण आता राजी होऊन उपयोग काय ? कारण पश्चात्ताप फार उशीरा झाल्यामुळे तोंपर्यंत सर्व शरीराची नासाडी होऊन गेली होती; शेवटी, ह्या त्यांच्या अविचारा-मुळे देहास मरण येऊन सर्व अवयवांचा नाश झाला !"

ही गोष्ट सांगून अँग्रिपा म्हणाला, "मित्र हो, मी सांगितलेल्या गोष्टीवरून तुम्हांस कळून येईल की, प्रजेने सरकारास पट्टीचा पैसा देण्याविषयी अनमान करणें हा मोठा वेडेपणा होय. प्रजेने सरकारास पैसा न दिला, तर त्याकडून

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

प्रजेचें संरक्षण कसें होईल ? देशांत दंगेधोपे होतील; चोर दिवसा दरवडे घालतील व कोणी कोणाचें ऐकणार नाही. असें होऊन शेवटी सरकार आणि प्रजा ह्यांचा एकदमच नाश होईल. ह्याकरितां तुम्ही असा वेडेपणा करूं नका."

ॲग्रिपाचें हें भाषण ऐकून त्या लोकांची समजूत झाली; व सरकारास कर द्यावयाचा नाही असा जो त्यांचा बेत होता, तो त्यांनी सोडून दिला.

प्रश्न

(१) चूक किंवा बरोबर हें लिहा.

(१) दात म्हणाले, मी पोटाकरितां अन्न चावणार नाही . .....

(२) शरीराची नासाडी होऊन गेली.....

(२) खालील शब्दांचा वाक्यांत उपयोग करा.

दंगेधोपे, दरवडे, नागरिक, रास्त.

(३) स्मृति चांचणीः—

(१) रोमन लोकांत कशासाठीं भांडण सु ' होतें ?

(२) लोकांनी सरकारास कर कां द्यावा ?

(३) सरकार देणें दिलें नाही तर कोणतें नुकसान होईल ?

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

धडा ३ रा

बेडकाची कहाणी

"मुलांनो, मी माझी कहाणी तुम्हांस सांगणार आहें." असें म्हणून बेडकानें ती सांगण्यास प्रारंभ केला.

मी प्रथम अंड्यांत होतों. अंड्यांतून जेव्हा मी बाहेर पडलों, तेव्हा मी अगदी लहान होता. त्यावेळीं मला डोके व शेपूट हे दोनच अवयव होतों. त्यावेळीं माशांप्रमाणे मी नेहमी पाण्याच्या डबक्यांतच राहत असे. मला दोन कल्ले होते. त्यांना मला पाण्यांत श्वासोच्छ्वास करतां येई व चांगलें पोहतां पण येत असे.

मी जरी अगदी लहान होतों तरी पोटाकरितां मी कोणाच्या तोंडाकडे पाहत नसे, माझा मीच आपलें भक्ष्य मिळवीत असे. माझें भक्ष्य साधेंच असे. बहुतकरून मी मांस खात नसे; कारण मांसभक्षक प्राण्यांप्रमाणे मला सुळे दात वगैरे कांही नव्हतें. पाण्यांतल्या झाडाझुडपांचे कोवळे कोवळे कोंब खाऊन मी स्वस्थ असे. मात्र मोठ्या माशांची मला फार भीति वाटे; कारण, ते मला केव्हा गट्ट करतील ह्याचा नेम नसे. माझ्या हातून मात्र ह्या स्थितींत हत्येचें पातक घडत नसे, त्यामुळे मला समाधान वाटे, ह्याप्रमाणे पांच सहा आठवडे मीं सुखाने काढले.

पुढे एके दिवशीं माझ्या शेपटाच्या दोन्ही बाजूंस दोन गाठी आल्या. मला रोग झाला की काय म्हणून मी घाबरलों. तों डोक्याच्या खाली आणखी दोन गाठी आल्या. तेव्हा मला

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

भीति वाटली. पण एवढ्यानेच झालें नाहीं. माझी शेपटी हळू हळू झडत चालली. तेव्हा तर माझी गाळणच उडाली ! व आता माझ होणार तरी काय, अशी मला मोठी धास्ती पडली !



पण इतक्यांत मला ज्या चार गाठी आल्या होत्या, त्यांतून हळू हळू चार पाय बाहेर आले. माझ्या पुढल्या पायांना चार चार व मागल्या पायांना दोन दोन बोटें होतीं, हीं बोटें एका पातळशा कातडीने एकमेकांस जोडलीं होतीं. यामुळे मला पोहतां येणें शक्य झालें व माझी काळजी दूर झाली. पण माझे कल्ले झडून गेल्याने पाण्यांत मला गुदमरल्यासारखें होऊं लागलें. म्हणून मी डबक्याच्या बाहेर येऊं लागलों, तेव्हा मला बरें वाटलें. मला आजपर्यंत पाण्यांतून हवा काढून घ्यावी लागे, ती आता मला फुप्फुसांनी सहज घेतां येऊं लागली. तरी पण मला

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पाण्यांत राहणेंच आवडतें; कारण माझें रक्त माशाच्या रक्ताप्रमाणे थंड असतें.

बाहेर येऊन श्वासोच्छ्वास करतां येऊं लागला खरा; पण इतर जनावरांप्रमाणे मला चालतां येईना, म्हणून मला फार वाईट वाटलें. इतक्यांत माझ्या पुढून एक किडा गेला, त्याला धरण्याकरितां मीं टुणदिशी उडी मारली ! तेव्हा मागच्या लांब पायांचा उपयोग माझ्या लक्षांत आला. नंतर मी आपली लांब व चिकट जीभ बाहेर काढून तो किडा पकडला व सगळाच गिळून टाकला ! माझ्या वरल्या जाभाड्यांत दात आहेत, पण त्यांनी मला चावतां येत नाही; म्हणून मी आपलें भक्ष्य सगळेंच गिळतों. माझा जबडा केवढा तरी मोठा ! तसेंच माझें डोकें मोठें व डोळेहि बटबटीत आहेत. हें माझ्या अंगावरील कातडें मी उन्हाळयांत काढतों व त्यांचा गोळा करून गिळून टाकतों.

आम्ही अंडी घालतों. पशु जमिनीवर राहतात. तसे आम्हीहि जमिनीवर केव्हा केव्हा असतों. मासे पाण्यांत पोहतात तसे आम्ही पण पाण्यांत पोहतों. किड्यांचीं तीन चार स्थित्यंतरें होतात. तशीं आमचींहि होतात. उन्हाळयांत विहिरी व तळां आटून गेलीं, म्हणजे आम्हांस खाण्यापिण्यास कांही मिळत नाही; म्हणून आम्ही खडकाच्या भेगांत स्वस्थ निजून राहतों; पण पाऊस पडूं लागला की, आम्ही डरांव डरांव करीत बाहेर येतों.

—आहे की नाही मौजेचें आमचें जीवन ?

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

प्रश्न

(१) कृतिपरः—

बेडकाचें चित्र काढा. बेडकासारख्या उड्या मारीत चला.

(२) रिकाम्या जागीं योग्य शब्द भरा.

(१) माझे डोळे.....आहेत.

(२) मी आपली.....व.....जीभ बाहेर काढतो.

(३) खरें किंवा खोटें हें सांगा.

(१) बेडकाच्या तीन अवस्था असतात.....

(२) बेडूक पाण्यांत व पाण्याबाहेर राहूं शकतो.....

(४) स्मृति चांचणीः—

(१) बेडूक खडकाच्या भेगांत कधी निजून राहतात ? कां ?

(२) बेडूक अंगावरील कातडी कधी काढून टाकतो ? व तिचें काय करतो ?

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

धडा ४ था

शूर बाबर

हिंदुस्थानांत मोंगलांचें साम्राज्य स्थापन करणारा पहिला पुरुष बाबर हा होय. त्याच्या बापाचें राज्य तुर्कस्थानांत होतें. पण तें चुलत्याने बळकावलें. तें परत मिळविण्यासाठी त्याने सतत वीस वर्षें प्रयत्न केला. सारख्या लढाया केल्या. उपासतापास काढले; कित्येकदा तर अगदी उघड्या मैदानांत नुसत्या जमिनीवरच त्याला रात्र कंठावी लागली; तरी अखेरीस त्यास यश आलें नाही. तेव्हा तुर्कस्थान सोडून तो काबूलकडे आला व तेथे त्याने आपलें राज्य स्थापन केलें.

बाबर शरीराने दांडगा, मनाने शूर आणि दिलदार होता. याची ताकद एवढी होती की. दोन काखेंत दोन माणसें उचलून त्यांसकट किल्लयाच्या तटावरून तो दौड मारी! वाटेंत जी नदी लागेल ती तो पोहून जाई. त्याचें खरें नांव जही-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

रुद्दीन महंमद असुं होतें. त्याचें शौर्य व धाडस पाहून त्याला बाबर-म्हणजे सिंह-असें टोपण नांव पडलें; तेंच प्रसिद्ध आहे.

काबुलास असतांच त्याने हिंदुस्थानच्या अलोट संपत्तीची व सुपीकपणाची कीर्ति ऐकली व संधि साधल्यास हा प्रदेश जिंकावा अशी इच्छा त्याच्या मनांत उत्पन्न झाली. त्याच्या सुदैवाने त्यास तशी संधि लवकरच मिळाली. दिल्लीचा सुलतान इब्राहिम लोदी याच्या उर्मट स्वभावास पुष्कळ सरदार कंटाळले होते. यांपैकी एकाने त्यास हिंदुस्थानावर स्वारी करण्याची कल्पना सुचविली. बाबर ताबडतोब आला. पानिपतच्या प्रसिद्ध मैदानावर इब्राहीमच्या सैन्याचा पुरता मोड करून त्याने दिल्लीचें राज्य मिळविलें. (इ. स. १५२६.)

पण बाबरची खरी परीक्षा अद्याप व्हावयाचीच होती. मेवाडचा शूर राणा संग (संग्रामसिंह) याने सर्व राजपुताना व माळवा यांवर आपलें वर्चस्व वसविलें होतें. दिल्ली येथील मोडकळीला आलेलें राज्य बुडवून हिंदूंचें साम्राज्य तेथे पुनः स्थापावें. असा राणा संगाचा बेत होता. इतक्यांत बाबरसारख्या परकीय शत्रूने येऊन तें काबीज करावें याचा त्याला फार त्वेष आला. त्याने बाबरास हाकलून देण्याची जंगी तयारी केली. उभय सैन्यांची गाठ आग्र्याच्या पश्चिमेस सिक्रीच्या मैदानांत पडली. रजपुतांच्या निकराच्या हल्ल्यामुळे बाबरच्या फौजेने कच खाल्ला व लढाई आता हातची जाते असें त्यास वाटूं लागलें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

बाबरने अंतःकरणपूर्वक ईश्वराची प्रार्थना केली. बाबर मद्यपानाचा फार शौकी होता या आणीबाणीच्या प्रसंगीं त्याच्या मनाने असें घेतलें की, पवित्र कुराणाच्या आज्ञेविरुद्ध आपण मद्यपान करतों, म्हणूनच आपणास ईश्वर यश देत नाही. त्याने शपथ घेतली की, इतःपर मी दारूला स्पर्श देखील करणार नाही. त्याने जवळचीं दारूचीं सर्व पिपें जमिनीवर ओतून दिलीं व सोन्याचांदीच्या मद्यपात्रांचे तुकडे तुकडे करून त्याची खैरात केली. मग त्याने शत्रूवर असा निकराचा हल्ला केला की, गेलेली जयश्री परत आली व शत्रूची दाणादाण झाली ! या जयाच्या स्मरणार्थ बाबरने सिक्रीस 'फत्तेपूर सिक्री' असें नांव दिलें.

पुढे त्याचा वडील व लाडका मुलगा हुमायून फार आजारी पडला तो या दुखण्यांतून निभावणें कठीण असें दिसूं लागलें. बाबरला अत्यंत वाईट वाटलें; याला काय उपाय करावा, असें तो ज्यास त्यास विचारूं लागला. दरबारांतील एका भाविक माणसाने त्याला सुचविलें, "देवाची प्रार्थना करून आपणापाशीं असलेली सर्वांत अमूल्य अशी वस्तु जर आपण देवाला देऊं कराल, तर आपल्या मुलास देव वांचवील."

बाबर विचार करूं लागला. थोड्या वेळाने त्याच्या मनाचा निश्चय ठरला, तो बिछान्यापाशीं गेला व गुडघे टेकून त्याने देवाची प्रार्थना केली, "देवा माझ्या हुमायुनाचे प्राण वांचीव; मी तुला माझे प्राण अर्पण करतों." प्रार्थना आटोपल्यावर बाबर उठून उभा राहिला व हुमायुनाच्या अंथरुणाभोवती तीन

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

प्रदक्षिणा करून म्हणाला, "हां ! तें आलें आता मजकडे ! आलेंच !" याचा अर्थ असा की, हुमायुनाचें दुखणें गेलें व तें बाबरावर आलें ! देवाने बाबराची प्रार्थना ऐकली असें दिसतें; कारण त्या दिवसापासून हुमायून हळू हळू सुधारूं लागला व लवकरच बरा झाला. बाबर मात्र आजारी पडून क्षीण होत चालला व लवकरच त्याचा अंत झाला !

प्रश्न

(१) समानार्थी शब्द सांगा.

(१) संधि.....(२) वर्चस्व.....

(३) निकाराचा.....(४) भाविक.....

(२) चुकीचे वाक्य खोडा.

(१) बाबराने मद्यपान सोडून दिलें नाही.

(२) हुमायुनाचे दुखणें गेलें नाही.

(३) मद्यपान पिणें कुराणाच्या विरुद्ध आहे.

(३) स्मृति चांचणी:—

(१) बाबराचें चरित्र थोडक्यांत लिहा.

(२) बाबराने हिंदुस्थानांत राज्य कसें स्थापिलें ?

(३) बाबर हें नांव कसें व कां मिळालें ?

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

धडा ५ वा

नकल्या आणि कुणबी

रूस नांवाच्या राजधानींत एक मोठा धनवान शेठ होता. लोकांस तमाशा दाखवून व त्यांची करमणूक करून कीर्ति मिळवावी असें त्याच्या मनांत आलें, म्हणून त्याने शहरांत जाहीरनामा लाविला की, नवा उत्कृष्ट तमाशा कोणी दाखवील, तर त्यास मोठें बक्षीस मिळेल. ही बातमी पसरतांच बक्षिसाच्या लालचीने जिकडून तिकडून अनेक तमाशेवाले आले. त्यांमध्ये एक नकल्या आला होता. तो म्हणाला की, लोकांनी कधी पाहिला नाही असा तमाशा मी करून दाखवीन.

त्या नकल्याचा खेळ पाहावयास सगळें शहर लोटलें. रंगभूमींत चिकार गर्दी झाली. कितीकांस उभें राहावयासहि जागा मिळेना. मग तो नकल्या एकटा पुढें आला. त्याजवळ सामग्री वगैरे कांही नाही, हें पाहून त्याचेकडे लोक कौतुकाने पाहूं लागले. त्या नकल्याने आपलें मस्तक उरावर टेकून डुकराच्या पोराच्या कैंकण्याची नक्कल केली. ती इतकी हुबेहूब झाली की, खरोखरच डुकराचें पोर त्याच्या काखेंत आहे असें लोकांस वाटलें व त्यांनी त्याचा झाडा घेतला. जेव्हा त्याजपाशी कांही सापडलें नाही, तेव्हा लोकांनी त्याची खूप वाहवा केली.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

तेथे एक खेडवळ कुणबी बसला होता. तो हें पाहून म्हणाला की, "हा खेळ मला ह्याहून चांगला करतां येतो जर तुम्ही उद्यां सारे याल, तर मी तुमच्या समक्ष यावर ताण करून दाखवीन."

दुसऱ्या दिवशींहि तमाशा पाहावयास लोकांचे थवेच्या थवे लोटले. सर्वांची समजूत अशी होती की, पहिला नकल्या मोठा कसबी, त्याची स्तुति करावी; आणि दुसरा खेडवळ अडाणी, ह्याला काय येतें, म्हणून त्याची छीथू करावी. अशी सर्वांची तयारी होती. लोक जमल्यावर ते दोघे पुढे आले. त्यांतून पहिल्या नकल्याने पूर्ववत् डुकराच्या पोराच्या ओरडण्याची नक्कल करून पराकाष्ठेची शाबासकी मिळविली. त्याचा खेळ संपल्यावर खेडवळ नकल्या पुढे आला. त्याने डुकराचें पोर खरेंच अगोदर आपल्या घोंगडींत लपविलें होतें. तें कोणास न समजावें म्हणून तो किंचित् ओणवा झाला; व घोंगडींत हळूच हात घालून त्याने तें पोर केंकावूं लागेपर्यंत त्याचा कान दाबला. तेव्हा सर्वांनी एकच आरोळी केली की, पहिली नक्कल हुबेहूब झाली; ही दुसरी कांही चांगली उतरली नाही, असें म्हणून ते त्या कुणब्याची छी थू करूं लागले. तेव्हा त्याने घोंगडींतून डुकराचें पोर बाहेर काढून सर्वांस दाखवून म्हटलें, "गड्यांनो, तुम्ही भले गाजर पारखे दिसतां. वास्तविक डुकराच्या पोराचा जो शब्द तो न ओळखतां खोटा मानून, खोटा शब्द तो खरा व चांगला म्हणतां! अहाहा! काय तुमचा अक्कल!"

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

प्रश्न

(१) स्मृति चांचणी—

(१) रूम शहरांत लोकांची गर्दी कां झाली ?

(२) नकल्याने कोणती नक्कल केली ?

(३) खेडवळाने केलेली नक्कल लोकांना कां आवडली नाही ?

(२) वाक्यें बरोबर शुद्ध लिहा.

(१) सापडले जेव्हा कांही नाही त्याजपाशी.

(२) पूरवत सावाशकी मीळवली नक्कल करून ओरडण्याची डूकराच्या पोराच्या.

(३) चूक किंवा बरोबर हे लिहा.

(१) खेडवळ म्हणाला, मी यावर ताण नक्कल करून दाखवीन.....

(२) लोकांनी खेडवळाची नक्कळ पाहून त्याची वाहवा केली.....

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

धडा ६ वा

उद्योग व नशीब

पृथ्वीमध्ये लोक सकळ । एक संपन्न एक दुर्बळ ।
एक निर्मळ एक ओंगळ । काय निमित्तें ? ॥ १ ॥
कित्येक राजे नांदती । कित्येक दरिद्र भोगिती ।
कित्येकांची उत्तम स्थिति । कित्येक अधमाधम ॥ २ ॥
हे सकळ गुणांपाशीं गति । सगुण भाग्यश्री भोगती ।
अवगुणांस दरिद्रप्राप्ती । यदर्थी संदेह नाही ॥ ३ ॥
हें तों प्रकटचि असे । जनीं पाहतां प्रत्यक्ष दिसे ।
विद्येवीण करंटा बसे । विद्या तो भाग्यवंत ॥ ४ ॥
ऐका सदैवपणाचें लक्षण । रिकामा जावों नेदी क्षण ।
प्रपंच व्यवसायाचें ज्ञान । बरें पाहे ॥ ५ ॥
लहान थोर काम कांही । केल्यावेगळें होत नाही ।
करंट्या सावध पाही । सदैव होसी ॥ ६ ॥
म्हणोनि आळस सोडावा । यत्न साक्षेपें करावा ।
दुश्चित्तपणाचा मोडावा । थारा वळें ॥ ७ ॥

—रामदास.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

धडा ७ वा

अंद्रोक्लीस आणि सिंह

प्राचीन काळीं अंद्रोक्लीस या नांवाचा एक रोमन गुलाम आपल्या धन्याबरोबर उत्तर आफ्रिकेंत गेला होता. त्याचा धनी अत्यंत निर्दय होता. त्याने अंद्रोक्लीसाचे फार हाल केले. त्यामुळे त्यास जीव नकोसा झाला. तो एके दिवशीं मनांत म्हणाला, "अशा हल्लींच्या स्थितीपेक्षा एकदम मरण आलेलें बरें ! काय होईल ते होवो, पण अशा माणसांपेक्षा जंगलांतील जनावरांवर भरंवसा ठेवावा. व येथून पळून जावें."

असा निश्चय करून तो एके दिवशीं धन्याच्या घरून पळून गेला, त्याच्या मनांत समुद्रकिनारा गाठून रोमकडे जावयाचे होतें, पण रात्रीच्या वेळीं रस्ता चुकून समुद्रकिनाऱ्याकडे न जातां उलट तो आफ्रिकेंतील जंगलांत शिरला ! उजेडल्यावर ही चूक त्याच्या ध्यानांत आली. जिकडे पाहावें तिकडे किर्र झाडी. चालतांना काटे कुटे लागून अंगाचे लचके निघत. खावयास कांही मिळना शेवटी तो थकून व निराश होऊन जवळच एक गुहा आढळली तींत जाऊन पडला.

त्याला फारशी विश्रांति मिळाली नाही. थोड्याच वेळांत

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

त्याने एक भयंकर गर्जना ऐकली. दचकून उठून तो पाहातो तों एक भयंकर सिंह तिकडेच येत आहे! आता पळून जाणें देखील शक्य नव्हतें, म्हणून जिवाची आशा सोडून अंद्रोक्लीस तसाच स्वस्थ राहिला. परंतु काय चमत्कार! त्याच्यावर सिंहाने झडप तर घातली नाहीच; पण तो हळू हळू पुढे येऊन, त्याच्याजवळ उभा राहिला व करुणस्वराने ओरडूं लागला.

अंद्रोक्लीस जात्या धीट होता. त्यांत सिंहाचा सौम्यपणा पाहून त्याला धैर्य आलें. त्याने पाहिलें तों सिंह एका पायाने गडत होता. तो पाय फार सुजला होता. अंद्रोक्लीसाने धीटपणें तो पाय हातीं धरून तपासला. तेव्हा त्याला दिसलें की, एक भला मोठा कांटा सिंहाच्या टाचेंत आहे. त्याने तो कांटा उपसून बाहेर काढला, त्यासरशीं पू व रक्त भळभळा बाहेर पडलें. त्यामुळे थोड्याच वेळांत सिंहाला आराम वाटला.

बरें वाटल्यावर सिंहाने कुत्र्याप्रमाणे शेपूट हालवून व उड्या मारून अंद्रोक्लीसाविषयी आपली कृतज्ञता दाखविली. इतकेंच नव्हे तर लंगडत लंगडत जाऊन त्याने एक ससा मारून आणला व अंद्रोक्लीसापुढे ठेवला. त्याने तो भाजून खाल्ला. व तो एका स्वच्छ व गोड झऱ्याचें यथेच्छ पाणी प्याला

याप्रमाणे सिंहाशीं मैत्री जमल्यावर अंद्रोक्लीसाने त्या गुहेतच वस्ती केली. तेथे तो तीन वर्षें राहिला. तो सिंहाबरोबर रोज शिकारीस जाई; रात्रीच्या वेळीं सिंह त्याच्या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पायाशींच निजे व मांजराप्रमाणे त्याचें अंग चाटून व शेपूट हालवून आपलें प्रेम दाखवी.



कांही दिवसांनी अंद्रोक्लीस या अरण्यांत फिरत असतां अचानक सरकारी शिपायांच्या हातीं लागला.

पळन गेलेल्या गुलामांना त्या काळीं फारच कडक शासन मिळे. अंद्रोक्लीस यास रोम येथे पाठविण्यांत आलें. तेथे त्याची रीतसर चौकशी झाली. त्याला पुष्कळ दिवस उपाशी ठेवलेल्या सिंहाशीं सामना करण्याची शिक्षा देण्यांत आली !

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ही शिक्षा म्हणजे देहांतशिक्षाच होय. असें सर्व लोक मानीत. अपराधी माणसाला स्वतःचा बचाव करण्याची मुभा असे; व यासाठी तरवार, भाला अशासारखें हत्यारहि त्याला देत. पण भयंकर चवताळलेल्या सिंहापुढे सहसा कोणाचा टिकाव लागत नसे. त्यावेळच्या रोमन लोकांस असले क्रूर देखावे पाहण्यांत फार मौज वाटे. यासाठी रोम शहरीं एक खास मैदान ठेवून तेथे हजारों प्रेक्षक बसूं शकतील अशी तजवीज केलेली होती. ठरलेल्या दिवशीं मैदानाच्या मध्यभागीं अंद्रोक्लीस यास उघडा करून उभा केला होता. हा भयंकर देखावा पाहण्यास लोकांच्या झुंडीच्या झुंडी लोटल्या होत्या.

शिक्षेची वेळ आली. त्यासरशीं एका मोठ्या पिंजऱ्याचा दरवाजा उघडला व आंतून एक सिंह गर्जना करीत बाहेर पडला! त्याची आयाळ उभारलेली, डोळे आगीसारखे लाल झालेले आणि जबडा वासलेला होता. आता हा अंद्रोक्लीसाचा एकच घास करणार असें प्रेक्षकांना वाटलें! पण काय आश्चर्य! अंद्रोक्लीसास फाडन खाण्यास आलेला सिंह त्याच्या जवळ जातांच गरीब होऊन, कुत्र्याप्रमाणे शेपूट हालवून त्याच्या पायाशीं लाडीगोडीने वागडूं लागला!

हें पाहून सर्व लोकांनी आश्चर्याने तोंडांत बोटें घातलीं. रोमचा बादशहाहि तेथे हजर होता. त्याने अंद्रोक्लीसास विचारलें, "हें कसें झालें?"

तेव्हा अंद्रोक्लीसाने रानांतील सर्व हकीकत बादशहास सांगितली. मोठे भयंकर पशु देखील केलेले उपकार स्मरतात,

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

असें पाहून सर्वांस मोठा आनंद झाला. मग बादशहाने अंद्रोक्लीसास क्षमा केली व तो सिंह त्यास बक्षीस देऊन गुलामगिरींतून मुक्त केलें.

प्रश्न

(१) चूक किंवा बरोबर हें लिहा.

(१) पळून गेलेल्या गुलामास सोडून देत.....

(२) सिंह गुलामाजवळ जाऊन कुत्र्याप्रमाणे लाडागोडीने वागडूं लागला.

(२) कृतिपर—सिंहाचें चित्र काढा, जंगलाचा देखावा काढा.

(३) स्मृति चांचणी—अंद्रोक्लीस कोण होता ? तो पळून कां गेला ? बादशहाने त्याला गुलामगिरींतून कां सोडून दिलें ? भयंकर पशूहि उपकार कसें स्मरतात ?

धडा ८ वा

दगडी कोळसा

श्रीपतराव आपल्या मुलाला दगडी कोळशाचे मोठाले ढीग दाखवून म्हणाले, "नानू, माहीत आहे का ही वस्तु तुला ?"

नानूः—हो ! हा तर दगडी कोळसा. हाच एंजिनांत जाळतात ना ?

श्रीपतरावः—बरोबर, पण साधा कोळसा व दगडी कोळसा यांत काय फरक असतो, हें तूं कधी पाहिलें आहेस का ?

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

नानूः—होय, हा लाकडी कोळशापेक्षा पुष्कळ जड व कठाण असतो. पण हा दगडी कोळसा पेटतो कसा, आणि लाकडी कोळसा सोडून हा कां एंजिनांत घालतात ? हें मला माहीत नाही.

श्रीपतरावः—बरें, मी सांगतो. एक तर ह्याची आच लाकडी कोळशापेक्षा पुष्कळ जास्त असते; व ती अधिक वेळ टिकते. यामुळे एंजिनांत तसेंच गिरण्यांत हाच कोळसा जाळतात. आता पेटण्याचें कारण सांगण्यापूर्वी हा मिळतो कोठे हें तूं मला सांग पाहूं !

नानूः—हा खाणींतून काढतात असें मीं ऐकलें आहे. आपल्या मध्यप्रांतांतहि याच्या खाणी आहेत ना ?

श्रीपतरावः—होय, चांदा जिल्ह्यांत बल्लारशहा येथे, छिंदवाडा जिल्ह्यांत व आणखी कांही ठिकाणीं या कोळशाच्या खाणी आहेत, पण उत्तम कोळशाच्या खाणी आपल्या हिंदुस्थानांत बंगाल बिहारकडे आहेत.



CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कोळशाची खाण खरोखर पाहण्यासारखी असते. आंत सर्वत्र अंधार असतो. एक विशेष प्रकारचे कंदील घेऊनच आंत काम करावें लागतें. पेट घेणारा एक वायु या कोळशांतून निघत असतो. त्यास जर का जळती ज्योत लागली; तर एकदम भडका होऊन सर्व खाणच्या खाण ढासळून पडते व सर्व माणसें जळून जातात. असे अपघात पूर्वी झाले, म्हणून 'विनधोक कंदील' (यांना इंग्रजींत सेफ्टीलॅंप असें म्हणतात) काढावे लागले.



खणतांना सर्व जागा एकदम पोखरत नाहीत; तसें केलें तर वरची बाजू कोसळून खाली पडेल. तिला आधार देण्यासाठी मध्ये मध्ये खांब राखून भोंवतालची जागा पोखरून काढावी लागते.

आंतील लोकांचा कोंडमारा होऊं नये म्हणून पंखे चालवावे लागतात. अलीकडे हे पंखे वाफेने अगर विजेने चालवितात. बरेंच खोल गेलें म्हणजे पाणी लागतें. हें पाणी पंपांनी बाहेर काढावें लागतें. पुष्कळ खोल खाणींत चढण्या उतरण्यास व कोळसा वर चढविण्यास विजेच्या पाळण्यांची योजना करतात.



आता हा कोळसा म्हणजे काय हें आपण पाहूं. हा पहा माझ्या जवळील तुकडा. यावर झाडाच्या पानासारखी आकृति तुला दिसत आहे काय ?

नानूः—होय बाबा ! अगदी हुबेहूब

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पानाचा ठसा यावर दिसत आहे. पानांमधील शिरांचे ठसे सुद्धा स्पष्ट आहेत.

श्रीपतरावः—यावरून तुला हें दिसून येईल की, आज जो आपणास एक काळा दगड दिसत आहे तें एका काळीं लाकूड होतें! शास्त्रज्ञांनी आता असा शोध लावला आहे की, लक्षावधि वर्षांपूर्वी कांही तरी कारणांनी मोठमोठीं अरण्यें पृथ्वीच्या पोटांत गडप झालीं. नंतर त्यांजवर दगड, माती यांच्या थराचें खूप जाड दडपण बसल्याने त्यांचा एक प्रकारचा दगड बनला. तरी मूळ पदार्थ जळाऊ होता म्हणून हा पदार्थहि जळाऊच आहे.

नानूः—पण याचा आणखी कांही उपयोग होतो का ?

श्रीपतरावः—होय. किती उपयोग म्हणून सांगूं ! अचंबा वाटेल तुला, एक तर चोहोकडून बंद असून एका अंगास नळी असलेल्या भांड्यांत जर हा कोळसा तापविला तर त्या नळीवाटे जो धूर येतो तो पेटून त्याचा स्वच्छ उजेड पडतो. मुंबई, कलकत्ता, या शहरीं बऱ्याच भागांत असलेच धुराचे दिवे रस्त्यावर रोशनाईसाठी लावतात !

हा कोळसा जळत असतां त्यांतून डांबर निघतें. डांबराचा साधा उपयोग तुला माहीत आहेच. तें एक रोगणच होय. पण या रोगणापासून हल्ली अनेक तऱ्हेतऱ्हेचे रंग काढं लागले आहेत. शिवाय एक प्रकारची साखरहि काढतात. ती साध्या साखरेपेक्षा शंभरपट गोड असते !

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

नानूः—रंग व साखर ! हें तर फारच विलक्षण ! पण हेंकसें करतात ?

श्रीपतरावः—तें मात्र तूं शास्त्रीय विषय शिकशील तेव्हाच कळेल.

प्रश्न

(१) खालील शब्दांचा वाक्यांत उपयोग करा.

दडपण, आधार, हुबेहुब, गडप, रोशनाई.

(२) स्मृति चांचणी—

दगडी कोळसा कसा बनला असावा ? दगडी कोळसा आपल्या प्रांतांत कोठे कोठे सांपडतो ? खाणींतून दगडी कोळसा कसा काढतात ? बिनधोक कंदिलाची गरज कां ? दगडी कोळशापासून कोण कोणते पदार्थ बनतात ?

धडा ९ वा

मिताहार व व्यायाम

भाग १ ला

दादासाहेब ढोबळे हे पिंपळगावचे मालगुजार होते. ते घरचे श्रीमंत असून खाण्यापिण्याच्या बाबतींत अमळ हौशी होते. आज काय लाडू, उद्यां जिलबी, परवां बासुंदीपुरी अशी त्यांच्याकडे चंगळ असावयाची ! श्रीमंतांच्या घरीं नोकरांना

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

तरी काय तोटा ? इकडचें पान तिकडे करावयाचें म्हटलें तर एक नोकर हजर. त्यांना स्वतःला कांही काम करावें लागत नसे व करण्याची हौसहि नसे.

याचा परिणाम असा झाला, की दादासाहेब अंगाने फार लठ्ठ झाले. पोट खूप वाढलें. दोन पावलें चालून गेले की दम लागे. भूकहि लागेनाशी झाली. पण त्यांना वाटे. अन्न खाल्ल्याशिवाय अंगांत ताकद कशी राहणार ! म्हणून ते अळीअळीच बळेंच वासुंदी, शिरा, बदामाची खीर वगैरे पदार्थ रोज खात. पण याने प्रकृति अधिकच बिघडूं लागली. त्यांना उठून उभे देखील राहवेना. कमरेस, हातापायांस कळा लागूं लागल्या. शौच स्नान वगैरे करण्यासहि त्यांना नोकराची मदत लागू लागली

आता मात्र दादासाहेब घाबरले. त्यांच्या गावचे मोरोपंत मास्तर वैद्यकी जाणणारे होते. त्यांना बोलावून दादासाहेबांनी सर्व लक्षणें सांगितलीं. मास्तरांनी विचारलें, "आपणांस भूक कशी काय लागते ?"

दादासाहेबः—(एक सुस्कारा टाकून) कोठची भूक हो सकाळीं थोडें आटीव दूध व शिरा खातों. दुपारीं जेवतांना गोळाभर भात व दोन चपात्या याहून कांही जातच नाही अशाने अंगांत ताकद कशी बरें राहावी ?

मास्तरः—"दादासाहेब,माफ करा; पण माझी समजूत अगदी निराळी आहे. आपला मुख्य रोग म्हणजे फाजील खाणें हाच होय. अन्नावांचून माणूस जगं शकत नाही हें खरें. पण तें अन्न

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

चेल तरच शरिराला उपयोगी पडतें. 'अन्न तारी व अन्न मारी' अशी म्हण आहे, ती अगदीं खरी आहे. अपचन हें सर्व रोगांचें मूळ आहे. तुम्ही व्यायाम काय घेतां, सांगा पाहूं."

दादासाहेबः—अहो, कसचा व्यायाम घेऊन बसलां? माझ्याने जागचें उठवेल तर ना?

मास्तरः—पण ही स्थिति पहिल्यापासून आहे, का अलीकडेच झाली?

दादासाहेबः—पूर्वी नव्हती. पण अलीकडे चार पांच वर्षांपासून हा विकार सुरू झाला. आता तर माझ्याने चालवत च नाही!

मास्तरः—अहो; हा परिणाम तुमच्या ऐदीपणाचा आहे! तुम्ही खातांपितां भरपूर, पण तें पचविण्यास लागणारे श्रम मुळीच करीत नाहीं. शिरा, बासुंदी, बदाम हे पदार्थ पौष्टिक खरे; पण ते कोणाला? ते पचतील त्याला. तुमच्यासारख्या स्वस्थ बसणाऱ्याला ते विषासारखे आहेत. व्यायामानेच खाल्लेले अन्न पचतें! तो समोर तुमच्या बागेंत काम करीत आहे त्या मजुराकडे पहा बरें! विचाऱ्याला साध्या मीठभाकरीखेरीज कांही मिळत नाहीं. पण तेवढ्यावरच त्याची ताकद कशी आहे ती पहा! याचें कारण त्याची मेहनत होय!

दादासाहेबः—पण आता माझी प्रकृति सुधारण्याची कांही आशा आहे का?

मास्तरः—हो, तुमची प्रकृति खात्रीने सुधारेल. त्यासाठी औषधपाणी देखील कांही नको. मी सांगेन तसें मात्र तुम्हांस वागावें लागेल.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

दादासाहेबः—कबूल; तें माझ्याकडे लागलें.

मास्तरः—तुम्ही आजपासून भूक लागल्याखेरीज खावयाचें नाही असा नियम करा. पोटांत जेव्हा चरचरीत भूक लागेल तेव्हाच खावयाचें, ते पदार्थ सुद्धा साधा वरणभात व पोळी असेच खावयाचे. व हें सुद्धा अर्धी भूक राखून खावयाचें. दूध तूप, असले चर्बी वाढविणारे पदार्थ तूर्त अगदी सोडून द्या थोडें ताक घेतलें, तर मात्र चालेल.

आणखी एक नियम करावयाचा. रोज निदान गाडींत बसून गावा बाहेर स्वच्छ मोकळी हवा खाण्यास जात चला. नोकरांच्या मदतीने कां होईना, दोन पावलें चालत जा.

असा क्रम एक महिना चालल्यावर फिरून एकदा मला तुमची प्रकृति दाखवा.

इतकें बोलून मास्तर निघूल गेले.

प्रश्न

(१) स्मृति चांचणी—मिताहार व व्यायाम याची आवश्यकता काय आहे ? दादासाहेब ढोबळ्यांना कोणता आजार झाला होता ? मोरोपंत मास्तरांनी कोणता उपाय सांगितला ? मिताहार म्हणजे काय ?

(२) अर्थ स्पष्ट करा—(१) अन्न तारी व अन्न मारी (२) शिरा, बासुंदी, बदाम हे पदार्थ स्वस्थ वसणाऱ्याला विषासारखे आहेत.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

धडा १० वा

मिताहार व व्यायाम

भाग २ रा

मास्तरांनी सांगितल्याप्रमाणे दादासाहेबांनी विनचूक केलें. पहिले दोन तीन दिवस त्यांना जरा जड गेलें. पण लवकरच त्यांना समजून आलें की, अन्नाला खरी चव कडकडीत भूक लागेल तेव्हाच येते, बाहेरील स्वच्छ हवेंने व हळू हळू नोकरांच्या अंगावर भार घालून थोडें चालण्याने त्यांना पुष्कळ हुशारी वाटूं लागली. हातापायांच्या कळा कमी होऊं लागल्या. हळू हळू स्वतःच काठी घेऊन चालण्यापर्यंत त्यांची मजल आली.

महिनाच्या शेवटी मास्तर आले. तेव्हा दादासाहेब म्हणाले, "मास्तर, माझी तब्बेत आता पुष्कळच सुधारली आहे. तुमचे माझ्यावर फार उपकार आहेत."

मास्तरः—यांत उपकार कसले ? साध्यासुध्या दोन गोष्टी सांगितल्या. आपण श्रीमंत माझ्या बोलण्याप्रमाणे वागलां, हेंच मोठें कौतुक आहे. बेताने खाणें व व्यायाम करणें हें अन्नपचनास फार जरूरीचें आहे, व्यायामानें श्वासोच्छ्वास जोराने चालतो व त्यामुळे फुप्फुसांस स्वच्छ हवा अधिक मिळते; त्यामुळे शरिरांतील रक्त शुद्ध होतें, अन्नाचें पचन चांगलें होतें व घामाच्या रूपाने शरिरांतील घाण बाहेर पडते. व्यायामाने भूक चांगली लागते व झोप चांगली लागते, 'भुकेला कोंडा व निजेला धोंडा' या म्हणीचा अर्थ आता

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

तुम्हांला कळला ना ? आता थोडे दिवसांनी तुम्हांला हिंड फिरतां येऊं लागलें म्हणजे नियमाने निदान दोन तीन मै फिरून येत जा. गरिबांना कावाडकष्ट करावे लागतात, त्यां व्यायाम आपोआपच होतो. तुमच्यासारख्या श्रीमंतांनी मा तो मुद्दाम केला पाहिजे.

व्यायामाचें महत्त्व लहान मुलांना देखील समजावून दे आवश्यक आहे. खुल्या हवेंत आट्यापाट्या, खोखो, हॉक फुटबॉल यांसारखे खेळ खेळल्याने व सूर्य-नमस्कार, दंड बैठक पोहणें वगैरे व्यायाम केल्याने मुलें सुदृढ व आनंदी बनतात म्हणून आमच्या शाळेंतील सर्व मुलांना मी सक्तीने व्याया करावयास लावतों.

मास्तरांच्या उपदेशाप्रमाणे वागल्याने थोड्याच दिवसां दादासाहेब खडखडीत बरे झाले. आता ते हौसेने फिरावया जातात व मुलांनाहि खेळांचे सामने शर्यती वगैरे बाबतींत मन पासून उत्तेजन देतात.

प्रश्न

(१) अर्थ स्पष्ट करा:—

(१) भुकेला कोंडा व निजेला धोंडा.

(२) श्रीमंतांनी व्यायाम मुद्दाम केला पाहिजे.

(२) उलट अर्थाचे शब्द लिहा.

(१) सुधारली (२) सक्तीने (३) शुद्ध (४) कडकडी

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

धडा ११ वा

रामशास्त्री प्रभुणे

हा थोर पुरुष पेशवाईत मुख्य न्यायाधिशाच्या जागेवर होता. निःस्पृहपणा व कांटेतोल न्याय या बाबतींत त्याचा इतका लौकिक होता की, खुद्द पेशव्यांना देखील त्याचा धाक वाटे.

रामशास्त्री यांची मूळची अत्यंत गरिबी; म्हणून लहानपणीं त्याचें शिक्षण मुळीच झालें नव्हतें, लहानपणीं ते पुण्यास एका सावकाराकडे शागीर्द होते. एके दिवशीं यजमानांचें जेवण झाल्यावर नित्याप्रमाणे त्यांच्या हातावर पाणी घालतांना रामाची नजर यजमानांच्या कानांतील सुंदर भिगवाळीकडे गेली. त्यामुळे हातावर पाणी नीट पडेना.

मालकांनी विचारलें, "काय रे रामा, कोणीकडे आहे लक्ष तुझें ?" रामा एकदम सावध झाला. त्याला खोटें बोलणें मात्र मुळीच माहीत नव्हतें. तो म्हणाला, "महाराज, माझें लक्ष आपल्या कानांतील मोत्यांच्या भिकवाळीकडे गेलें होतें."

मालक हसून म्हणाले. "रामा, तुझ्यासारख्या शागीर्दाला अशीं मोतीं कशीं शोभणार ? सभा जिंकणाऱ्या विद्वानास किंवा समशेर गाजविणाऱ्या शिपायासच असलीं मोत्यें शोभणार !" यजमानांचें हें बोलणें रामास फारच झोंबलें. विद्येशिवाय आपलें जिणें व्यर्थ होय, असें त्याच्या मनाने घेतलें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

व त्याच दिवशीं रामाने नोकरी सोडली व विद्याभ्या करण्यासाठी काशीची वाट धरली.

काशीस राहून रामाने अनेक शास्त्रांचें अध्ययन केलें. मोठा विद्वान पंडित म्हणून लौकिक मिळविला. राम शागीर्दांचे पंडित रामशास्त्री होऊन ते पुण्यास परत आले तेव्हा त्या वेळचे पेशवे थोरले माधवराव यांनी त्यांस आपा न्यायाधीश नेमले.

× × ×

शास्त्रीबुवांच्या निःस्पृहतेच्या व स्पष्टवक्तेपणाच्या अने आख्यायिका आहेत, त्यांपैकी दोन तीन येथे सांगतों.

एकदा माधवरावसाहेबांच्या भेटीस शास्त्रीबुवा गेले असत ते स्नानसंध्या करीत बसले होते. त्यामुळे त्यांची भेट न होत शास्त्रीबुवांस परतावें लागलें. पुढे जेव्हा पेशव्यांची भेट झाल तेव्हा शास्त्रीबुवा म्हणाले, "स्नानसंध्या, जपजाप्य हें ब्राह्मणां कर्तव्य खरें, पण आपण क्षत्रियाला शोभेल असा राजदं हातांत घेतला आहे. अर्थात् प्रजापालन व राजकारण हीं आपलीं मुख्य कर्तव्यें ! तिकडे दुर्लक्ष करून स्नानसंध्येंत वे घालविणें हें बरें नव्हे ! स्नानसंध्याच करावयाची असल्या हें राजकारण सोडून आपण मजबरोबर काशीस चलावें. तें ब्रह्मकर्म यथासांग होईल." माधवरावांस ह्या बोलण्यांतलं खोच समजली व त्यांनी ब्रह्मकर्मांत जास्त वेळ घालविण्या सोडून दिलें.

× × ×

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

एकदा माधवराव पेशव्यांच्या पत्नी रमाबाई यांना भेटण्याकरितां रामशास्त्र्यांची पत्नी सरकारवाड्यांत गेली. शास्त्रीबुवांची राहाणी अत्यंत साधी असे; यामुळे त्यांच्या पत्नीच्या अंगावर मणिमंगळसूत्राखेरीज दागिने मुळीच नव्हते. रमाबाईसाहेबांना या गोष्टीचा फार खेद झाला व शास्त्रीणबाई नको नको म्हणत असतां, रमाबाईंनी त्यांच्या अंगावर पुष्कळ दागिने घातले व पालखींत बसवून मोठ्या समारंभाने त्यांची घरीं रवानगी केली.

शास्त्रीबुवांनी हें पाहतांच मुद्दामच आपल्या कुटुंबास न ओळखल्यासारखें केलें व म्हणाले, "बाईसाहेब, आपलें माझ्या गरीबाच्या घरीं काय काम आहे ? उद्या कचेरींत भेटा."

शास्त्रीणबाई खजील झाल्या व म्हणाल्या "हें काय भलतेंच बोलणें ? मी आपला पायांची दासी नव्हे का ?"

शास्त्रीबुवा म्हणाले, "छेः भलतेंच ! माझी गरीबाची बायको अशी नटून थटून पालखींतून येणें शक्यच नाही."

बाई मनांत उमगल्या; त्या त्याच पावलीं परत फिरल्या व सर्व दागिने वस्त्रें वगैरे परत करून पायींच घरीं आल्या !

× × ×

नारायणराव पेशव्यांचा पुढे खून झाला; व राघोबादादा गादीवर बसले. त्यांनी रामशास्त्र्यांना प्रश्न केला, "नारायणरावास मारल्याचा मजवर आरोप आला आहे. त्यास प्रायश्चित्त काय ?" यत्किंचित् न कचरतां शास्त्रीबुवांनी उत्तर केलें, "दादासाहेब, हें घोर कृत्य तुम्हीं केलें, याचिसाठी मला मुळीच

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

शंका नाही. राज्याच्या लोभामुळे तुम्हीं ब्रह्महत्येचें पाप केलें शास्त्राप्रमाणे या पापास देहान्त प्रायश्चित्ताखेरीज दुसरें प्रायश्चित्त नाही !"

असें बोलून हा निःस्पृह शास्त्री पुणें सोडून निघून गेला. पुढे सवाई माधवरावांच्या नांवाने कारभार चालूं लागला; तेव्हा शास्त्रीबुवास पुण्यास परत आणून न्यायाधीशाचे जागीं नेमले. ते शेवटपर्यंत त्या कामावर होते.

प्रश्न

(१) स्मृति चांचणीः—(१) रामशास्त्री प्रभुणे यांचें चरित्र थोडक्यांत लिहा. (२) त्यांच्या दोन आख्यायिका लिहा. (३) रामशास्त्री प्रभुणे यांच्या चरित्रापासून कोणता बोध घ्याल ?

(२) अशुद्ध शब्द शुद्ध लिहाः—वराहकर्म, निस्सप्रुहता, सपस्टवकता.

(३) स्पष्टिकरण कराः—

(१) देहान्त प्रायश्चित्त, (२) ब्रह्मकर्म, (३) राजदंड.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

धडा १२ वा

सीतागीत

[प्रस्तुत कविता कविवर्य मोरोपंत यांच्या 'सीतागीत' नांवाच्या छोटेखानी रामायणांतून घेतलेली आहे, सीता वनवासांतून परत आल्यावर आपल्या जावांस आपली हकीकत स्वतः सांगत आहे. असें या काव्यांत कल्पिलें आहे.]

अभंग

चित्रकूटाहूनी पादुका घेऊनी ॥
वियोग देऊनी तुम्हा आलों ॥ १ ॥
आम्हीही तेथूनी तशींच निघालों ॥
वनांत रिघालों तिघेजणें ॥ २ ॥
लक्ष्मण भावोजी मागे, पुढे स्वामी ॥
मज आहें धामीं ऐसें वाटे ॥ ३ ॥
न बाधेचि मज उष्ण क्षुधा तृषा ॥
तुम्हांपाशी मृषा न बोलावें ॥ ४ ॥
जेव्हा कांही वाटे चालतां मी भागें ॥
मुरडोनि मागे विलोकीती ॥ ५ ॥
बाई काय सांगों स्वामींची ती दृष्टि ॥
अमृताची वृष्टी मज वाटे ॥ ६ ॥
अत्रीच्या आश्रमीं नेलें मज वाटे ॥
माहेरचा वाटे खरें खुरें ॥ ७ ॥
अनसूया सती करी वेणीफणी ॥
आनंदाची धणी दिली मज ॥ ८ ॥

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आजवरी ओली चंदनाची उटी ॥
आली नाही तुटी माळागुणीं ॥ ९ ॥
ऋषीतें वंदीत गेलों गोदातटीं ॥
जेथे पंचवटी पुण्यस्थान ॥ १० ॥
भावोजींनी केली माझी बहु सेवा ॥
ती त्या महादेवा ठावी असे ॥ ११ ॥
तेथे शूर्पणखा भार्या व्हाया आली ॥
तिला माझी भ्याली चित्तवृत्ति ॥ १२ ॥
भावोजींनी तिचा कर्णनासाछेद ॥
केला की ते वेदशास्त्रार्थज्ञ ॥ १३ ॥
तिचा भाऊ खर होऊनीयां क्रुद्ध ॥
करावया युद्ध आला बाई ! ॥ १४ ॥
चवदा सहस्र राक्षस पापिष्ठ ॥
रणीं केले पिष्ट स्वामींनी ते ॥ १५ ॥
तिने घ्राणरक्तें मुख मळवीलें ॥
वृत्त कळवीलें रावणासी ॥ १६ ॥
छळाचा उपाय मनीं आठवीला ॥
दुष्टें पाठवीला मायामृग ॥ १७ ॥
स्वर्णरत्नमय मृग म्यां देखीला ॥
तो सत्य लेखीला मनामध्ये ॥ १८ ॥
गृहा आणावया मागे हरीणा मी ॥
दुःख परिणामीं नेणोनीयां ॥ १९ ॥
मज रक्षावया लक्ष्मणा ठेवूनी ॥

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

निघाले घेऊनी धनुर्बाण ॥ २० ॥
मायामृगामागे जगदेकशूर ॥
गेले बहु दूर अरण्यांत ॥ २१ ॥
कपटी राक्षस जाणोनीयां प्रा
घ्यावयासी बाण मोकलीला ॥ २२ ॥
तो बाण लागतां हृदय विदारी ॥
दुष्ट हाक मारी स्वामीवाणी ॥ २३ ॥
"हा सीते हा बंधो, लक्ष्मणा ये धावें ॥
अंतकाळीं पावें भेटावया" ॥ २४ ॥
मज वाटे माझ्या स्वामींचींच हाक ॥
शिरे कंप धाक हृदयांत ॥ २५ ॥
मी म्हणे, "भावोजी, धावा रक्षा प्राण ॥
हे घ्या चापबाण उठा वेगीं" ॥ २६ ॥
भावोजी म्हणती, "राक्षसाची माया ॥
कोण रामराया पाहों शके ?" ॥ २७ ॥
वाटलें तें वाक्य सत्य परी खोटें ॥
झालें दुःख मोठें माझ्या मनीं ॥ २८ ॥
न वदावें तेंची बोलिल्यें मीं कोपें ॥
चित्त शब्द-रोपें विदारीलें ॥ २९ ॥
"वांछितोसी दुष्टा अग्रजाचा घात ॥
माझ्या अंगा हात लावावया ॥ ३० ॥
हात लावितांची सोडीन मी प्राण ॥
शिरीं पादत्राण कोण वाहे ? ॥ ३१ ॥

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

माझ्या दृष्टीपुढे नको राहों साच ॥
नरकींचा जाच मूर्त तूंची !" ॥ ३२ ॥
ऐसी बाई माझी ऐकतांची वाणी ॥
डोळां आलें पाणी भावोजींच्या ॥ ३३ ॥
मातेने दापीतां वत्स पित्याकडे ॥
जाय तैसें घडे लक्ष्मणासी ॥ ३४ ॥
साधूसी गांजीतां झालें सध्या फळ ॥
सज्जनाचा छळ करूं नये ॥ ३५ ॥
वाटेंत धनुष्यें ओढोनियां रेघ ॥
गेले दयामेघ स्वामींकडे ॥ ३६ ॥
तों आला रावण होवोनी संन्यासी ॥
न कळे अन्यासी छद्म त्याचें ॥ ३७ ॥
भिक्षा द्यावा गेल्यें रेघेच्या बाहेर ॥
सासूर माहेर बुडवाया ॥ ३८ ॥
न लंघीतें जरी धनुष्याची रेखा ॥
तरी त्याचा लेखा काय होता ? ॥ ३९ ॥
रेघेच्या बाहेरीं जसा दिला पाय ॥
झाला महाकाय दशमुख ॥ ४० ॥
जसा हरीणीतें हरीतो लांडगा ॥
तसा तो दांडगा हरी मातें ॥ ४१ ॥
त्या पाप्याच्या स्पर्शें देह हा कोमेला ॥
आकाशीं तो मेला रथीं चढे ॥ ४२ ॥

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

धडा १३ वा

वाघ व सिंह

उमरेड येथे एकदा प्रो० परशरामराव यांची सर्कस आली त्यांच्या बरोबर वाघ, सिंह, हत्ती वगैरे अनेक तऱ्हेचे पशु होते. ते पाहण्यास लोकांच्या रोज झुंडीच्या झुंडी लोटत.

रामभाऊ मास्तर आपल्या मुलांना घेऊन हा शिकारखाना पाहण्यास गेले. मुलांनी बाकीचे प्राणी पूर्वी पाहिले होते. पण वाघ व सिंह मात्र त्यांना अगदी नवे होते. मास्तर म्हणाले:—

हा पाहिलात का वाघ ? व हा पलीकडच्या पिंजऱ्यांतील सिंह कसे दांडगे व भयंकर हे प्राणी आहेत पहा ! केवढें थोरलें या सिंहाचें हें डोकें; व मानेवर केस कसे लोंबत आहेत पाहिलेत ना !



याना 'आयाळ' म्हणतात. ती पलीकडच्या पिंजऱ्यांत सिंहीण आहे. तिला मात्र आयाळ नाही.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri



वाघांत व सिंहांत काय फरक दिसतो तो पहा बरें! सिंहाचा रंग पिंगट असतो. वाघास सिंहाप्रमाणे आयाळ नसते,



पण त्यांचा रंग सिंहापेक्षा छानदार असतो. त्याच्या अंगावर काळे काळे पट्टे असतात.

दोघांचा जबडा, चार चार सुळे. पंजांचीं तीक्ष्ण नखें हीं सारखींच दिसतात. त्याचे डोळे मांजरासारखेच असतात. मांजराच्या डोळ्यांसारखीच यांच्या डोळ्यांत बाहुलीची चीर

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

असते. रात्रीं अंधारांत ही चीर फाकलेली व विस्तवाच्या गोळ्यासारखी तेजस्वी दिसते. त्यामुळे रात्रीचें या प्राण्यांना छान दिसतें. हे प्राणी मांजरासारखेच आहेत. म्हणून यांना मांजराच्या वर्गांतील प्राणी म्हणतात.

पण मांजर जसें माणसाळलें आहे, तसे वाघ-सिंह माणसाळत मात्र नाहीत. सर्कसवाले त्यांना कांही कामें करण्यास शिकवितात; पण हे केव्हा चवताळून माणसावर उलटतील याचा नेम नसतो. म्हणून यांच्याशीं फार जपून वागावें लागतें.

मास्तर असें बोलत आहेत तोंच या जनावरांना देण्यासाठी हातगाडींतून मांस घेऊन एक माणूस आला. त्याला पाहिल्या बरोबर वाघसिंहांनी शेपटी हालवून गुरगुरावयास सुरवात केली. लहानशा कुटुंबाला एक आठवडाभर पुरेल एवढें मांस एकेकापुढे टाकून तो माणूस निघून गेला. मुलें म्हणालीं, यांना दुसरें अन्न देत नाही का ?"

मास्तर:—नाही. हे केवळ मांसावर जगणारे हिंस्र पशु आहेत. हे रानांत सोकले असतांना मोठे भयंकर असतात. दिवसा बहुधा कोठे तरी थंडशा जागीं पडून राहावयाचें; व रात्र झाली की बाहेर पडून जंगलांतील इतर पशूंची शिकार करावयाची. असा यांचा क्रम असतो. यांची गर्जना ऐकली की, जनावरांची गाळणच उडते. यांना जर का माणसांच्या रक्ताची चटक लागली, तर मात्र फार उपद्रव होतो. मग हे माणसांच्या वस्तीकडे येऊन माणसांवरच हल्ले करूं लागतात. दबकत

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पावलें वाजूं न देतां चोरांप्रमाणे चालण्याची खुबी या प्राण्यां चांगली साधते.

दिसावयास हे प्राणी सडपातळच असतात. पण यांच ताकद फार दांडगी असते. पंजाच्या एका फटकाऱ्यासरशीं म्हैस, बैल यांसारख्या प्राण्यांस चीत करतात. आटोक्यां आलेला प्राणी बहुधा यांच्या तडाक्यांतून सुटत नाही.

सिंह आजकाल हिंदुस्थानांत फारसा सापडत नाही. या मुख्य वसतिस्थान म्हणजे आफ्रिका खंडांतील जंगलें. वाघ मा आपल्या हिंदुस्थानांत विपुल आहेत. बंगालचा वाघ हा फा दांडगा असतो. मध्यप्रांतांतहि वाघ व चित्ता हे बऱ्याच ठिकाण आढळतात. चित्त्याचा रंग मळकट पिवळा असून अंगभर का ठिपके असतात.

या भयंकर प्राण्यांची शिकार करणें बरेंच कठीण धोक्याचें असतें. यांच्याशीं समोरासमोर सामना करणें प्राय अशक्यच होय. म्हणून रानांत वाघ असेल तेथेच जवळपा एखाद्या झाडावर उंचशा ठिकाणीं माळा बांधतात; व त्याव बंदुका वगैरे घेऊन शिकारी मंडळी बसतात. इकडे कांही माण रान वेढून आरडाओरडा करून वाघाला माळ्याच्याच वाजू दौडावयास लावतात. वाघ त्या वाजूने जाऊं लागला क माळ्यावरील शिकारी गोळ्या मारून त्यास ठार करतात.

कित्येक वेळां एखादें जनावर मुद्दाम माळ्याच्या जवळपा बांधून ठेवतात. वाघ जनावराला खावयास येतो. ही संधि साधून शिकारी लोक वाघाला ठार करतात.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

प्रश्न

(१) कारणें सांगाः—

(१) वाघ सिंह कां माणसाळत नाहीत.....

(२) वाघाची शिकार करणें बरेंच कठीण. कारण...

(२) स्मृति चांचणीः—(१) वाघ सिंहाचें वर्णन करा.

(२) वाघ माणसांवर केव्हा हल्ले करूं लागतो ?

(३) वाघाची शिकार कशी करतात ?

धडा १४ वा

ताजमहाल



ताजमहाल ही इमारत म्हणजे एक भव्य कबरस्तान अथवा समाधि आहे. पांचवा मोगल बादशहा शाहजहान याची प्रिय

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पत्नी राणी मुमताजमहाल इचें हें स्मारक आहे. मुमताजमहाल ही जशी सौंदर्यानें तशीच गुणांनी फार चांगली होती. शाहजहानचें तिच्यावर अत्यंत प्रेम होतें. तिला मुलेंहि पुष्कळ झालीं. शेवटी एका बाळंतपणांतच ती आजारी पडली. शेवटी या दुखण्यांतून आपण वांचत नाही अशी मुमताजची खात्री झाली. शाहजहानने डोळ्यांत पाणी आणून पहिलें विचारलें, "तुजवर असलेल्या माझ्या प्रेमाची खूण मी काय करूं ?" तिने उत्तर दिलें, "माझें स्मरण ठेवा; व माझ्याच माझें नांव राहील अशी कबर बांधा म्हणजे झालें."

बादशहाने आपलें वचन अक्षरशः पाळलें व आग्रा यमुना नदीच्या पश्चिम तीरावर त्याने हें विख्यात कबरस्थान बांधून त्यास 'मुमताजमहाल' असें नांव दिलें. ताजमहालाचा अद्वितीय सौंदर्याने जगांतील सर्व रसिकांना वेड लावलें आहे.

ताजमहाल शुद्ध, शुभ्र संगमरवरी दगडाचा बांधलेला असून हा इतकीं वर्षें लोटलीं असूनहि असा भास होतो की, जणूं काल च बांधून झाला आहे !

खाली एक विस्तीर्ण चौथरा व त्यावर मुख्य इमारत. इमारतीच्या चारी बाजूंस चार उंच मनोरे; मध्यभागीं एक चौरस महाल व त्यावर एक उंच असा घुमट; त्याच्या भोवती त्याच आकाराचे पण लहान लहान चार घुमट-अशी एकंदर ताजमहालाची रचना आहे. सर्व भाग इतके सुबक व प्रमाणशुद्ध आहेत की, पाहणाराच्या मनावर त्याची विलक्षण छाप पडते.

महालाच्या चारी बाजूंस उंच उंच दरवाजे असून त्यांच्या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कटीला वरून सुंदर नक्षीदार महिरापी काढल्या आहेत. ठे कोठे पांढरा दगड खोदून त्यांत चित्रविचित्र रंगांच्या मती दगडांचे खडे बसवून वेलांचे व फुलांचे आकार खविले आहेत.

दरवाजांतून माझ्यांत गेलें म्हणजे मध्ये मुमताजमहाल व द शाहजहान बादशहा यांच्या कबरी दृष्टीस पडतात. पण दर्शनी कबरी होत, खऱ्या कबरी खालच्या तळघरांत हेत. यांच्या भोवतीं अष्टपैलू मखर आहे, तेंहि संगमरवराच्या क्षीदार जाळीचें बनविलें आहे. थडग्यावर रत्नखचित लपत्ती व कुराणांतील वाक्यें खोदलीं आहेत. कारागिरांनी पलें खर्व कौशल्य येथे खर्च केलें आहे.

ताजमहाल दिवसा पाहण्यांत तर मौज आहेच, पण चांदण्या त्रीं चंद्राच्या सौम्य प्रकाशांत त्याचा जो देखावा दिसतो, तर शब्दांनी वर्णन करून सांगणें शक्य नाही. या वेळचा खावा पाहण्यास नेहमी प्रेक्षकांच्या झुंडीच्या झुंडी लोटत सतात.

प्रश्न

१) स्मृति चांचणीः—(१) ताजमहालाचें वर्णन करा.

(२) ताजमहाल पाहण्याची मौज कधी असते ? कां ?

(३) ताजमहाल कोणी कशासाठी बांधला आहे ?

२) शब्दांचा वाक्यांत उपयोग कराः—

महिरापी, स्मारक, अष्टपैलू, सौम्य.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

धडा १५ वा

नागपूरची सफर

पत्र १ लें

नागपूर, ता. ७-४-३०

प्रिय बंधु जनार्दन यास,

अनेक आशीर्वाद विशेष.

मी, बाबा व शरयू तुमचा निरोप घेऊन निघालों, तो ता. ३ बुधवार रोजीं नागपुरास पोचलों. सागर ते जबलपूर जी. आय. पी. रेलवेने व पुढे जबलपूर ते गोंदिया (छोटी लाईन) व गोंदिया ते नागपूर बी. एन्. रेलवेने प्रवास झाला. प्रवासाची हकीकत मी परत आल्यावर तोंडींच सांगेन.

नागपूर थोडें दूर असतांच, त्याचीं विशेष चिह्नें—सीतावर्डीचा किल्ला व नागपूरच्या गिरण्यांचीं उंच उंच धुरांडीं—दिसूं लागतात. गाडी प्रथम इतवारी स्टेशनवर थांबते. हें बी. एन्. रेलवेचें अखेरचें स्टेशन होय. मुख्य नागपूर स्टेशन येथून दोन मैलांवर आहे. हें महत्त्वाचें रेलवे जंक्शन आहे, येथून मुंबई, कलकत्ता, इटारसी, छिंदवाडा, चांदा इत्यादि ठिकाणीं जाणारे रेलवे मार्ग निघत असल्याने हें स्टेशन आजकाल फार वाढलें आहे. स्टेशनची नवी इमारत अलीकडेच

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

बांधलेली असून ती फार भव्य व सुंदर आहे. उतारूंची गर्दी व धांदल सर्व दिवसभर सुरूच असते.

आमचा मुक्काम रा. भय्यासाहेब गोळे यांजकडे आहे. जेवण झाल्यानंतर बाबा आपल्या कामास कोर्टाकडे गेले. भय्यासाहेबांनी आपला तांगा व कारकून बरोबर देऊन नागपूर शहर आम्हांस दाखविण्याची व्यवस्था केली. कारण नागपूरची वस्ती अफाट व प्रेक्षणीय स्थळें दूर दूर आहेत. त्यामुळे तांगा नसता तर वेळ फार मोडून श्रमहि फार झाले असते. दोन तीन दिवस हिंडून आम्हीं शहरांतील सर्व प्रसिद्ध ठिकाणें पाहिलीं. त्याचें त्रोटक वर्णन पुढे देत आहें.

रेलवेरस्ता व सीताबर्डीचा किल्ला यांनी नागपूरचे दोन ठळक विभाग झालेले दिसतात, मुख्य शहर रेलवेच्या पूर्व व दक्षिण बाजूस आहे; व सिव्हिल स्टेशन व इतर उपनगरें रेलवेच्या पश्चिम व उत्तर बाजूस पसरलीं आहेत.

आम्हीं प्रथम शहर पाहिलें. रेलवेच्या पुलाखालून जरा पुढे गेलें कीं, जुम्मा अथवा शुक्रवारीचा विस्तीर्ण तलाव लागतो. हा तलाव लांबट चौकोनाकृति असून तो खरोखर या शहराची एक शोभा आहे. हा भोसल्यांच्या कारकीर्दीतच बांधलेला आहे. तलावाच्या नजीकच प्रसिद्ध एम्प्रेस व स्वदेशी मिल्स पसरलेल्या आहेत. या व शहराच्या दक्षिण भागास नवीन निघालेल्या मॉडेल मिल्स या प्रचंड गिरण्यांमुळे व नागपूरच्या प्रसिद्ध कापस बाजारामुळेच नागपूरचें व्यापारी महत्त्व

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

फार वाढलें आहे. ज्या संत्र्यांबद्दल नागपूर प्रसिद्ध आहे त्या संत्र्यांचें मार्केट हि येथून जवळच आहे.

शुक्रवारी तलावाच्या पूर्व टोकानजीक व शुक्रवारी दरवाजा-समोर परलोकवासी लोकमान्य टिळक यांचा भव्य पुतळा बसविण्यांत आला आहे.

जुम्मा दरवाजा हा नागपूर शहरच्या जुन्या तटबंदीचा अवशेष आहे. यांतून आंत गेलें की, महालपेठ लागते. या महाल भागांतच पूर्वी नागपूरचे राजे भोसले यांचे राजवाडे होते, दुर्दैवाने इ. स. १८६४ सालीं ते अग्नीच्या भक्ष्यस्थानीं पडले. आता त्या मैदानांतील एका वाड्यांत भोसले घराण्या-पैकी कांही मंडळी राहतात. बाकीचा भाग टाऊनहॉलने व्यापला आहे. टाऊनहॉलच्या समोर मुख्य पोलीस ठाणें आहे. पलीकडे कांही अंतरावर नागपूरचा जुना किल्ला आहे. तो गोंड राजांनी बांधला. पण हल्ली तो मोडकळीस आलेला आहे.

शहराच्या या भागांतून मुख्य पेठ जी इतवारी बाजार तिकडे आम्ही गेलों. एक दोन नवीन व ठळक रस्ते सोडलें, तर बहुतेक वस्तीमध्ये अरुंद रस्ते, घाणेरडे बोळ यांचीच गर्दी जास्त दिसते मात्र व्यापारउदीम व शिक्षण या बाबतींत नागपूर हें मध्यप्रांतांतील कोणत्याहि शहरापेक्षा फार पुढारलेलें आहे. इतवारी भागांतून जातांना नागपूरच्या व्यापाराची फार चांगली कल्पना येते. दोन्ही बाजूंस सर्व तऱ्हेच्या मालाने भरगच्च भरलेलीं दुकानें आणि गाड्यांची, मोटारींची व

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

इतवारी बाजार, नागपूर.

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri



इतवारी बाजार, नागपूर.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

माणसांची चिकार गर्दी या भागांत दिवसभर दिसेल. नागपूर पूर्वीपासून रेशीमकाठी धोतरें व लुगडीं यांबद्दल प्रसिद्ध आहे. म्हणून येथे कोष्टी लोकांची वस्तीहि मोठी आहे.

शहरांतील प्रमुख इमारती म्हणजे टाउनहॉल, हिस्लॉप कॉलेज, नील सिटी व न्यू इंग्लिश हायस्कुलें, मेयो हास्पिटल व शेठ जमनादास पोद्दार यांचें राममंदिर व धर्मशाळा ह्या होत. राममंदिरांतील मूर्ति व एकंदर व्यवस्था फार वर्णनीय आहे.

एवढा भाग पाहून त्या दिवशीं आम्ही परत आलों. यापुढील मजकूर पुढच्या पत्रीं लिहीन. कळावें. हा आशीर्वाद.

तुझा प्रिय बंधु

जगन्नाथ

प्रश्न

(१) स्मृति चांचणी :—(१) नागपूर येथील प्रेक्षणीय स्थळें कोणतीं ? (२) रेशीमकाठी धोतरें कोठे खरेदीकराल ? कां ? (३) तुम्ही नागपूरास गेलां तर कोणत्या धर्मशाळेंत उतराल ? कां ? गोंड राजाचा किल्ला कोठे आहे ?

(२) टिपणें लिहा :—सीतावर्डी; शुक्रवार तलाव; राममंदिर.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

धडा १६ वा

नागपूरची सफर

पत्र २ रें

नागपूर, ता. ९-४-३०

प्रियबंधु जनार्दन यास,

अनेक आशीर्वाद विशेष.

शहर पाहून झाल्यावर दोन दिवस हिंडून आम्हीं सिव्हिल स्टेशन व आसपासचा भागहि पाहिला.

सीताबर्डी हें एक दुमदार उपनगर किल्ल्याच्या पायथ्याशीं पूर्वीपासूनच वसलेलें होतें. पण अलीकडे त्याची वस्ती फारच वाढली आहे. येथून सरकारी आफिसें वगैरे जवळ पडतात, म्हणून येथील वस्ती मुख्यत्वें सरकारी नोकर, वकील वगैरेंचीच जास्त आहे. मात्र रस्ते वगैरे शहरांतील रस्त्यांसारखेच अरुंद व वाकडेतिकडे आहेत.

सीताबर्डीचे दक्षिणेस नागनदीचे पळीकडे धनतोली (उर्फ क्रॉक टाउन) ची नवी वसाहत अलीकडे झाली आहे. येथे सरळ आखलेले रस्ते व प्रशस्ते बंगले दृष्टीस पडतात. या भागांत सरकारी नोकर, वकील, डॉक्टर वगैरे लोकांच वस्ती अधिक आहे. नागपूर हें मध्यप्रांताच्या राजधानीचें शहर असून हिंदु

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

स्थानच्या जवळ जवळ मध्यभागीं वसलेलें आहे. त्यामुळे येथील वस्तीहि मिश्र जातींची आहे. बंगाली, पंजाबी, मद्रासी व महाराष्ट्रीय अशा सर्व लोकांचीं घरें अगदीं शेजारीं शेजारीं येथे सापडतील. हिंदु राहाणीच्या दृष्टीने हाच भाग सर्वांत सोईचा आहे.

सीताबर्डीच्या पश्चिमोत्तर दिशेस सिव्हिल स्टेशन आहे. ही नवीन वस्ती उंचवटयाच्या भागीं वसलेली, अधिक स्वच्छ व प्रेक्षणीय आहे. सिव्हिल स्टेशन म्हणजे सरकारी आफिसें; मोठे मोठे सरकारी ऑफिसर, श्रीमान, सुखवस्तु, धंदेवाले व व्यापारी इत्यादिकांचे बंगले ज्या भागांत आहेत, अशी वस्ती; मोठ्या सरकारी ऑफिसरांत युरोपियनांची संख्या बरीच असते. ती युरोपियन वस्ती व तिला उपयोगी अशा वस्तु पुरविणारा सदर बाजार हीं याच भागांत आहेत.

या सर्व भागांत पूर्वी भोसल्यांच्या वेळीं बगीचे वगैरे होते. महाराजबागहि त्याच वेळची. या बागेंत एक शिकारखानाहि ठेवण्यांत आला आहे. महाराजबागेंतच परलोकवासी महाराणी व्हिक्टोरिया यांचें स्मारक म्हणून व्हिक्टोरिया टेक्निकल इन्स्टिटयूटची इमारत बांधलेली आहे. येथे हल्ली शेतकी कॉलेज असतें. महाराज बागेशेजारीच नागपूर युनिवर्सिटी, सायन्स कॉलेज, मारिस कॉलेज. पटवर्धन हायस्कूल, अजबखाना अथवा म्यूझियम वगैरे शिक्षणसंस्था आहेत.

सीताबर्डीचा किल्ला अजूनहि चांगल्या मजबूत स्थितींत

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri



(व्हिक्टोरिया टेक्निकल इन्स्टिट्यूट, महाराजबाग, नागपूर.)

आहे. त्यावर एक लहानशी सैन्याची तुकडी व बिनतारी तारायंत्राचें स्टेशन आहे.

किल्ल्याच्या उत्तरेकडील एका टेकडीवर गवर्नमेन्ट हाऊस- मध्यप्रांताच्या गवर्नरसाहेबांचा बाडा—आहे. या पलीकडे एक लांबट टेकडी आहे. तिच्या पलीकडच्या बाजूस गोरेवाडा तलावांतून आणलेल्या पाण्याचा खजीना आहे. मूळचा पाणी- पुरवठा अंबाझरी व तेलिनखेडी तलावांतून होत असे. तें पाणी पुरेनासें झालें, तेव्हा हा गोरेवाडा तलाव बांधला. तरी अद्याप शहरच्या वाढत्या वस्तीस पुरेसा पाणीपुरवठा नाही.

सिव्हिल स्टेशनची मुख्य वस्ती या दोन टेकड्यांच्या खालच्या बाजूस आहे. यांतील रस्ते फार रुंद, स्वच्छ असे आहेत. बहुतेक बंगल्यांभोवतीं विस्तीर्ण आवारें आहेत. मध्य-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

प्रांताची मुख्य कचेरी (सेक्रेटेरिअट), मुख्य (जनरल) पोस्ट आफिस, मुख्य न्यायमंदिरें वगैरे इमारती याच भागांत आहेत. युरोपियन लोकांचा सी. पी. क्लब, शर्यतीचें गोल मैदान; क्रिकेट, पोलो गॉल्फसारखे खेळ खेळण्याचीं सुंदर मैदानें यांनी या भागास विशेष रमणीयता आली आहे. युरोपियन मुलामुलींच्या शाळाहि याच भागांत आहेत.

नागपूरची वस्ती फारच झपाट्याने वाढत आहे, गेल्या खानेसुमारींत ती सुमारे दीड लाख होती; पण आता ती तीन लाखांच्या वर गेली आहे. येवढ्या वस्तीस पुरण्यासाठी शहराची आणखी देखील वाढ करणें आवश्यक वाटूं लागलें आहे. यामुळे अंबाझरी तलावाच्या रस्त्यानजीक शेतकी कालेजापलीकडे धरमपेठ नांवाची नवी वस्ती होऊं लागली आहे; अशा कितीतरी नवीन पेठा वसणार आहेत असें म्हणतात.

असो. वरील वर्णनावरून तुला नागपूरची थोडी बहुत कल्पना येईल असें वाटतें. तथापि प्रत्यक्ष पाहणें वेगळें व वर्णन वेगळें. बाबांचें काम दोन दिवसांत संपेल; मग आम्ही परत निघूं. येतांना तुझ्यासाठी संत्र्यांचें पार्सल आणूं कळावें, हा आशीर्वाद.

तुझा प्रिय बंधु

जगन्नाथ

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

प्रश्न

(१) खरें किंवा खोटें हें लिहा.

(१) सिव्हिल लाईन मध्ये सरकारी नोकरांची वस्ती कमी आहे—

(२) महाराजबाग भोसल्यांच्या वेळचीच आहे—

(२) स्मृति चांचणी—१ नागपुरांत कोण कोणतीं प्रेक्षणीय स्थळें आहेत ? २ नागपुरांत कोठून पाणी मिळतें ?

धडा १७ वा

शबरीगीत

[शबरी ही एक वृद्ध व रानटी भिल्लीण होती. श्रीरामचंद्राचें दर्शन आपणास केव्हा होईल अशी उत्कंठा तिला लागली. रामचंद्राला उपहार म्हणून तिने उष्टीं बोरें दिलीं. रामचंद्रानेहि हीं उष्टीं बोरें भिल्लिणीच्या प्रेमासाठी मोठ्या आवडीने खाल्लीं !]

(चाल—गजलाची)

लतांनो ! सांगुं कां तुम्हां उद्यां श्रीराम येणार
वनाला सर्व ह्या आता खरा आनंद होणार ॥ १ ॥
तुम्हां कोठूनिया ठावा कसा श्रीराम तो आहे ?
सुखस्यंदी झरा तेथे सदाचा वाहतो आहे ॥ २ ॥

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

उद्यां पाहाल डोळ्यांनी सुखाचा पूर्ण आराम;
मुखें लागाल घोकाया जय श्रीराम श्रीराम ॥ ३ ॥
बघोनी नाथ हर्षाने मला उन्माद येईल;
नका आणूं मनामाजीं चुकोनी दोष होतील ॥ ४ ॥
लतांनो द्याल ना पुष्पें ? झऱ्यांनो द्याल ना पाणी ?
पहा हीं अर्पिलीं कशीं फळें या थोर वृक्षांनी ॥ ५ ॥
नव्हे कोठूनि हीं उष्टी, जराशीं चाखलेलीं हीं !
कडू कच्चीं फळें रामा कशी देईन ग बाई ? ॥ ६ ॥
उद्यां श्रीराम येऊं दे तुम्हांला मीच दावीन;
फळें हीं त्यास अर्पोनी सुखें त्या पायिं लोळेन ॥ ७ ॥

वा. गो. मायदेव.

प्रश्न

(१) स्मृति चांचणी—(१) शबरीची कथा सांगा. (२) शबरीने रामास उष्टीं बोरें कां खाऊं घातलीं ? (३) रामाने उष्टीं बोरें कां खाल्लीं ? शबरीने झरे वेली, यांची प्रार्थना कशासाठी केली ? देव कशाचा भुकेला असतो ?

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

धडा १८ वा

कर्जापायीं बेजार झालों

हणमंतराव:—राम राम, ग्यानबा पाटील ! केव्हा आलां ?

ग्यानबा:—राम राम, भाऊसाहेब, आताच आलों. थोडा बाजार करावयाचा होता, म्हणून आलों.

हणमंतराव:—कसें काय ? पीकपाणी ठीक आहेना यंदा तुमच्या गावीं ? बहुतकरून आबादानीच असेल.

ग्यानबा:—पाऊसपाणी बरें झालें यंदा. कपाशीला भावहि बरा आहे; पण—(घुटमळतो).

हणमंतराव:—का हो; असे घुटमळलां कां ? तुमच्या चेहऱ्यावरून कांही ठीक नाही दिसत बस्तान ?

ग्यानबा:—खरें ओळखलेंत भाऊसाहेब ! अहो, या कर्जापायीं अगदी बेजार झालों आहे पहा.

हणमंतराव:—याला कोण काय करणार ? आधीं कर्ज काढायचें व मग असें रडत बसायचें ही रीतच आहे तुम्हां शेतकऱ्यांची !

ग्यानबा:—पण भाऊसाहेब, कर्ज काढल्याखेरीज का कोठे चालत असतें ? पण हे सावकार पहा अगदी चोर आहेत; चोर सुद्धा पत्करले; पण हे दिवसाढवळ्या राजरोस लुटतात आम्हांला.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

हणमंतरावः— पाटील, तुमच्या बोलण्याचा अर्थ वाटतो मला. अहो, सावकार का कर्ज घ्या म्हणून तुमच्या पाठोशीं लागतो, त्याच्यापाशीं फौजफाटा असतो कां तुमच्या जवळचा पैसा व चीजवस्त लवाडायला, आहे तरी काय ? तुम्ही होऊनच जातां ना त्याच्याकडे कर्ज मागायला ?

ग्यानबाः—होय. आम्हीच जातों खरे. पण जाऊं नये तर काय करावें ? पट्टी भरण्याची वेळ आली म्हणजे वेळेला पैसे नसतात आम्हांजवळ. मग पाहावें लागतें सावकाराचें तोंड ! परवां मुलांचें लग्न केलें. मुलाकडच्यांनी मागितले रुपये पांचशें; व आहेराला लागले पांचशें. नको अशा वेळीं सावकाराची पायरी चढायला ?

हणमंतरावः—(हसून) अलबत्. तुम्ही प्रथम वाटेल तसा खर्च करावा, आपल्या उत्पन्नाकडे पाहूं नये; व मग गरज लागली म्हणजे सावकाराकडे जावें; व तो वेळेवर उपयोगी पडला म्हणून त्याला पुनः शिव्या द्याव्या, हा खासा न्याय !

ग्यानबाः—अहो, आमच्या पिंपळगावचा सावकार माहीत नाही तुम्हांला. पक्का मारवाडी आहे ! अहो माझ्या लहानपणीं हिंगजिऱ्याच्या पुड्या बांधीत होता. आता साऱ्या गावाचा सावकार होऊन बसला आहे ना ! माझें राहतें घरसुद्धा परवां घेतलें त्याने. साऱ्या गावाला पिळून काढलें त्याने !

हणमंतरावः—म्हणजे, तो व्याज घेतो येवढेंच ना तुमचें म्हणणें ? त्याने आपला पैसा तुम्हांला वापरावयाला दिला.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

तर तुम्ही त्याला त्याबद्दल कांही मोबदला द्यावयास नको का ? कोणी घर भाड्याने दिलें, किंवा आपला नांगर भाड्याने दिला तर तुम्हीं त्याला लवाड म्हणतां का ? मग पैसा भाड्याने दिला तर त्याबद्दल येवढा राग कां ? व्याज म्हणजे पैशांचें भाडें, दुसरें काय ?

ग्यानबाः—हें खरें भाऊसाहेब. पण हे लवाड सावकार भराभर व्याज वाढवून दामदुप्पट करतात; मग आमच्या हातून तें कर्ज फिटत नाही व घर, शेत, दागदागिने सर्व सावकाराच्या घरांत जातात ! वर्षभर रावून आम्ही शेतकी करतों व हे सावकार घरीं बसून आम्हांला लुबाडतात !

हणमंतरावः—तुम्ही म्हणतां तसा एखादा लवाड सावकार असेल; व तो खोटा हिशेब करून व्याजाची रक्कम फुगवीतहि असेल. पण याला सुद्धा कारण तुम्हीच.

ग्यानबाः—म्हणजे ? मी नाही समजलों.

हणमंतरावः—मी सांगतों कसें तें. पहिली गोष्ट ही की, तुम्ही खेडवळ शेतकरी उत्पन्न पाहून खर्च करीत नाही. तुमचें वर्षाचें उत्पन्न पांचशें रुपये असलें, तर खर्च सातशें रुपये असायचा. म्हणजे कर्ज काढण्याची पाळी आलीच की नाही ! पण हा सातशें रुपये खर्च तुम्ही कां करावा ? मागचा पुढचा विचार करून माणसाने नेहमी दोन पैसे पदरीं शिल्लक टाकावे. जे जे गरिबींतून श्रीमंत झाले. ते अशा काटकसरीने झाले. पैसा

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मिळविला तरी तो राखतां आला पाहिजे. जरा स्पष्ट बोलतों, राग मानूं नका. तुम्ही नुकतेंच म्हणालां की, पोराच्या लग्नांत हजार रुपये कर्ज झालें ! कशाला हो केलेंत एवढें थाटांत लग्न ? भाऊबंदांना व गावच्या लोकांना मेजवान्या देण्यांत, बाजेवाजंत्री वाजविण्यांत व कपड्यालत्यांची खैरात करण्यांत पैसा उधळलात; आता तुमचें कर्ज फेडण्याला येतो आहे का कोणी सगासोयरा ?

दुसरी गोष्ट म्हणजे तुमचा अडाणीपणा. तुम्ही खेड्यांतले लोक म्हणजे अगदी अक्षरशत्रु असावयाचे. साधे बे दुणे चार सुद्धा तुम्हांला ठाऊक नसावयाचे. सही करण्याचीसुद्धा मारा मार ! मग तुम्हांला कोणीं हिशेबांत फसविलें तर काय आश्चर्य ?

तिसरें असें की, सरकारने तुमच्याकरितां कांही सोई केल्या आहेत. पोष्टांत पैसा ठेवण्याची सोय केली आहे; तुम्हां गरीब शेतकऱ्यांना कमी व्याजाने कर्ज मिळावें, तुमची फसवणूक होऊं नये, म्हणून सहकारी पेढ्या काढल्या आहेत. पण तुम्ही लोक त्याचा फायदा घ्याल तेव्हा ना !

ग्यानबाः—भाऊसाहेब, खरेंच तुमचें म्हणणें पटतें मला. मींहि ऐकलें आहे या पेढ्यांबद्दल; पण मला त्यांची माहिती नाही. मला तर माहिती सांगाल का ?

हणमंतरावः—मोठ्या खुशीने. उद्यांच या. मी सांगेन तुम्हांला जरूर ती माहिती.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

प्रश्न

(१) स्मृति चांचणी—(१) ग्यानबा कर्जापायीं बेजार कसा झाली ? (२) हणमंतरावाने शेतकऱ्यांचे कोणते दोष दाखविले ? (३) सरकारने शेतकऱ्यांना कमी व्याजाने कर्ज मिळावे म्हणून कोणती सोय केली आहे ? शेतकरी पैसा कसा उधळतात ?

(२) चूक किंवा बरोबर हें लिहा.

(१) सावकार दिवसाढवळ्या राजरोस लुटतात.....

(२) पिंपळगावच्या मारवाड्यानें साऱ्या गावाला पिळून काढलें.

धडा १९ वा

सहकारी पेढ्या

दुसऱ्या दिवशीं ग्यानबा पाटील हणमंतरावाकडे आले व सहकारी पेढ्यांविषयी विचारूं लागले. तेव्हा हणमंतराव त्यांना म्हणाले:—

पाटील, तुम्हांला आंधळा व लंगडा यांची गोष्ट माहीत असलेच. आंधळ्याला दिसत नव्हतें व लंगड्याला चालतां येत नव्हतें. पण आंधळ्याने लंगड्याला आपल्या खांद्यावर घेतलें व लंगड्याने त्याला वाट दाखविली. याप्रमाणे दोघांनी किंवा

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

दोहोंहून अधिक माणसांनी मिळून काम करणें याला सहकारिता असें म्हणतात.

समजा, एक कापडाचें दुकान काढावयाचें आहे. एकाजवळ पुरेसें भांडवल नाही. अशा वेळीं दहा-पांच असामींनी मिळून जर आपली थोडी थोडी पुंजी एकत्र केली, तर भांडवल सहज जमा होतें अशाच तऱ्हेने पुष्कळ व्यापारी मंडळ्या शहरांत मोठीं दुकानें चालवितात.

याच पद्धतीवर अलीकडे सहकारी पेढ्या काढतात. यांना को-आपरेटिव्ह बँक असें इंग्रजींत म्हणतात. खेड्यांतील गरीब शेतकरीवर्गाला हलक्या व्याजाने शेतकीला लागणारें भांडवल मिळावें व सहकारितेची सवय लावून शेतकऱ्यांना आपल्या पायावर उभें राहण्यास शिकवावें, हा यांचा उद्देश असतो. धंदेवाईक सावकार व पेढीवालेहि उपयुक्त काम करतात. पण त्यांची नजर साहजिकपणेंच स्वतःच्या फायद्याकडे असते; व यामुळे शेतकऱ्यांचें बऱ्याच वेळां नुकसान होतें. पण सहकारी पेढींत सावकार तेच व कर्जदारहि तेच असतात. तें कसें, हें आता आपण पाहूं.

गावांतील दहा किंवा अधिक शेतकरी मिळून एक पतपेढी (को-आपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी) काढूं शकतात. पेढीचे सभासद होण्यासाठी कमींत कमी पांच रुपयांचा एक भाग घ्यावा लागतो. पेढी सरकारी रजिष्टरखात्यांत नोंदवावी लागते. मात्र या नोंदणीस फी द्यावी लागत नाही अशा तऱ्हेने

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

बनलेल्या सोसायटीस सेंट्रल म्हणजे मध्यवर्ती बँकेकडून कर्ज मिळतें. मध्यवर्ती पेढ्या जिल्ह्याच्या किंवा इतर प्रमुख ठिकाणीं असतात. त्याहि आपलें भांडवल भाग काढूनच जमवितात. ह्या इतर बँकांप्रमाणे पैशाच्या ठेवी ठेवून घेतात व त्यावर व्याज देतात. सर्व प्रांताची एक मुख्य बँक (प्राव्हिन्शिअल बँक) नागपूर येथे आहे. या सर्व छोट्या व मोठ्या पेढ्यांचा कारभार व्यवस्थितपणे चालावा व त्यांना भांडवलाची अडचण पडूं नये, म्हणून सरकारने त्यांजवर देखरेख करणारें एक स्वतंत्र खातें ठेवलें आहे. त्याच्या मुख्य अंमलदारास 'रजिस्ट्रार को-आपरेटिव्ह क्रेडिट सोसायटीज' असें म्हणतात.

असो; आता आपण खेडेगावच्या पतपेढ्यांचा व्यवहार कसा चालतो हें पाहूं. कोणाहि सभासदास कर्ज लागलें की, तो सोसायटीकडे अर्ज करतो. हें कर्ज कशासाठी मागितलें आहे, याची चौकशी सोसायटीचे पंच करतात. सभासदांखेरीज इतरांस कर्ज मिळत नाही व शेतकामाखेरीज इतर कामासाठीहि बहुधा मिळत नाही. कर्ज बहुधा एक साधी चिठ्ठी लिहून घेऊन हातावर देतात. पण पंचांस आवश्यक वाटल्यास शेत घर वगैरेंचें तारण लावून घेतात. यालाहि स्टँपखर्च लागत नाही. मात्र सोसायटीच्या दोघा सभासदांना कर्जाबद्दल जामीन राहावें लागते; अर्थात् ऋणकोकडून कर्ज वेळेवर फिटलें नाही तर तें जामीनदारास भरावें लागते. व्याजाचा दर सावकारी दरापेक्षा फार कमी असतो. कारण नफा

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मिळविणें हा या पेढ्यांचा उद्देशच नसतो. यावरून तुमच्या लक्षांत आलेंच असेल की अशा पेढ्यांत सावकारहि तेच व कर्जदारहि तेच असतात. त्यांचे भांडवल समाईक असतें व त्या सहकारितेच्या तत्त्वावर चालतात. या पेढ्यांचा कारभार त्यांतील सभासदांनी निवडलेल्या पंचांकडूनच चालतो. तुमच्यासारख्या शेतकऱ्यांनी उठल्या सुटल्या सावकाराकडे न जातां शेत कामासाठी लागणारें कर्ज काढण्यास अशा पतपेढ्यांकडे जाणें फार चांगलें, असें मला वाटतें.

ग्यानबाः—खरेंच भाऊसाहेब. मला फार आनंद झाला हें ऐकून. मी आता आपल्या गावच्या लोकांना सांगेन व अशी सोसायटी काढण्याची खटपट करीन.

प्रश्न

(१) स्मृति चांचणी—(१) सहकारी पेढी म्हणजे काय ? (२) सहकारी पेढी कशी काढावी लागते ? (३) या पतपेढीचा कारभार कसा चालतो हें थोडक्यांत लिहा. (४) पतपेढी पासून कोणते फायदे होतात ?

(२) कृतिपरः—(१) तुम्ही वर्गांत सहकारी पतपेढी स्थापन करा व तिचा कारभार चालवून दाखवा.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

धडा २० वा

थोरले बाजीराव पेशवे

भाग १ ला

शाहू महाराज इ. स. १७०७ मध्ये औरंगजेबाच्या कैदेंतून सुटून आले व त्यांनी धनाजी जाधव व बाळाजी विश्वनाथ भट यांच्या मदतीने ताराबाईशीं लढून सातारची गादी मिळविली त्यावेळीं बाळाजी विश्वनाथाने राजकारणांत इतकें कौशल्य दाखविलें की शाहूमहाराजांनी त्यास इ. स. १७१४ सालीं आपला पेशवा – मुख्य प्रधान—नेमलें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

बाजीराव हा बाळाजीचा मुलगा. लहानपणापासून त्यास लष्करी बाण्याचें शिक्षण मिळालें होतें व जन्मतःच तो निधड्या छातीचा शिपाई होता. शिवाय बाळाजीबरोबर स्वारीशिकारीला व साताऱ्यास शाहूमहाराजांच्या भेटीला बाजीराव नेहमी जात असे. त्यामुळे राजकारणांत त्याची गति चांगली होत चालली होती. बाजीरावाचा चेहरा मोहक व आनंदी होता. शाहूची त्यावर अतोनात मर्जी बसली. बाळाजी इ. स. १७२० सालीं मरण पावल्याबरोबर शाहूने पेशवाईचीं वस्त्रें बाजीरावासच दिलीं.

बाजीरावाचें धोरण नेहमी चढावाचें असे. त्याचा पिता बाळाजी विश्वनाथ याने मोठ्या कुशलतेने मोगल बादशाहाकडून चौथाई सरदेशमुखीच्या सनदा मिळविल्या होत्या. त्यांच्या जोरावर उत्तरेकडील मोगलाई मुलखावर स्वाऱ्या कराव्या व तिकडे मराठेशाहीचा अंमल बसवावा, असें त्याचें मत होतें. बाजीरावाने आपल्या मताचें मोठ्या आवेशाने समर्थन केलें व आपल्या धोरणास शाहूमहाराजांची संमति मिळविली. बाजीरावाच्या उत्तरेकडील मोहिमांस शाहूमहाराज कधी फारसे आड आले नाहीत. बाजीरावाने गुजराथ व माळवा प्रांतावर स्वाऱ्या करून ते प्रांत मराठ्यांच्या अमलाखाली आणले व तेथे चौथ व सरदेशमुखीचा वसूल धडाक्याने सुरू केला.

याच सुमारास निजामाच्या राज्याचा संस्थापक निजामउलमुल्क हा दक्षिणचा सुभेदार होऊन आला. मराठ्यांच्या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आपसांतील कलहांचा फायदा घेऊन आपलें बस्तान दक्षिणेंत कसें बसवितां येईल व मोगल बादशाहीचें कसें संरक्षण करतां येईल इकडे त्याचें सारखें लक्ष असे. त्याने कोल्हापूरचा राजा संभाजी याशीं कारस्थान सुरू केलें. बाजीरावाने प्रथम कोल्हापूरकरांचा बंदोबस्त केला व मग निजामाचाहि सडकून पराभव केला.

बाजीरावास माणसाची पारख फार चांगली असे व चांगलें काम करणाऱ्या शिपायास तो लवकर बढती देई. यामुळे लवकरच राणोजी शिंदे, मल्हारराव होळकर, उदाजी पवार, पिलाजी गायकवाड, पटवर्धन असे अनेक शूर व कर्तबगार सरदार त्याच्या हाताखाली नांवारूपास चढले. शिंदे, होळकर व पवार यांच्याच मदतीने बाजीरावाने माळवा पादाक्रांत केला. गुजराथेंत तेथील कारभार बाजीरावाच्या वतीने पिलाजी गायकवाड पाहूं लागला. हाच बडोदे राज्याचा संस्थापक होय. राणोजी शिंदे हा प्रस्तुतच्या ग्वालियर रियासतीचा आद्य पुरुष; व त्याचप्रमाणे मल्हारराव होळकर हा इंदोर राज्याचा संस्थापक होय. उदाजी पवाराचे वंशज अद्याप देवास व धार येथे राज्य करीत आहेत.

प्रश्न

(१) चूक किंवा बरोबर हें लिहा.

(१) शाहू महाराजांनी ताराबाईशीं लढून गादी मिळविली नाही.....

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

(२) बाजीराव जन्मतःच निधड्या छातीचा शिपाई होता.....

(२) समानार्थी शब्द सांगा. (१) कारस्थान (२) पारख (३) संस्थापक (४) रियासत.

धडा २१ वा

थोरले बाजीराव पेशवे

भाग २ रा

बुंदेलखंडांत मराठ्यांचा प्रवेश झाला. त्या वेळीं बुंदेलखंडचा पराक्रमी राजा छत्रसाल वृद्ध झाला होता. त्यावर महंमदखान बंगष याने स्वारी केली. छत्रसालच्या मुलांत त्याच्याशीं सामना करण्याचा दम नव्हता. अशा स्थितींत त्याने बाजीरावास एक कवितावद्ध हिंदी पत्र लिहून स्वतःच्या बचावासाठी येण्याची विनंती केली. त्या पत्रांत पुढील दोहा होता.

जो गति ग्राह गजेंद्र की सो गति भइ है आज ।
बाजी जात बुँदेल की, राखो बाजी राज ॥

अर्थात् "गजेंद्राला नक्राने धरलें त्या वेळीं त्याची जी अवस्था

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

झाली तीच आज माझी झाला आहे. बुंदेलखंडाची अब्रू जात आहे. तिचें, हे बाजीराया, विष्णूप्रमाणे तूं रक्षण कर."

हें पत्र येतांच बाजीराव तातडीने उत्तरेकडे गेला व जैतपुर येथे बंगषास गाठून त्याने त्याचा फडशा उडविला. छत्रसाल अगदी खूष झाला व त्याने बाजीरावास आपला तिसरा पुत्र माणून राज्याचा तिसरा हिस्सा त्यास बक्षीस दिला. या युद्धांत गोविंदपंत खेर याने फार पराक्रम केला. म्हणून बाजीरावाने या नवीन मुलखावर त्यास सुभेदार नेमलें. यासच पुढे गोविंदपंत बुंदेले असें म्हणूं लागले. जबलपूर येथील सागरवाले राजेसाहेब याच गोविंदपंताचे वंशज आहेत.

बाजीरावाचा धाकटा भाऊ चिमाजी आप्पा बाजीरावास शोभेल असाच होता, या दोघांना लोक रामलक्ष्मण म्हणत. पश्चिम किनाऱ्यावर ठाणें, वसई या भागांत पोर्तुगीज लोकांनी फार उपद्रव देण्यास सुरवात केली होती. चिमाजी आप्पाने वसईस वेढा दिला. किल्ला फार मजबूत. प्रथम सर होईना; तेव्हा चिमाजी आप्पा म्हणाला, "मी वसई घेतल्याशिवाय परत फिरणार नाही. निदान माझें डोकें तरी उडवून किल्ल्यांत पडेल असें करा." या निश्चयी शब्दाने शिपायांत हिंमत चढली व त्यांनी सुरुंग लावून किल्ला सर केला. व कोकणांताल पोर्तुगीजांचें बंड कायमचें मोडलें.

इतक्यांत उत्तरेकडून अशी खबर आली की, इराणच्या नादीरशाहाने दिल्लीवर स्वारी करून दिल्ला लुटली. अशा वेळीं

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

हिंदु मुसलमानांनां एक झालें पाहिजे व परक्या शत्रूशीं सामना केला पाहिजे असें बाजीरावाचें मत होतें. त्याप्रमाणे नादीरशाहाशीं टक्कर देण्यासाठी बाजीरावाने कांही सैन्य उत्तरेकडे रवाना केलें; व वसई सर झाल्यावर आणखीहि सैन्य तो पाठविणार होता; पण इतक्यांत नादीरशहा परत फिरल्याची बातमी आली. यानंतर थोड्याच दिवसांत बाजीराव आकस्मिक रीतीने नर्मदातीरीं रावेरीनजीक मरण पावला.

बाजीराव शूर व दिलदार शिपाईगडी होता. तो शिपायांशी अगदी बरोबरीच्या नात्याने वागे व त्यांच्या सुखदुःखाची काळजी वाही. तो इतका साध्या वृत्तीचा होता की, घोड्यावर दौड करतां करतां ज्वारीचीं कणसें हातानेच चोळून त्याच्या फक्त्या मारी. त्यामुळे शिपाई त्याच्या जिवास जीव देण्यास मागे पुढे पाहत नसत मुत्सद्दीपणांत तो वडीलाइतका चतुर नव्हता, कर्जाच्या भाराखाली तो अगदी बेजार असे. तथापि हिंमतबहादर मराठे वीरांत त्याचा दर्जा मोठा आहे.

त्याला बाळाजी बाजीराव (नानासाहेब), रघुनाथराव व जनार्दनपंत असे तीन मुलगे झाले होते. यांपैकी जनार्दनपंत लहानपणींच वारला व बाळाजी पेशवेपदावर आरूढ झाला.

प्रश्न

(१) स्मृति चांचणी:—(१) बाजीरावाचें चरित्र थोडक्यांत लिहा. (२) छत्रसालाबद्दल थोडक्यांत माहिती सांगा. (३) बाजीरावाचें स्वभाव वर्णन करा.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

(४) छत्रसालाच्या पत्रांतील दोहा अर्थासह लिहा.

(२) कारणें सांगाः—(१) छत्रसालांत व त्याच्या मुलांत महंमद बंगषाशीं सामना करण्याचा दम नव्हता कारण.....

(२) चिमाजी आप्पाने वसई घेऊन पोर्तुगीजांचें बंड कायमचें मोडलें कारण.....

(२) खरें किंवा खोटें हें लिहा.

(१) बाजीराव कर्जाच्या भाराखाली बेजार नसे.....

(२) बाजीराव दिलदार शिपाई गडी होता.....

धडा २२ वा

चहा

दादासाहेब व त्यांच्याकडे नुकतेच आलेले पाहुणे सकाळचा चहा घेत बसले होते. पाहुण्यांना दादासाहेबांनी कप देतांना विचारलें—

"कसें काय नागोपंत. चहा आवडतो ना तुम्हांला ? तुमच्या तिकडे कसा काय प्रसार आहे चहाचा ?"

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

नागोपंतः—हो; घेतों कधी कधी थोडासा. आमच्या नागभीडसारख्या जंगली मुलखांत कोठला याचा फार प्रसार असायचा ? पण मी नागपूरला आलों की, एखादा पुडा घेऊन जातों. कोणी आपल्यासारखा पाहुणा आला म्हणजे पडतो उपयोगी. पण, दादासाहेब, ही आहे तरी काय चीज व ती कशी बनवितात ?

दादासाहेबः—चहा म्हणजे एका झाडाचा वाळलेला पाला. पण या पाल्याने मोठ्यामोठ्यांना वेड लावलें आहे खास. इंग्रज लोकांत तर कांही विचारूं नका. एखादे दिवशीं जेवण मिळालें नाही तरी चालेल; पण चहा हा दोनदा तरी हवाच ! हा पदार्थ मूळचा चीन देशांतला. 'चा' हा शब्द सुद्धा चिनी भाषेंतलाच आहे. आता हा इतर देशांत-विशेषें—करून आपला हिंदुस्थान व सिलोन या देशांत-होतो. पण अजून सुद्धा इतर कोणत्याहि देशापेक्षा जास्त चहा चीन देशांतच पिकतो. चिनी लोक जबरदस्त चहा पिणारे आहेत. ते आपल्याप्रमाणे दूध व साखर घालून चहा घेत नाहीत. नुसता चहा उकळलेलें पाणी काढ्याप्रमाणे पितात !

नागोपंतः—राम राम ! हा काढा कसा आवडतो त्यांना ?

दादासाहेबः—अहो, हा केवळ सवयीचा परिणाम. चहा जरा जास्त उकळला म्हणजे त्यांत थोडा मादकपणाहि येतो. मग तो घेण्याचें एक प्रकारचें व्यसनच जडतें. पण तुम्हांला चहाच्या झाडाविषयी माहिती सांगावयाची राहिली.

चीन, हिंदुस्थान व सिलोन हे देश चहाच्या लागवडीला

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अत्यंत सोईचे आहेत. हे प्रदेश उष्ण असून त्यांत पाऊस भरपूर पडतो. हिंदुस्थानांत आसाम व निलगिरीचा प्रदेश हीं चहाचीं मुख्य उत्पत्तिस्थानें आहेत. चहाचे बहुतेक मळे युरोपियन व्यापाऱ्यांचे आहेत. अलीकडे मात्र बंगाली लोकांनी कांही देशी कंपन्या काढलेल्या आहेत.

प्रत्येक मळ्यांत लहान मोठे विभाग असतात व त्यांत चहाची झाडें ओळीनें लावतात. प्रत्येक ओळीमधून माणसांना हिंडतां फिरतां येईल इतकी जागा सोडलेली असते. चहाचें झाड वारमहा हिरवेंगार राहतें. चहाचें फळ असतें तें लहानशा बोराएवढें असतें व त्याच्या बिया पेराव्या लागतात.

पहिलीं तीन वर्षेंपर्यंत चहाचीं पानें तोडीत नाहीत. त्यांस चांगला वास व लज्जत येत नाही. झाडाला वरचेवर छाटतात व पांचसहा फुटांपेक्षा उंच वाढूं देत नाहीत. त्यामुळें तें वाटोळें गरगरीत दिसतें. चहाचीं फुलें लहान व सफेद रंगाचीं असतात. फुलें व फळें यांचा आपणांस कांही उपयोग नसतो; उपयोगी भाग म्हणजे फक्त पानें. हीं काळसर हिरव्या रंगाचीं चमकदार असून त्यांना गुलाबाच्या पानासारखी कातर असते.

वर्षांतून तीन किंवा चार वेळां चहाचा तोडा होतो. अर्थात् सर्व पानें एकाच आकाराचीं नसतात; तीं लहान मोठीं असतात. यामुळेच आपण पितों त्या चहांतले वेगवेगळे प्रकार होतात.

चहा तोडण्याच्या कामीं बहुतकरून मजूर बायांची व

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मुलांची योजना होते. प्रत्येकाच्या पाठीशीं एक लांबट टोपली

बांधलेली असते. पानें खुडावयाचीं व तीं मागच्या टोपलींत टाकावयाचीं अशी त्यांची पद्धत असते. झाडांच्या एकेका ओळींच्या टोकाला मोठे हारे ठेवलेले असतात. आपल्या जवळची टोपली भरली की, त्या मोठ्या हाऱ्यांत तीं पानें टाकतात. गोळा केलेल्या पानाच्या वजनावरून मजुरी ठरते साधारणपणें चांगली हुशार बाई २५ शेरपर्यंत पानें एका दिवसांत खुडूं शकते.

यापुढील काम मात्र फार महत्त्वाचें असतें. गोळा केलेलीं पानें प्रथम मोठमोठ्या चटयांवर पसरून मोठीं पानें एकीकडे, व लहान एकीकडे अशी निवड करतात.

यानंतरचें काम हीं पानें वाळविण्याचें. हें दोन प्रकारांनी

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

करतात. एक उन्हांत वाळवून किंवा मंद आगीवर परतून आगीवर वाळवितांना मात्र तीं जळून न जावीं म्हणून फार काळजी घ्यावी लागते.

वाळविल्यानंतर हीं पानें हाताने किंवा यंत्राने वळतात. म्हणूनच तुम्हांला चहाचीं पानें बारीक सुरळी सारखीं दिसतात. वळून झाल्यानंतर त्यांत ओलेपणा अगदी राहूं नये म्हणून पुनः एकदा त्यांना आच देतात. अगदी थंड झालीं म्हणजे वेगवेगळ्या चाळणींत घालून तीं चाळतात. म्हणजे बारीक पानें, मोठीं पानें, चुरा, हीं वेगवेगळीं बनतात. चहांत काळसर व हिरवट असे दोन प्रकार असतात. पहिला प्रकार चांगला व तो अगदी मंद आगीवर पानें सावकाश वाळविल्याने बनतो.

यानंतर पुडे, डबे किंवा मोठ्या पेट्या भरून तो बाहेर रवाना करण्याचें काम राहिलें. हें करणाऱ्या मोठमोठ्या कंपन्या आहेत. लिप्टन, ब्रुक बॉंड वगैरे कंपन्यांचा प्रचंड कारखान्यांतून लक्षावधि रुपयांचा चहा सालीना परदेशीं रवाना होतो !

नागोपंतः—दादासाहेब, चहा घेण्यापासून कांही फायदे आहेत का ?

दादासाहेबः—कांही फायदे आहेत असें मला नाही वाटत. चहा हें एक रुचकर पेय आहे. पण तें पद्धतशीर रीतीनें बनविलें असेल तर ! चांगला चहा करण्याची पद्धत अशीः— प्रथम चहादाणी गरम पाण्याने धुवावी. मग तींत चहाचीं पानें एका कपास अदमासें एक चमचा, या प्रमाणांत टाकावीं

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

नंतर त्यावर आधणाचें पाणी ओतून वर झाकण ठेवावें. सुमारे पांच मिनिटांत पाण्यास पिंगट रंग येतो, असें होतांच चहा दुसऱ्या भांड्यांत गाळून घ्यावा ; मग त्यांत आपल्या आवडी-प्रमाणे दूध व साखर घालून तो प्यावा; चहा जर आधणांत अधिक वेळ राहिला तर तो लाल होऊन त्यामधील मादक व विषारी द्रव्य पाण्यांत उतरतें व तें फार अपाय करतें.

सारांश काय की, चहा नेहमी न घेणें हा उत्तम पक्ष घेतला तर तो भरपूर दूध घालून गरम असतांना घ्यावा. रिकाम्या पोटीं चहाचे कपावर कप ढोसणाऱ्या लोकांची पचनक्रिया खास बिघडते. 'अति तेथे माती' हा नियम चहालाहि लागू आहेच !

प्रश्न

(१) स्मृति चांचणी—(१) चहाच्या झाडाचें वर्णन करा. (२) चहाच्या लागवडीला कोणत्या गोष्टींची गरज असते ? (३) चहाच्या लागवडीचे प्रदेश सांगा.

(२) कारण सांगा—. (१) "अति तेथे माती" कारण— (२) आधणांत अधिक वेळ उकळून लाल झालेला चहा पिणें वाईट. कारण.....

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

धडा २३ वा

स्फुट अभंग

(१)

काय वाणूं आता न पुरे हे वाणी।
मस्तक चरणीं ठेवीतसें ॥ १ ॥
थोरीव सांडिली आपुली परीसें।
नेणे सिवों कैसें लोखंडासी ॥ २ ॥
जगाच्या कल्याणा संतांच्या विभूती।
देह कष्टवीती उपकारें ॥ ३ ॥
भूतांची दया हें भांडवल संतां।
आपुल्या ममता नाही देहीं ॥ ४ ॥
तुका म्हणे सुख पराचिया सुखें।
अमृत हें मुखें स्रवतसे ॥ ५ ॥

(२)

अंतरीं निर्मळ, वाचेचा रसाळ।
त्याचे गळां माळ असो नसो ॥ १ ॥
आत्मा-अनुभवीं चोखाळिल्या वाटा।
त्याचे माथां जटा असो नसो ॥ २ ॥
परद्रव्या अंध निंदेसी जो मुका।
तोचि संत देखा तुका म्हणे ॥ ३ ॥

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

(३)

बोले तैसा चाले। त्याचीं वंदीन पावलें ॥ १ ॥
अंगें झाडीन अंगण। त्याचें दासत्व करीन ॥ २ ॥
त्याचा होईन किंकर। उभा ठाकेन जोडुन कर ॥ ३ ॥
तुका म्हणे देव। त्याचे चरणीं माझा भाव ॥ ४ ॥

(४)

डोई वाढवूनी केस। भुतें आणिती अंगास ॥ १ ॥
तरी ते नव्हती संतजन। तेथे नाही आत्मखूण ॥ २ ॥
मेळवूनि नरनारी। शकुन सांगती नानापरी ॥ ३ ॥
तुका म्हणे मेंद। नाही त्यापाशी गोविंद ॥ ४ ॥

(५)

जरी झाला भाग्यवंत। तरी का भेटेल भगवंत ॥ १ ॥
उंच वाढला एरंड। तरी का होइल इक्षुदंड ॥ २ ॥
जरी गर्दभ वेगीं धावे। तरी का अश्वमोल पावे! ॥ ३ ॥
तुका म्हणे तोचि थोर। ज्याचे मुखीं रघुवीर ॥ ४ ॥

(६)

आधीं होता वाध्या। दैवयोगें झाला पाग्या ॥
त्याचें येळकोट राहीना। मूळस्वभाव जाईना ॥ १ ॥
आधीं होता ग्रामजोशी। राज्यपद आलें त्यासी ॥
त्याचें पंचांग राहीना। मूळस्वभाव जाईना ॥ २ ॥
आधीं होती दासी। पट्टराणी केलें तिसी ॥
तिचें भजन राहीना। मूळस्वभाव जाईना ॥ ३ ॥

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आधीं होता संतसंग। तुका झाला पांडुरंग ॥
त्याचें भजन राहीना। मूळस्वभाव जाईना ॥ ४ ॥

तुकाराम.

प्रश्न

(१) स्मृति चांचणी—(१) संतांचीं लक्षणें सांगा. (२) मूळस्वभाव बदलत नाही याचीं उदाहरणें द्या. (३) ढोंगी साधू कसा असतो ? (४) संताचा व्यापार कोणता ? व भांडवल कोणतें ?

(२) कृतिपरः—(१) पुढील भजनें म्हणून दाखवा. (२) अंतरीं निर्मळ, वाचेचा रसाळ. (३) काय वाणूं आतां न पुरे हे वाणी.

धडा २४ वा

खलीफाचें न्यायचातुर्य

भाग १ ला

बगदादचा प्रख्यात खलीफा हरून अल्‌रशीद हा राज्य करीत असतां बगदाद शहरीं अल्ली सकल या नांवाचा एक न्हावी राहत असे. तो आपल्या कामांत फार कुशल असल्या-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मुळे बगदाद येथील मोठे सरदार उमराव वगैरे त्याच्याच दुकानीं हजामत करून घेण्यास जात असत. अर्थात् त्यास प्राप्तीहि चांगली होई; यामुळे अल्ली सकल हलक्या सलक्या लोकांची हजामत करीना. इतका तो चढून गेला होता.

थंडीच्या दिवसांत बगदादकडे थंडी फार पडते. अल्ली सकल आपल्या श्रीमंत गिऱ्हाइकांना खूप ठेवण्यासाठी दुकानांत भरपूर शेगड्या व गरम पाणी ठेवी. त्यामुळे त्याच्या दुकानांत जळाऊ लाकडांचा खूप खप होई.

एके दिवशीं एक लाकूडविक्या गाढवावर लाकडें लादून तीं विकण्यासाठी अल्लीच्या दुकानापाशीं आला. अल्ली म्हणाला, "सांग तुझ्या गाढवावर लादलेल्या सर्व लाकडांची किंमत! मी तें सर्व एकदम खरेदी करणार." लाकूडवाला आनंदला. तो म्हणाला, "आपणच द्या काय वाजवी असेल ती किंमत." अल्ली सकलने सांगितलेली किंमत लाकूडयाल्याने कबूल केली व गाढवावरील लाकडें जमिनीवर ओतलीं. मग पैशासाठी तो अल्लीच्या तोंडाकडे पाहूं लागला. अल्ली म्हणाला, "वा! अजून तूं मला सगळीं लाकडें कोठें दिलीस? या गाढवावरची लाकडी माकणहि मला मिळाली पाहिजे. आपला करार काय झाला? गाढवावरचें सर्व लाकूड तूं मला द्यावयाचें, असाच ना? मग ही माकणहि लाकडाचीच आहे!"

लाकूडवाला म्हणाला, हें कसें होईल जनाब? असा कधी करार झाला आहे काय? अल्ली म्हणाला, "तें कांही नाही; मी गाढवावरचें सर्व लाकड मिळाल्याखेरीज तुला कवडी देखील

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

देणार नाही." शेवटी न्हाव्याने जबरदस्तीने गाढवावरील माकण काढून घेतली व कांही एक न देतां लाकूडवाल्यास हाकलून दिलें !

लाकूडवाला काजीकडे फिर्याद घेऊन गेला; काजीची अल्लीवर बहाल मर्जी होती. त्याने लाकूडवाल्याची फिर्याद न घेतां त्यास हाकलून दिलें मग लाकूडवाला वरिष्ठ न्यायाधीशाकडे गेला. पण तोहि अल्लीचें गिऱ्हाईक होता; त्यानेहि लाकूडवाल्याची फिर्याद घेण्याचें नाकारलें !

तथापि लाकूडवाला निराश झाला नाही. त्याने खलीफाकडे अर्ज नेला. खलीफाने अर्ज ठेवून घेतला व अमुक दिवशीं न्यायमंदिराकडे ये, असें त्याला सांगितलें,

आपल्या राज्यांतील अधिकारी न्यायाने वागतात की नाही, हें पाहण्यांत हरून अल्रशीद अत्यंत दक्ष असे; म्हणून स्वतःकडे आलेल्या फिर्यादींची तो फार काळजीपूर्वक चौकशी करी.

नेमलेल्या तारखेस 'लाकूडवाला विरुद्ध अल्ली सकल' हा मुकदमा सुनावणीस निघाला. खलीफाने प्रथम लाकूडवाल्याची व नंतर अल्ली सकलची जवानी घेतली व त्यांना कांहा प्रश्न विचारले, नंतर तो म्हणाला, "गड्या लाकूडवाल्या, व्यवहार-दृष्ट्या मला तुझें म्हणणें पटतें. पण कायद्याच्या दृष्टीने या न्हाव्याचें म्हणणें कबूल करणें मला भाग आहे. व्यवहार कराराच्या खऱ्या मतलबाकडे पाहतो पण कायदा कराराच्या शब्दाकडे नजर ठेवतो ! न्यायाधीशाला मात्र कायद्यालाच मान द्यावा लागतो. म्हणून

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

तुला आपला करार शब्दशःच पाळला पाहिजे, तेव्हा तुला ती माकण अल्ली सकल यास दिली पाहिजे ! मात्र अल्लीने ठरलेली रक्कमहि दिली पाहिजे. असा मी न्याय देतों !"

मुकदमा संपला. लाकूडवाला निराश होऊन जाऊं लागला; पण जाण्यापूर्वी खलीफाने त्यास हळूच कांही तरी सांगितलें, त्यामुळे तो अमळ खूष झालेला दिसला.

प्रश्न

(१) विरुद्धार्थी शब्द सांगून त्यांचा वाक्यांत उपयोग करा:—खरेदी, निराशा, न्याय, नाकारलें, प्रख्यात.

(२) कारण सांगा:—(१) लाकूडवाल्याची फिर्याद वरिष्ठ न्यायाधीशाने घेण्याचें नाकारलें कारण— (२) लाकूडवाला अमळ खूष झालेला दिसला कारण—

धडा २५ वा

खलीफाचें न्यायचातुर्य

भाग २ रा

वरील गोष्टीस कांही दिवस लोटले. त्यानंतर लाकूडवाला एके दिवशीं अल्ली सकलच्या दुकानीं गेला व जणू कांही पूर्वी

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आपणा दोघांत कांहीच तंटा झाला नाही अशा तऱ्हेने म्हणाला "अल्लीभाई, आज मीं व माझा एक दोस्त यांनी तुमच्या दुकानांत हजामत करून पाहण्याचें ठरविलें आहे."

"पण माझा दर अमळ भारी असतो हें तुम्हांला माहीत आहे ना!" अल्ली सकलने विचारलें.

लाकूडवाला म्हणाला, "हो, हो, माहीत आहे तर! आम्ही त्या तयारीनेच आलों आहों," अल्लीने विचारलें, "ठीक आहे तर; पण तुझा दोस्त कोठे आहे!" लाकूडवाला म्हणाला "तो जवळच बाहेरच्या बाजूस उभा आहे, येईल थोड्या वेळांत आंत."

अल्लीने लाकूडवाल्याची हजामत केली व नंतर तो म्हणाला "आण आता तुझ्या दोस्ताला बोलावून." लाकूडवाला बाहेर गेला; त्याने आपलें गाढवच आंत आणलें व तो म्हणाला "हाच माझा दोस्त; करा याची हजामत."

"काय गाढवाची हजामत!" अल्ली सकल आश्चर्याने थक्क झाला व त्याला विलक्षण संतापहि आला! "तुझ्या सारख्या गाढवळाची हजामत मीं केली, यांतच माझी फार मानहानि झाली आहे. आता मुकाट्याने येथून चालता हो, नाही तर मी धक्के मारून तुला बाहेर काढीन." असें म्हणून त्याने लाकूड-वाल्यास हाकून दिलें.

लाकूडवाला फिरून तावडतोब खलीफाकडे गेला. त्याने झालेली हकीकत त्यास कळविली. त्याबरोबर त्याने कोतवा-लास सांगून अल्ली सकल यास समक्ष बोलाविलें, "का रे बुवा

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

तूं याच्या गाढवाची हजामत करण्याचें नाकारून यालाच दुकानाबाहेर घालविलेंस, हें खरें आहे का ?"

"होय सरकार, पण गाढवाची हजामत करावयास सांगावयाचें म्हणजे काय ? मला साहजिकच त्याचा राग आला !"

"पण तुझा व त्याचा करार काय होता ? त्याची व त्याच्या दोस्ताची हजामत करावयाची, असाच ना ?"

"होय सरकार ! पण सरकारांनीच सांगावें की गाढव कधी माणसाचा दोस्त म्हणून आजपर्यंत कोणी आणला आहे काय ?"

"तुझें म्हणणें खरें आहे. पण आजपर्यंत गाढवावर लादलेल्या लाकडांत त्यावरील लाकडी माकण येते, असें तरी कोणी म्हटलें होतें काय ? त्या वेळीं कराराच्या शब्दावर तूं अडून बसलास; आता लाकूडवाल्याची पाळी आहे; आता तुला कराराप्रमाणे शब्दशः वागणें भाग आहे. तसें न करशील तर कायद्याप्रमाणे काय शिक्षा भोगावी लागेल हें तुला माहीतच आहे !"

खलीफाच्या हुकमाप्रमाणे अली सकलास गाढवाचे सर्व केस आपल्या वस्तऱ्याने भादरून काढावे लागले ! त्याचा ही फजिती पाहण्यास शहरचे हजारों लोक गोळा झाले. जो तो म्हणे, "बरी मोडली खोड या गुलामाची ! फार शेफारला होता अलीकडे !"

खलीफाच्या न्यायीपणाची व चातुर्याचीहि चोहोकडे वाखाणणी झाली.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

प्रश्न

(१) स्मृति चांचणीः—(१) खलिफाने लाकूडवाल्याच्या फिर्यादीचा न्याय कसा दला ? अल्लीसकलची फजिती कशी झाली ? व्यवहार कसा करावा ?

(२) समानार्थी शब्द सांगून त्यांचा वाक्यांत उपयोग कराः—खोड, शेफारला, अक्षरशः, गावढळ, भादरणें.

धडा २६ वा

मी श्रीमंत कसा झालों ?

शेठ रामचन्द्र सावजी हे मुंबईचे एक लक्षाधीश व्यापारी होते. त्यांच्याकडे कांही कामानिमित्त जाण्याचा प्रसंग त्रिंबकराव यांना आला. शेठजींचा भव्य व सुंदर बंगला त्यांच्या घरचें ऐश्वर्य, नोकरचाकरांची गर्दी, वगैरे पाहून त्रिंबकरावांना फार आश्चर्य वाटलें. शेठजी सहसा कधी रिकामे नसावयाचे पण एके दिवशीं त्यांस अमळ फुरसत होती. तेव्हा ते मुद्दाम त्रिंबकरावांकडे आले व म्हणाले, "कसें काय त्रिंबकराव तुमचें काम ठीक झालें ना ? मी गेले दोन दिवस फार कामांत

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

होतों. म्हणून मला चौकशी करण्यास फावलें नाही माफ करा !"

त्रिंबकरावः—छे, छे ! आपले माझ्यावर फार उपकार आहेत. माझें सर्व यथास्थित चाललें आहे व कामहि बहुतेक होत आलें. शेठसाहेब, आपण एवढे श्रीमान असून आम्हां गरीब लोकांशीं इतक्या नम्रतेने वागतां, हा खरोखर आपला थोरपणा होय.

शेठजीः—यांत कसला थोरपणा ! देवाने वरे दिवस दाखविले म्हणून काय शेफारून जावयाचें ? मला आपल्या गरीबीची अजून पुरती आठवण आहे !

त्रिंबकरावः—म्हणजे आपली पूर्वी गरिबी होती की काय ? आपणास फुरसत असेल तर आपलें चरित्र ऐकण्याची माझी फार इच्छा आहे.

शेठजीः—अगदी अवश्य; मी मोठ्या आनंदाने सांगतों. मी मूळचा वऱ्हाडप्रांतीं मलकापूर तालुक्यांत राहणारा. आमची थोडी वडिलार्जित शेतवाडी होती. पण माझ्या लहानपणीं वऱ्हाडांत मोठा दुष्काळ पडला होता, त्यांत आमच्या कुटुंबाची अन्नान्नदशा झाली. सर्व शेतवाडी कर्जापायीं गेली; माझे वडील मोलमजुरी करून आमचें पोट कसेंबसें भरीत असत. पण पुढे प्लेग आला; त्यांत माझे वडील, आई व दोन भावंडें ही सर्व बळी पडलीं. मी अगदी पोरका झालों. माझें वय सारें बारा वर्षांचें होतें. आमच्याच जातीच्या एका मजुराने चार दिवस माझा सांभाळ केला.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पुढे "शाळा सोडून तूं आता कोठे तरी नोकरी धर व आपलें पोट भर" असें त्याने मला सांगितलें.

सुदैवाने मला नोकरी चांगल्या ठिकाणीं मिळाली. अकोल्यास शेठ जमनालाल भाटिया यांच्या दुकानीं नोकर म्हणून राहिलों. हें काम त्या वेळीं फार भरभराटींत होतें. गिऱ्हाइकांची सारखी गर्दी असावयाची. त्यांना माल दाखविणें, मालाचे पुडे बांधून देणें, पुनः जिन्नस जागच्या जागीं ठेवणें, हीं कामें मला करावीं लागत. हें काम अत्यंत कष्टाचें असतें. नवीन नोकर याला फार कंटाळतात. पण मी मात्र कधीं कामाचा कंटाळा केला नाही. माल चटपट पाहण्यासाठी पुढे केला व विचारलेल्या सर्व प्रश्नांची मोठ्या अदबीने उत्तरें दिलीं तरच गिऱ्हाईक खूष होतें, असा मला येथे अनुभव आला. माझी तडफ व हुशारी पाहून माझे मालकहि खूष झाले व त्यांनी मला दरमहा दोन रुपयांची वढती तर दिलीच, पण हळू हळू आपलें वहीखातें लिहिण्याच्या कामींहि माझी मदत घेण्यास सुरवात केली.

दोन वर्षांत मला दुकानदारीचा व हिशेवठिशेबांचा बराच अनुभव आला. मी अत्यंत काटकसरीने राहत असें. यामुळे सुमारे पाऊणशें रुपये शिल्लक शेठजींच्या दुकानींच माझ्या नांवाने जमा होती. या भांडवलावर आता स्वतःच कांही तरी व्यापार करावा असें मी योजिलें. जमनालाल शेठजींनीहि या कल्पनेस उत्तेजन दिलें; इतकेंच नव्हे तर माझ्या इमानदारीवर खूष होऊन त्यांनी आणखी पाऊणशें रुपये मला इसनवार

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

म्हणून दिले व तुझ्या सवडीप्रमाणे तूं हे मला परत दे, असें सांगितलें.

एवढ्या भांडवलावर मीं धंदा सुरू केला. एक ढकलगाडी घेऊन मी सुका मेवा विकूं लागलों. कांही लोक म्हणाले, अकोल्यांत सुक्या मेव्याला कितीसें गिऱ्हाईक मिळणार ? पण अनुभव उलटा आला. खात्रीचा माल समोर दिसला की, गिऱ्हाइकांस तो घ्यावासा वाटतोच. दुकानापर्यंत जाऊन जो माल फारसा कोणी घेत नाही तोच घरापर्यंत चालून आला तर पैसाभर अधिक देऊनहि लोक घेतात. माल चोख द्यावयाचा, वजनमापांत गडबड करावयाची नाही व गोड बोलावयाचें. त्यामुळे लोकांचा माझ्यावर विश्वास बसत चालला. मीं एक नियम मात्र कडकपणें पाळला होता. तो हा की, माल उधार द्यावयाचा नाही. उधारींत नेहमी बूड येते व पैसा निष्कारण अडकून पडतो, हें मला जमनालालजींच्या दुकानीं नोकर असतांच समजून आलें होतें.

अशीं पांच वर्षें लोटलीं. आता माझें दुकान बरेंच वाढलें होतें. मग मीं किरकोळ व्यापार सोडून दिला. एकदम बराचसा माल मुंबईहून मागवावयाचा व तो ठोक भावाने किरकोळ व्यापाऱ्यांस विकावयाचा असा क्रम मीं सुरू केला. केव्हा कोणता माल खरेदी करावयाचा व त्याला गिऱ्हाईक कसें मिळवावयाचें ह्या गोष्टींकडे मी चांगलें लक्ष देत असें. त्यामुळे माझें नुकसान असें क्वचित् होई.

हळू हळू कापसाच्या व्यापारांतहि मीं मन घातलें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मध्यंतरीं कांही व कापसाला मुंबईकडची मागणीहि चांगली होती. त्यामुळे माझा व्यापार अंदाजापेक्षा लवकर भरभराटला व सुमारें पांच वर्षांत माझें भांडवल पन्नास हजारांवर गेलें.

यानंतर किराणा माल व कापूस यांच्या अडतीचाच धंदा मीं सुरू केला; व या कामीं नेहमी अकोल्यास राहण्यापेक्षा मुंबईस राहणें उपयोगी आहे असें पाहून मी आपलें बिऱ्हाड मुंबईस आणलें. देवाच्या दयेने आजमितीस माझा व्यापार लक्षावधि रुपयांचा चालतो. आता माझा माल बोटीच्या बोटी भरून परदेशांत रवाना होतो.

सारांश काय, नशिबाने मला हात दिला आहे, यांत तर संशय नाही. पण नशिबाची परीक्षा उद्योगावांचून होत नाही. माझी चिकाटी, सतत उद्योग, गोड भाषण व सचोटी हींच माझ्या उत्कर्षाचीं कारणें होत, अशी माझी समजूत आहे.

त्रिंबकराव:—खरोखर शेठसाहेब, तरुण पिढीने आपलें उदाहरण सतत नजरेसमोर ठेवण्यासारखें आहे. आपली भेट झाली. हा मी मोठाच लाभ समजतों.

प्रश्न

(१) आठवणीची परीक्षा:—(१) शेठ रामचंद्र सावजीचें चरित्र थोडक्यांत सांगा. (२) शेठजीने व्यापार कसा

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

केला ? (३) व्यापार करतांना कोणत्या गोष्टी लक्ष्यांत ठेवाव्या ? शेठजींच्या उत्कर्षाचीं कारणें कोणतीं ?

(२) स्पष्टिकरण करा:—

(१) नशिबाची परीक्षा उद्योगावांचून होत नाही.

(२) उधारी व्यापाराचा मृत्यु होय.

धडा २७ वा

बालवीर

(बॉय् स्काउट्स्)

मुलांनो, वरील चित्र कोणाचें आहे ? त्यांचा एकसारखा पोशाक, त्यांची लष्करी ऐट व सामग्री पाहिली. म्हणजे हे चिमुकले शिपाईच आहेत की काय असें काटतें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पण हे लष्करी शिपाई खास नव्हेत. त्यांच वयच शिपाई बनण्याचें नाही. तथापि त्यांच्यांत शिपाईबाणा तुम्हांला दिसेल. सैन्यांतील शिपायांच्या जशा तुकड्या किंवा पथकें असतात, तशीं यांचींहि असतात त्या शिपायांना जसे आपल्या अंमलदारांचे हुकूम पाळावे लागतात, तसे यांनाहि लागतात; कवाईत, शिस्त जशी शिपायांना शिकवितात, तशी यांनाहि शिकवितात. त्यांच्याप्रमाणेच यांनाहि नेमून दिलेलीं कामें करावीं लागतात.

सैन्याच्या हालचाली लढाईसाठी होऊं लागल्या म्हणजे भोवतालच्या मुलखाची टेहळणी करून त्याची माहिती मिळवावी लागते. मित्रांत जीं मुलें तुम्हांला दिसत आहेत तीं अशाच प्रकारचें टेहळणीचें काम करीत आहेत. त्यांचा पुढारी त्यांना समोरील टेकडीची पाहणी करून तिचा नकाशा काढावयास शिकवीत आहे. कधी कधी तो या मुलांना निशाणांनी अगर आरशावरील सूर्यप्रकाशाच्या किरणांनी दूरच्या मित्रांना कांही बातमी खुणेने पोचविण्याची विद्या शिकवितो. पुष्कळ वेळां हे लोक झाडाखाली आपल्या छोट्या राहुट्या उभारतात व तेथेच कांही दिवस मुक्काम करतात. त्या वेळीं लाकूडफाटा गोळा करणें. स्वयंपाक, कपडे व भांडींकुंडीं धुणें वगैरे कामें स्वतःच करतात. सर्व लहानसहान सोई स्वतःच्या खटपटीने करून घ्यावयाच्या हा यांचा बाणा असतो. अशा छावणीमध्ये हे मौजेचे खेळ खेळतात; नदींत, तळ्यांत पोहतात, संध्याकाळीं थंडीच्या वेळीं एखादी शेकोटी पेटवून तिच्याभोवती ही

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मंडळी जमली म्हणजे तर त्यांची मौज विचारूंच नका. हसण खिदळणें व गप्पागोष्टी यांना जणूं कांही ऊत येतो !



लॉर्ड बेडन पॉवेल

ही बालवीर पथकाची कल्पना एका कल्पक इंग्रज सेनापतीने काढली. त्याचें नांव लॉर्ड बेडन पॉवेल असें आहे. एकदा एका किल्ल्यास वेढा पडला असतां लढाईच्या कामीं मुलांची

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मदत घेण्याचा प्रसंग पॉवेल साहेबांस आला. त्या प्रसंगीं मुलांनी दाखविलेली हुशारी व तत्परता यांचा त्यांना मोठा अचंबा वाटला; व यामुळे लढाईखेरीज इतर प्रसंगीं व्यवहारांत स्वतःला व इतरांना अधिक उपयोगी कसे व्हावें अशा कितीतरी गोष्टींचें-मुलांना हसत खेळत शिक्षण देतां येईल, ही कल्पना पॉवेल साहेबांस सुचली. या कल्पनेप्रमाणे त्यांनी प्रथम इंग्लंड देशांत बालवीरांचीं पथकें तयार केलें. तीं इतकीं यशस्वी झालीं कीं, इतर देशांतील लोकांनीहि त्यांचें अनुकरण केलें. आता तर ही चळवळ जगभर पसरली आहे. सर्व ब्रिटिश साम्राज्यांतील बालवीरांचे पुढारी आपले युवराज प्रिन्स ऑफ वेल्स हे आहेत.

बालवीरांना प्रथम कांही ठळक नियम पाळण्याची शपथ घ्यावी लागते. त्यांपैकी प्रमुख नियम पुढील कवितेंत दिले आहेतः—

(अभंग)

सर्वांचा विश्वास सहजीं वसेल
ऐसें शुद्ध शील ठेवीन मी ॥ १ ॥
देव, देश, राजा, गुरु, आप्तइष्ट
सर्वां एकनिष्ठ राहीन मी ॥ २ ॥
जाणें अनाथांच्या प्रतिदिनीं साह्या
लोकांसाठी काया झिजवीन ॥ ३ ॥
साना कुरवाळीं, वंदीन थोरांना
बंधू सकलांना मानीन मी ॥ ४ ॥

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सौजन्य दावीन स्त्रिया-बालकांशीं
वृद्ध निर्बलांशीं निरपेक्ष ॥ ५ ॥
मुकीं जनावरें मित्र गणीं तयां
व्रत भूतदया आचरीन ॥ ६ ॥
गुरु आईबाप अधिकारी खरे
आज्ञा त्यांच्य त्वरें पाळीन मी ॥ ७ ॥
कोसळो संकट, कर्तव्य कठीण
मनाने प्रसन्न करीन मी ॥ ८ ॥
द्रव्य-काळ-व्यय जपूनी करीन
अनाथां देईन उरेल तें ॥ ९ ॥
शरिराने शुद्ध मनाने निर्मल
कृतीने सरळ राहीन मी ॥ १० ॥

न. के. बेहेरे.

पण ही प्रतिज्ञा पाळणें सोपें नाही. त्यासाठी सतत उद्योग व मेहनत पाहिजे. म्हणून या बाबतींत बालवीरांना मुद्दाम शिक्षण देतात. हें सर्व शिक्षण बालवीरांना हसत खेळत मिळतें. यांतील पुष्कळ गोष्टी अशा आहेत की, त्या एक एकट्या मुलाला शिकणें कठीण आहे, पण मुलांच्या संघांत त्या शिकणें अगदी सोपें जातें. म्हणून पॉवेल साहेबांनी खेळ व उपयोगी ज्ञान यांची जोड केली आहे.

बालवीरांचीं पथकें नेहमी फिरावयास जातात व त्यामुळे त्यांना आपल्या भोवतालच्या सृष्टीचें बारकाईने अवलोकन

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

करण्याची सवय लागते. भोवतालचा प्रदेश कसा आहे; तेथे नद्या, नाले, टेकड्या, दऱ्या वगैरे कशीं आहेत; तेथे पशु, पक्षी कशा प्रकारचे आहेत; तेथे शेतकी, उद्योगधंदे वगैरे कसे चालतात, इत्यादि गोष्टींची ते माहिती मिळवितात. खुल्या हवेंत फिरणें, थंडी, वारा, ऊन सहन करणें, स्वतःस लागणाऱ्या वस्तु व सोई स्वतःच्या प्रयत्नाने मिळविणें इत्यादि सवयीमुळे बालवीर निरोगी काटक व स्वावलंबी बनतो. आपल्या गरीब व संकटांत सापडलेल्या बांधवांना मदत करण्याची कल्पना तर या चळवळींत फारच प्रमुख आहे. याकरितां बालवीर पोहण्यास शिकतात व बुडणाऱ्या माणसांना वाचविण्याच्या कामीं झटतात. त्याचप्रमाणे अपघाताच्या प्रसंगीं प्राथमिक इलाज कसे करावे याचेंहि ज्ञान बालवीर मिळवितात. ज्या ज्या ठिकाणी जत्रा, मेळा वगैरे कारणांनी माणसांची मोठी गर्दी होते, त्या ठिकाणीं शिस्त ठेवणें व अपघात टाळणें या कामीं बालवीरांची फार मदत होत असते. हें आता सर्वांना माहीत झालें आहे.

सारांश, अशी ही बालवीर संस्था समाजाला, देशाला अत्यंत उपयोगी आहे. मुलांनो, तुम्हीहि बालवीर बनून आपल्या भारतमातेच्या उद्धारासाठी झटाल ना ?

प्रश्न

(१) रिकाम्या जागीं योग्य शब्द लिहा.

(१) चित्रांतील मुलें—काम करीत आहेत ?

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

(२) बालवीराची—एका इंग्रज सेनापतीने काढली. [गोष्ट, बातमी, खेळण्याचें, कल्पना, गप्पा-गोष्टीचें, टेहळणीचें]

(२) स्मृति चांचणीः—(१) बालवीर कोणती प्रतिज्ञा घेतो ? (२) बालवीरांना कोणकोणत्या गोष्टीचें शिक्षण मिळतें ? (३) बालवीर बनण्यापासून कोणता फायदा होतो ?

धडा २८ वा

रबर

अलीकडच्या काळांत रबर ज्याला माहीत नाही अशा माणूस खेड्यापाड्यांतहि सापडणें कठीण. कारण खेड्यांतून देखील आता मोटारी दिसतात व एखाद दुसरी तरी बायसिकल असते. अर्थात् यांच्या चाकांच्या रबरी धावा व नळ्या आता सर्वांच्या ओळखीच्या झाल्या आहेत. रबरी चेंडू, रबराचीं चिंब चिंब करणारीं खेळणीं ही मुलांना माहीत असतातच. शहरांतील मुलांना आणखी कित्येक वस्तु सहजीं

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

दिसतात. रस्त्यावर पाणी शिंपडण्याची नळी पुष्कळदा रबराचीच असते. रबरांत पाणी शिरत नाही व तें कधी भिजत नाही. म्हणूनच पावसाळ्यांत अंग भिजूं नये म्हणून जो लांब बरसाती कोट घालतात त्याला व छत्र्यांना रबराचेंच रोगण दिलेलें असतें. शाळेंत चित्रें व नकाशे काढतांना पेनसिलीच्या रेघा पुसून टाकण्यास रबर किती उपयोगीं पडतें हेंहि सांगावयास नको. आजारी माणसाचें पोट शेकण्यास लागणाऱ्या गरम पाण्याच्या पिशव्या रबराच्या करतात. असे शेंकडों उपयोग रबराचे आहेत.

रबर ताणलें असतां लांबतें व सोडलें की, पुनः पूर्वस्थितीवर येतें, हेंहि तुम्हीं पाहिलेंच असेल. यामुळेच रबरी चेंडू, मोटारीच्या चाकांच्या हवा भरण्यांच्या नळ्या रबराच्या बनवितात. रबर कढत पाण्यांत घातलें तर मात्र तें अंमळ लिबलिबीत होतें. रबराला चितळवून त्याचा रस करणें अंमळ कठीण आहे. कारण त्याला आच दिली तर तें हळू हळू पातळ होतें व लगेच पेट घेतें !

पण हा उपयोगी पदार्थ आहे तरी काय ? असा प्रश्न आमचे बालवाचक करतील, याचें उत्तर थोडक्यांत असें आहेः—

याला इंग्रज लोक पुष्कळ वेळां 'इंडिया रबर' असें म्हणतात. त्यामुळे हा पदार्थ आपल्या हिंदुस्थानांत मूळ पैदा झाला अशी कोणाची समजूत झाली, तर ती मात्र चुकीची होईल. हिंदुस्थानांतहि अलीकडे रबर होतें; पण तें थोडें. यांचें खरें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मूलस्थान दक्षिण अमेरिका हें होय; इ. स. १८७३ सालीं इंग्रज



सरकारने मोठ्या खटपटीने रबराच्या झाडांची लागवड सीलोन, सिंगापूर वगैरे भागांत केली. हा प्रयोग चांगला यशस्वी झाला व आता दक्षिण हिंदुस्थान, सीलोन, मलाया द्वीपकल्प व जावा, सुमात्रा वगैरे पॅसिफिक महासागरांतील बेटें ह्या प्रदेशांत रबराच्या झाडांचीं मोठाली अरण्यें निर्माण झालीं आहेत. तथापि या पदार्थांचा उपयोग अमेरिकेंतील तांबड्या इंडियन लोकांनी जगास शिकविला; व म्हणूनच त्यास 'इंडिया रबर' असें नांव पडलें.

दक्षिण अमेरिकेंतील ब्रेझिल, पाराग्वे वगैरे देशांत रबराचीं पुष्कळ जंगलें इतकीं दाट आहेत की, त्यांत सूर्यकिरणांना जागा मिळणें मुष्किलीचें होतें. रबर हें या झाडांचा चीक होय.

हा चीक गोळा कसा करतात? आपल्या इकडे ताडीच्या झाडांपासून ताडी जशी घ्रतात, तसाच प्रकार येथेहि असतो. प्रथम झाडाच्या खोडाला कुऱ्हाडीने एक खाच पाडावयाची. मग या खाचेच्या खालच्या बाजूस थोडी चिकणमाती थापून तीवर एक छोटेंसें भांडें बसवून द्यावयाचें. खाचेंतून झिरपलेला चीक

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

या भांड्यांत गोळा होत
एक एक फुटाच्या अंतरा
अशा अनेक खाचा झाडा
पाडतात व प्रत्येकीच
खाली एक साठवणीचें भां
लावलेलें असतें. रबरा
झाडाला तांबड्या इंडि
लोकांनी 'रडवें झाड' व
मौजचें नांव कां दिलें आ
हें आंता तुमच्या ध्यान
येईल.

हा चीक पांढरा स्वच्छ व मधासारखा दाट असा
त्याला वास बिलकुल नसतो. मग रबराचा मळकट भुर
रंग व त्याचा उग्र वास हीं कोठून आलीं ? तीं हा चीं
वाळल्यावर येतात. हा वाळविण्याचा प्रकार असा :—

खाली विस्तवाची खाई पेटवायची व त्यावर एक माती
थर अंथरून त्यावर हा चीक ओतावयाचा. म्हणजे खालच
आचीने तो वाळून घट्ट बनतो. एक थर वाळला म्हणजे त
वरच दुसरा थर ओततात. तोहि तसाच वाळतो. खालच
विस्तवांतून जो धूर निघत असतो त्याने रबराला त्याचा
व वास येतात. सर्व थर वाळले म्हणजे खालची माती धु
काढतात. म्हणजे नुसत्या रबराची एक जाडशी च
तयार होते.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

हें कच्चें व अशुद्ध रबर होय. हे बोटींत अगर आगगाडींत भरून जेथे रबराचे कारखाने असतील तेथे रवाना होतें, तेथे त्याला शुद्ध करून त्याचे निरनिराळे पदार्थ बनवितात.

प्रश्न

(१) आठवणीची परीक्षा--

(१) रबराची माहिती सांगा.

(२) रबराचीं रानें कोठें आहेत ?

(३) रबराला 'इंडिया रबर' असें नांव कां पडलें ?

(२) कारणें लिहा—

(१) रबराच्या झाडाला रडवें झाड म्हणतात. कारण—

(२) खेड्यापाड्यांतील माणसालाहि रबर माहीत आहे. कारण—

धडा २९ वा

दोन देणग्या

काश्मीराकडे हिवाळ्यांत अतिशय कडक थंडी पडत असते. नद्या, नाले यांचें पाणी कित्येक वेळा गोठून जातें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

थंडगार वारे सुटून बर्फ पडूं लागतें. रस्त्यावर बर्फाचा थर जमतो.

अशा दिवसांत श्रीनगरच्या एका रस्त्यावर एक गरीब भिकारीण बसली होती. तिच्या अंगावर फाटक्या चिंध्यां-खेरीज कांही नव्हतें व ती थंडीने कुडकुडत होती. "गरिबावर दया करा हो." असें दीनवाणीनें सकाळपासून संध्याकाळपर्यंत ती ओरडत होती. पण कोणाला तिची दया आली नाही. संध्याकाळ होत आली. तेव्हा रस्त्यावरील रहदारीहि कमी होऊं लागली; आता निराश होऊन आपल्या झोपडीकडे गेलें पाहिजे, असें तिला वाटूं लागलें.

इतक्यांत त्या रस्त्यावरून कोणी तरी जात आहे असें तिला दिसलें: येणारा माणूस तिच्याजवळ येतांच थबकला. "अरेरे ! काय बिचारीची दशा ! या थंडीच्या कडाक्यांत हिचे किती हाल होत असतील बरें ?" असें म्हणून तो पुढे चालता झाला. बिचाऱ्या भिकारणीची फिरून निराशा झाली ! पण त्या माणसाने आपल्या वाईट स्थितीबद्दल दयेचे दोन शब्द तरी उच्चारले, याचें तिला थोडें समाधान वाटलें. कारण सकाळपासून तसे शब्दहि कोणी उच्चारले नव्हते.

यानंतर दहा एक मिनिटेंच गेलीं असतील. एका सुंदरशा घोड्याच्या गाडींत बसून एक श्रीमान सरदार त्या रस्त्याने जाऊं लागला. त्याची नजर या दुर्दैवी बाईकडे गेली. त्याने गाडी थांबविली. त्यासरशी ती बाई गाडीकडे धावला व "महाराज, दया करा व मला पोटाला कांही तरी द्या" असें म्हणाली. सरदार साहेबांनी

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

खिशांतून एक नाणें काढून तें रस्त्यावर फेकलें व "ओः! काय ही थंडी! घे हें!" असें म्हणून चटकन् नाणें फेकलें. तें नाणें चांदीचें नसून सोन्याचें होतें, हें फेकतांना त्याच्या लक्षांत



आलें. "अरेच्या, हें फार जास्त झालें." अशी कल्पना त्याच्या मनांत आली. पण थंडीने हात कांपल्याने तें चटकन् रस्त्यावर पडलेंच. इतक्यांत गार वाऱ्याची अशी सपाट्याची झुळुक आली की, सरदारसाहेबांना खिडकी बंद करण्याखेरीज कांही सुचलेंच नाही.

गाडी पुढे चालू झाली, सरदाराला सोन्याच्या नाण्याची मात्र थोडी चुटपुट लागली. शेवटी "जाऊं दे की! असा उदारपणा दाखविण्याइतके आपण श्रीमंत खास आहों," असें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

त्याने मनाचें समाधान केलें. आपल्या वाड्यांत पोचल्यावर त्याने भोजन केलें; व जवळ एक रसरसलेली शेगडी ठेवून एका आराम खुर्चीवर तो सुखाने पडला असतां फिरून त्या सोन्याच्या नाण्याची त्याला आठवण झाली. "खरेंच, ही देणगी जरा जास्तच झाली. ऊं: जाऊं द्या की ! झालें तें झालें." असे विचार त्याच्या मनांत येत होते.

इकडे त्या रस्त्यावरून पहिल्याने गेलेला प्रवासी श्रीनगरच्या एका हॉटेलांत जाऊन उतरला. हॉटेलांतील खोल्या प्रशस्त असून शेगड्या वगैरे ठेवून चांगल्या गरम केलेल्या होत्या. थोड्याच वेळांत भोजन तयार होईल, असें हॉटेलाच्या व्यवस्थापकाने सांगितलें. पण या प्रवाशाचें मन मात्र स्वस्थ नव्हतें. रस्त्यावर थंडीने गारठून गेलेल्या भिकारणीला आपण एक पैसा देखील दिला नाही; त्या भयंकर गारठ्यांत आपल्या कोटाच्या आंतल्या बाजूस असलेली पैशाची पिशवी उघडून त्यांतून पैसा दोन पैसे बाहेर काढणेंहि आपल्या जिवावर आलें; पण केवळ लक्तरें अंगावर असलेल्या त्या बाईची अवस्था काय बरें असेल ? मी आता येथे गरम व चमचमीत जेवण करणार; पण ती ? कदाचित् मुलांबाळांसकट तिला उपास काढावा लागणार ! असें त्याचें मन त्याला सारखें खाऊं लागलें. शेवटी त्याच्याने राहवेना. "दोन माणसांसाठी भोजन तयार करा," असें हॉटेलवाल्यास सांगून तो तडक बाहेर पडला व जेथे ती भिकारीण होती, तेथे परत आला. पाहतो तों ती भिकारीण रस्त्यावरील बर्फांत कांही तरी शोधीत

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

होती. त्याने प्रश्न करतांच ती म्हणाली, "एका गृहस्थाने मजकरितां एक नाणें रस्त्यावर फेकलें, तें मी केव्हाची शोधीत आहें. पण या वर्फांत त्याचा पत्ताच लागत नाही हो!"

"मला वाटतें आता या अंधारांत तें सापडावयाचें नाही. तूं चल मजबरोबर; मी तुला आज जेवणच देतों म्हणजे झालें." असें तो म्हणाला. बाई आश्चर्याने चकितच झाली. ती उठून त्यावरोबर चालूं लागली; तेव्हा त्याला आढळून आलें की, ती अर्धवट आंधळी असून लंगडीहि आहे, त्याने बाईला हॉटेलांत पोटभर अन्न तर दिलेंच, पण तिची रात्रभर निजण्याची देखील त्या ठिकाणीं सोय केली व दुसऱ्या दिवशीं एक रुपया देऊन तिची रवानगी केली.

मुलांनो! त्या सरदाराची देणगी व या प्रवाशाची देणगी यांतून कोणती देणगी तुम्हांला आवडली? देवाला कोणती अधिक आवडेल, हें तुम्हीं सांगूं शकाल काय?

प्रश्न

(१) उलट अर्थाचे शब्द सांगून त्यांचा वाक्यांत उपयोग करा:—दुर्दैवी, झोपडी, उदार, रसरसलेली.

(२) रिकाम्या जागीं योग्य शब्द लिहा.

(१) केवळ × × × अंगावर असलेल्या त्या बाईची × × × काय बरें असेल?

(२) ती × × × × आंधळी व लंगडी × आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

धडा ३० वा

चिमणा सरदार

किति सांगुं गडे ! तुजसी याच्या खोड्या
आहेत तशा कां थोड्या !

जर सांगाया बसेन त्या एकेक दिवसही पुरेल न एक;
तिकडूनि रणीं जाणें झालें जेव्हा हा सर्वे निघाला तेव्हा
किति सांगितलें धाकाने, प्रेमाने परि ऐकेनाचि कशाने
सवंगडी असे नित्य अतां जमवीतो लुटपुटी लढाई लढतो
करिं घेउनिया काठीची तलवार दारावरि करितो वार
करितो जरिच्या टोपीची दृढ ढाल करितात वार वरि बाल
या गुडघ्याचा, बाळांच्या पाठीचा हय बनवुनि हणितो टाचा

ताईत गळ्यांतिल माझ्या
जीवाचा प्यारा कलिजा
वतनाचा चिमणा राजा

अशि करीतो गे ! नरवीरांवर ताण 'वापसे सवाई' जाण !
तिनिसांजेला बैसुनि तट्टावरती फिरण्याला जातो भंवती
त्यावेळीं ज्या खोड्या करितो कांही नच पुसणें बाई ! बाई !
दुरिं घालवुनी देतो मोतद्दारा मग पळतो सैरावैरा
वरि फांद्यांशीं घेतो बाई ! झोंब्या तोडतो फळें लिंबोण्या
ठाकतो कधी जाउनि हत्ती पुढती नाहीच कशाची भीती !
असले याचे बघतां बघतां खेळ झर झर झर जातो वेळ.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

गे ! सजतो हा पुरा पुरा सरदार डोळ्यांस सुखवितो फार
जरि दिसण्याला गुलाम असला छोटा अकलेने आहे मोठा

ताइत गळ्यांतिल माझ्या
जीवाचा प्यारा कलिजा
वतनाचा चिमणा राजा
उरि धरुनि असा जेव्हां दुडुदुडु धावे
मधु मुके मटामट घ्यावे !

भ. श्री. पंडित

प्रश्न

(१) 'बाप से बेटा सवाई' म्हणजे काय ?

(२) चिमणा सरदार ढाल, घोडा, व तलवार कशाची करतो ?

(३) कृतिपरः—पुढील शब्दाप्रमाणें कृति करा—'लटु पटीची लढाइ, दुडुदुड धावणें, झर झर चालणें.'

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

धडा ३१ वा

शेतकीचें प्रदर्शन

भाग १ ला

बाळूः—बाबा तुम्ही अकोला येथील शेत व तेथील प्रदर्शन दाखवावयास मला नेणार आहां ना ?

किसन पाटीलः—होय, अवश्य नेईन बरें, बाळ! तुलाच काय पण मोठ्या जाणत्या शेतकऱ्यांना देखील पाहण्यासारखी मौज तेथे दिसेल; ही मौज म्हणजे उगीच खेळ तमाशा नव्हे. तिच्यापासून शेतकीविषयी फारच उपयोगी अशी माहिती आपणास मिळेल.

बाळूः—पण प्रदर्शन म्हणजे काय ? व तें कोण करणार ?

किसन पाटीलः—प्रदर्शन म्हणजे कोणत्याहि पदार्थांची लोकांनी तें पाहावें म्हणून केलेली मांडणावळ. गतवर्षी तुझ्या शाळेंत डेप्युटी कमिशनर साहेब आले होते. त्या वेळीं मुलांचीं हस्ताक्षरें, त्यानी काढलेलीं चित्रें, नकाशे व मुलींचें शिवणकाम व कशीदा यांची एक एक सुरेख मांडणावळ शाळेंत केली होती ना ? तें एक छोटेंसें प्रदर्शनच होतें. हें शेतकीचें प्रदर्शन सरकारच्या शेतकीखात्याचे कामगारच भरवितात.

बाळूः—शेतकीखातें म्हणजे काय ?

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

किसन पाटीलः—शेतकरी लोकांना मदत देण्यासाठी सरकारने कांही कामगार नेमले आहेत. त्यांचें काम शेतकऱ्यांना हरतऱ्हेची माहिती देणें व मदत करणें हें आहे. आपल्या जिल्ह्याचे शेतकीखात्याचे छोटे साहेब आपल्या धारणगावाला वर्षांतून एखाद्या वेळीं तरी येतातच. त्यांच्याच सल्ल्यावरून मीं हें उपणणीचें यंत्र यंदा आणविलें. त्याने आपली मेहनत व वेळ किती वांचली हें तूं पाहिलेंसच. मागे एकदा आपल्या शेतांतील ज्वारीला काणीचा रोग होऊन पीक अगदी बिघडलें. मी वीं तर अगदी निवडून घेतलें होतें. मग असें कां झालें, हें मला समजेना. त्या सुमारास हे छोटे साहेब येथे आले होते. त्यांनी मला यावर एक अगदी सोपा उपाय सांगितला. "थोडा मोरचूद पाण्यांत विरघळवून त्यांत ज्वारीचें वीं भिजवावें व दहा एक मिनिटांनी बाहेर काढून मग तें वाळवावें. नंतर पेरावें म्हणजे हा रोग होणार नाही." आणि खरोखरच मी त्यापुढे तसें करूं लागल्यापासून माझ्या ज्वारीवर हा रोग पुनः कधी पडला नाही. मीं हा उपाय हल्ली येथील पुष्कळ शेतकऱ्यांना सांगितला आहे; व त्यांचाहि अनुभव असाच आहे.



उपणणीचें यंत्र

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आपल्या येथे पूर्वी होणारा कापूस फार कमी दर्जाचा होता. त्याचा धागा फार आखूड असे. या छोटे साहेबांनी मला लांब धाग्याच्या कापसाचें निर्भेळ बीं सरकारी शेतांतून पुरविलें. तेव्हापासून आपल्या कापसाला बाजारांत फार चांगला भाव येतो.

बाळूः—पण सरकारांना खुद्द आपलेंच शेत ठेवण्याचें काय कारण ?

किसन पाटीलः—याचे हेतु दोन प्रकारचे असतात. एक तर शेतकऱ्यांना निर्भेळ व निरोगी बीं पुरविणें हा होय. या बाबतींत सरकार फार काळजी घेतात. दुसरें, एखादी गोष्ट प्रत्यक्ष डोळ्यांनी पाहिली म्हणजे जशी समजते, तशी तोंडीं सांगून समजत नाही. उत्तम प्रतीचें धान्य कसें असतें; उत्तम जनावरें कशीं अशतात; गुरांचा गोठा कसा बांधावा व स्वच्छ ठेवावा; शेतकाचीं नवीन आउतें व यंत्रें कशीं वापरावीं, हें लोकांना समक्ष दाखवावें म्हणून सरकार बहुधा प्रत्येक जिल्ह्यांत एक तरी नमुनेदार शेत ठेवतात. तेथे शेतकामाचे सर्व नमूने पाहावयास मिळतात. हे सर्व आता आपल्याला दिसतीलच.

प्रश्न

(१) स्मृति चांचणीः—(१) शेतकी प्रदर्शन म्हणजे काय ? (२) शेतकी खातें म्हणजे काय ? (३) शेतकी खात्यापासून शेतकऱ्यांचा फायदा कोणता ?

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

(२) खरें किंवा खोटें हें लिहा:—

(१) शेतकऱ्यांना मदत देण्यासाठी सरकारने कांही कामगार नेमले नाहीत. ……

(२) सरकारी शेतींतून शेतकऱ्यांना निर्भेळ व निरोगी बीं पुरविलें जातें. ……

(३) अशुद्ध शब्द शुद्ध लिहा:—

निरभेळ, परदर्शन, दर्ज्याचा.

धडा ३२ वा

शेतकीचें प्रदर्शन

भाग २ रा

प्रदर्शनाच्या आदल्या दिवशींच किसन पाटील बाळू, व दहा पांच शेतकरी वगैरे मंडळी अकोल्यास जाऊन पोचली. त्या दिवशीं त्यांनी सरकारी शेतच हिंडून पाहिलें. प्रदर्शनासाठी येणाऱ्या मंडळींना शेताविषयीं माहिती सांगण्यासाठी आज सरकारी शेताचे सुपरिंटेंडेंट व त्याचे मदतनीस स्वतः हजर होते. ते सर्व तऱ्हेची माहिती देत होते. प्रथम त्यांनी शेतांतील सर्व उभीं पिकें हिंडून पाहिलीं. अमदी रेताड जमिनीवरहि

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सुमारे दोन पुरुष उंचीचा ऊस वाढलेला पाहून त्यांना फार आश्चर्य वाटलें. भुईमूग, कापूस वगैरेची गोष्ट तीच. इतक्या मोठ्या व पुष्ट भुईमुगाच्या शेंगा व इतका लांब जंतूंचा कापूस त्यांनी पूर्वी कधीच पाहिला नव्हता. हा सतेज व लांब धाग्याचा कापूस मूळ अमेरिकेंतला. ती जात आपल्या इकडे आणण्याची सरकार खटपट करीत आहे, असें सुपरिंटेंडेंट-साहेबांनी सांगितलें.

दुसरीकडे तेलाच्या वाफेनें चालणाऱ्या नांगराने जमीन नांगरण्याचें काम चालू होतें. या राक्षसी नांगराने जमीन किती जलद व किती खोल नांगरली जाते हें पाहून त्यांना अचंबा वाटला. त्याचप्रमाणे कापणीचें यंत्र, धान्याच्या मळणीचें यंत्र, उपणणीचें यंत्र, तऱ्हेतऱ्हेचे नांगर, वखर व डवरे,



लोखंडी नांगर

पाणी काढण्याचे पंप, वगैरे सर्व तऱ्हेच्या अवजारांचें काम येथें त्यांना प्रत्यक्ष दाखविण्यांत आलें. मग ती मंडळी गुरांच्या गोठ्याकडे गेला. तेथील स्वच्छता व टापटीप पाहून त्यांना

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कौतुक वाटलें. "अशी व्यवस्था असल्यावर गुरांना रोगराई होईल कशाला ?" असें एक जण म्हणाला.

दुसऱ्या दिवशीं प्रदर्शन उघडण्याचा समारंभ झाला. त्यासाठी वऱ्हाडचे कमिशनरसाहेब मुद्दाम आले होते. प्रदर्शनासाठी एक मोठा मंडप घातला असून त्यांत वेगवेगळ्या पदार्थांसाठी वेगवेगळे भाग केले होते. एकांत धान्यांचे निरनिराळे प्रकार ठेवले होते. कोठे कणसें, लोंब्या, शेंगा, फळें असीं ठेवलीं होतीं, तर कोठे वेगवेगळ्या जातींचीं बियेंच ठेवण्यांत आलीं होतीं. हिंदुस्थानांत व इतर देशांत होणारे तांदूळ, गहू, ज्वारी, मका, डाळींचीं धान्यें; जवस, भुईमूग, तीळ वगैरे गळितांचीं धान्यें हीं इतक्या प्रकारचीं होतीं कीं, तींपाहून त्यांना अचंबा वाटला, "बाबा, किती हे धान्याचे प्रकार ! हें बीं तरी किती पाणीदार व जाड दिसत आहे !" असें बाळू म्हणाला.



पाणी काढण्याचा पंप

प्रदर्शनांत आणखी किती तरी नवीन नवीन आउतें ठेवलीं होतीं व कित्येकांचीं चित्रें टांगलीं होतीं. प्रत्येक नमुन्यावर एक चिट्ठी लावलेली असे. तिच्यावर तो पदार्थ काय आहे व त्याचा उपयोग काय हें थोडक्यांत लिहिलेलें होतें. शिवाय तेथें उभे असलेले व्यव-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

स्थापक तोंडीहि माहिती सांगत. निरनिराळ्या खतांचे नमुनेहि तेथे ठेवले होते. पिकांवर पडणाऱ्या रोगांच्या जंतूंची फार मोठ्या आकारांत काढलेलीं चित्रें तेथे ठेवलीं होतीं व त्यांवरून या रोगांविषयीं माहिती देण्यांत येत होती. जनावरांची जोपासना, दूधदुभत्याची व्यवस्था यावद्दलची माहिती दुसऱ्या एका भागांत देण्यांत येत होती. प्रदर्शनांतील पुष्ट, तेजस्वी व सुंदर जनावरें पाहून तर बाळू अत्यंत खूष झाला. बाळू हिंडून हिंडून अगदी थकून गेला तरी त्याची हौस मात्रकमी झाली नाही. किसन पाटील म्हणाले, "बाळू, आता कमिशनरसाहेबांच्या हस्तें बक्षिसें वाटण्याचा समारंभ होणार आहे तिकडे आपण जाऊं."

बरोबर चार वाजतां समारंभास सुरवात झाली. प्रदर्शनांत ज्यांना बक्षिसें मिळालीं त्यांत किसन पाटीलहि होते. त्यांचा कापूस पहिल्या नंबरचा ठरला. जनावरांबद्दलचेंहि एक बक्षीस त्यांना मिळालें. हें बक्षीस बाळूच्या लाडक्या लाडक्या गोऱ्हास मिळालें, म्हणून बाळूला फार आनंद झाला.

बक्षिसें वांटून झाल्यावर कमिशनरसाहेब म्हणाले, "सभ्य गृहस्थ हो व शेतकरी मित्र हो ! ह्या प्रदर्शनास येऊन तुम्हीं तें यशस्वी केलें या बद्दल मी तुमचा आभारी आहें. यांत ज्यांना बक्षिसें मिळालीं आहेत. त्यांचें मी अभिनंदन करतों. या प्रदर्शनाचा हेतु तुम्हां लोकांना शेतकी किती सुधारतां येऊं शकेल हें दाखविण्याचा आहे. पाश्चिमात्य लोक या कामीं फार पुढे गेले आहेत. ते केवळ जुनाट व वाडवडिलांपासून चालत आलेल्या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

रीतीने शेतकी करीत नाहीत, ते नवीन नवीन सुधारणा करून पाहतात. म्हणून तुमच्या येथे एका दाण्याचे चार दाणे झाले, तर त्यांचे वीस पंचवीस दाणे होतात; आणि ते जास्त पुष्ट, वजनदार व निरोगी असे निपजतात. त्यांच्या जनावरांचा चारा सुद्धा सकस असतो, यामुळे तीं दांडगीं व सशक्त असतात. शेती हा धंदा इतर सर्व धंद्यांच्या मुळांशीं आहे. तुमच्या हिंदुस्थान देशांत तर तो मुख्यच धंदा आहे तो सुधारणें हें तुमच्या हातीं आहे. तुम्ही या बाबतींत नेहमी शेतकी खात्याची मदत घेत जा. नेहमी या सरकारी शेतांत काम कसें चालतें पाहत चला. शंका आली की, या कामगारांना विचारीत जा. नवीन व उपयोगी खतें वगैरे उपयोगांत आणण्याची खटपट करा. ईश्वर तुम्हांस यश देवो !"

आणखी एक दोन दिवस तेथे राहून व तऱ्हेतऱ्हेची उपयुक्त माहिती मिळवून किसन पाटील व बाळू परत धरणगावास गेले.

प्रश्न

(१) योग्य असें एक नांव द्या.

(१) तांदूळ, गहू, ज्वारी, मका हीं.....होत.

(२) जवस, भुईमूग, तीळ हीं.....होत.

(३) नांगर, वखर, डवरें इत्यादि हीं शेतीचीं..... होत.

(२) विरुद्धार्थी शब्द लिहा.

(१) सर्कस (२) पुष्ट (३) सुरवात (४) यश

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

धडा ३३ वा

देवी अहल्याबाई होळकर



मुंबई इलाख्यांतील अहमदनगर जिल्ह्यांत पाथर्डी म्हणून एक गाव आहे. तेथे आनंदराव शिंदे नांवाच्या एका गरीब शेतकऱ्याच्या कुळांत साध्वी अहल्याबाईचा जन्म झाला होता. हिच्या नशिबीं राज्यपद आहे असें एका ज्योतिष्याने भविष्य वर्तविलें होतें. म्हणून तिच्या बापाने तिला लहानपणापासून चांगलें शिक्षण दिलें. ती रूपाने फार देखणी होती असें नाही. पण तिचा चेहरा मोहक असून वागणूक सभ्यपणाची होती.

एकदा इंदूर संस्थानाचा संस्थापक मल्हारराव होळकर सैन्यासह दक्षिणेकडे येत असतां पाथर्डी येथील एका देवळांत यांनी मुक्काम केला. तेथे अहल्याबाई दर्शनास आली असतां त्यांच्या नजरेस पडली. तिचा नीटनेटकेपणा पाहून मल्हाररावांना चौकशी केली; तिची हकीकत कळतांच "अशीच बायको माझ्या खंडेरावास पाहिजे," असें ते म्हणाले. त्यांनी

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

तिच्या बापाजवळ सुलीस मागणी घातली. थोड्याच दिवसांनी पुणे येथे मोठ्या थाटाने लग्नसमारंभ झाला.

आपल्या गोड स्वभावाने अहल्याबाईने सासरच्या सर्व मंडळींचें प्रेम संपादन केलें. मल्हारराव व त्यांची पत्नी गौतमाबाई हीं दोघेहि स्वभावाने कडक होतीं. तथापि तीं कितीहि रागावलीं असलीं, तरी या छोट्या सुनेच्या गोड भाषणाने तेव्हाच शांत होत.

पण तिच्या सुखाचे दिवस लवकरच संपले. सुरजमल जाठाशीं होळकर लढत असतां तिचा पति खंडेराव पडला (इ. स. १७५४), तिला दोन अपत्यें होतीं. मुलगा मालेराव व मुलगी मुक्ताबाई. पतीच्या शवाबरोबर सती जाण्याचा तिचा बेत होता; पण मल्हाररावांनी डोळ्यांत पाणी आणून म्हटलें. "सूनबाई, माझा खंडेराव तर गेलाच, पण तूंहि गेलीस तर मी म्हातारपणीं कोणाच्या तोंडाकडे पाहूं! माझा भरंवसा आता तुझ्यावर आहे."

सासऱ्याच्या म्हणण्यास मान देऊन तिने सती जाण्याचा बेत रहित केला. मल्हाररावानेहि सुनेची योग्यता ओळखून यापुढे राज्यकारभाराची पुष्कळशी व्यवस्था तिच्याकडे सोपविली. तिने ती अत्यंत दक्षतेने पाहिली.

पुढे इ. स. १७६५ सालीं मल्हारराव मृत्यु पावले, तेव्हा राज्यकारभार अहल्याबाईचा पुत्र मालोजीराव याच्या नांवें चालूं लागला. पण सुमारे नऊ महिन्यांतच मालोजीराव मरण पावला.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

या वेळीं गंगाधर यशवंत चंद्रचूड या नांवाचा दिवाण इंदूर दरबारचा कारभार पाहत असे. त्याच्या मनांत पाप आलें. तो अहल्याबाईस म्हणाला, "आपण बायकोमाणूस; आपली देवधर्मावर निष्ठा फार; राज्यकारभार व स्वारीशिकारीचीं कामें आपल्या हातून होणें कठीण. करितां आपण दत्तक घ्यावा व त्याच्या नांवाने कारभार चालविण्याची मलाच परवानगी असावी."

पण अहल्याबाई अशाने फसणारी स्त्री नव्हती. तिने चंद्रचूडास खडखडीत निरोप पाठविला कीं, "मी सुभेदार मल्हाररावांची सून आहें. मी आतापर्यंत कारभार पाहात आल्यें व यापुढेहि पाहीन. आपण तसदी घेण्याचें कारण नाही."

पण चंद्रचूड पडला कारस्थानी. त्याने रघुनाथराव पेशव्यांशीं संधान बांधून त्यांना असें सुचविलें की, "इंदूर येथे बाईचा कारभार आहे. आपण सैन्य घेऊन आलां तर राज्य सहज आपल्या हातीं येईल." लोभी राघोबाने अहल्याबाईवर स्वारी करण्याचें ठरविलें.

बाईला ही बातमी कळली होतीच. ती मुळीच डगमगली नाही. तिने शिंदे, गायकवाड, भोंसले वगैरे मराठे सरदारांनाहि आपली स्थिति कळवून मदतीस येण्याची विनंति केली. त्यानी तिच्यासाठी मदत देण्याचें कबूल केलें. बहुतेकांनी तिच्या मदतीस सैन्यहि पाठविलें.

राघोबा इंदूरनजीक आले तों त्यांना कळून आलें की, बाईशीं लढणें आपणाला वाटलें होतें तितकें सोपें नाही बाई

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

नेहि राघोबास निरोप पाठविला कीं, "आपण मजवर चालून येण्यापूर्वी पुरता विचार करावा. आपण माझा पराभव केला तर त्यांत मला वाईट वाटण्याचें कारणच नाही. कारण मी बोलून चालून बायकोमाणूस ! उलट पक्षीं आपला पराजय जर माझ्या हातून झाला, तर मात्र लोक काय म्हणतील याचा विचार आपण करावा." आपण कोठून या भानगडींत पडलों असें राघोबाला झालें. मालोजीच्या मृत्युनंतर आपण केवळ समाचारास आलों आहों व लढाईचा आपला मुळींच इरादा नाही असा निरोप त्याने बाईस पाठविला; व बाईशीं दोन सामोपचाराच्या गोष्टी बोलून तो पुण्याकडे परत गेला. यापुढे बाईला स्वतःच्या मर्जीप्रमाणे कारभार चालविण्यास हरकत राहिली नाही.

राज्याचा कारभार ती फार दक्षतेने पाही. ती रयतेपासून वसूल थोडा वसूल घेई. वतनदारांच्या हक्कांस फार जपत असे. न्यायाचा निवाडा करण्याचें काम तिने पंचाकडे सोपविलें होतें. तरी कित्येक फिर्यादी ती स्वतः ऐके. तिची गाठ घेण्यास केव्हाहि आडकाठी नसे. संस्थानच्या गरजांना लागेल तितका पैसा तिजोरींत ठेवून बाकीचा ती देवधर्मासाठी वेगळा ठेवी. राज्यकारभाराचें काम आटोपून जो वेळ सापडे, तो ती साध्वी ईश्वर भजनांत व पुण्यकर्मांत घालवी. तिच्या औदार्याचें, भूतदयेचें व धार्मिकतेचें स्मारक जेथे नाही असा हिंदुस्थानचा कोणताच भाग नाही. काशीपासून रामेश्वरापर्यंतच्या सर्व क्षेत्रांत अहल्याबाईचें कांही ना कांही तरी पुण्यकृत्य दृष्टीस

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पडतेंच कोठे देवालयें, कोठे तलाव, अन्नसत्रें व कोठे देवस्थानांस इनामें दिलेलीं सर्वत्र आढळतात. यामुळे या थोर साध्वीचा लौकिक सर्व हिंदुस्थानांत पसरलेला आहे.

तिची दिनचर्या मोठी वाखाणण्यासारखी असे नित्य पहाटे उठून स्नान करावें व प्रातःस्मरण वगैरे आटोपून पुराण ऐकावें. मग गोरगरिबांस शिधा द्यावा; आणि नंतर भोजन करावें असा तिचा क्रम असे. मद्य व मांस यांस तीं अगदी शिवत नसे. भोजनानंतर संध्याकाळपर्यंतचा वेळ ती राज्यकारभारांत घालवी. सायंकाळीं पुन्हा देवपूजा करून फराळ करी, आणि त्यानंतर पुन्हा कामाला सुरवात होई, तें अकरा वाजे तोंपर्यंत चाले.

त्यावेळीं इंदूर हें एक लहान गाव होतें. त्याचें अहल्याबाईने मोठें शहर केलें. नर्मदेच्या कांठी महेश्वर हें क्षेत्रहि तिचें एक आवडतें स्थान होतें. घाट, देवळें वगैरे बांधून तिने त्याला फार शोभा आणली आहे.

इंदूरच्या आसपासच्या मुलखांत या वेळी दंगेधोपे, लढाया वा लुटालूट सुरु होती. पण अहल्याबाईने आपल्या साधुवृत्तीने व कुशल कारभाराने इंदूरची सर्व बाजूंनी उन्नति केली. याप्रमाणे सुमारे तीस चाळीस वर्षें राज्यकारभार करून ही साध्वी आपल्या वयाच्या ७० व्या वर्षीं परलोकवासी झाली. (इ. स. १७९४).

इतकी आदर्शभूत स्त्री हिंदुस्थानांत तर काय, पण जगाच्या इतिहासांत देखील सापडणें कठीण जाईल. तारुण्याच्या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

भर ज्वानींत पतिवियोग व त्यानंतर लवकरच पुत्रवियोग झाला असतां, केवळ कर्तव्यनिष्ठेने व निःस्वार्थीपणाने राज्यपालनाचें व्रत तिने जन्मभर चालविलें. असें स्त्रीरत्न आपल्या देशांत पैदा झालें याबद्दल कोणा स्वदेशाभिमानी मनुष्यास अभिमान वाटणार नाही ?

प्रश्न

(१) चुकीचीं विधानें खोडा.

(१) अहल्याबाई पतीशवाबरोबर सती गेली.

(२) या थोर साध्वीचा लौकिक सर्व हिंदुस्थानांत पसरलेला आहे.

(२) स्मृति चांचणी—(१) अहल्याबाईचें चरित्र थोडक्यांत लिहा. (२) तिची दिनचर्या कशी होती ? (३) अहल्याबाईने राज्यपालनाचें व्रत कसें चालविलें ?

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

धडा ३४ वा

कोलंबस



मुलांनो, अमेरिका या नांवाचें जें खंड आहे, त्याचा सुमारे चारशें वर्षांपूर्वी आशिया व युरोप खंडांतील लोकांस पत्ताहि नव्हता. आफ्रिका खंडाचा उत्तर किनारा मात्र त्यांना माहीत होता.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कोलंबसास या अमेरिका खंडाचा शोध कसा लागला हें आपण आतां पाहूं.

आपल्या हिंदुस्थान देशाची पूर्वीपासून व्यापार व कला कौशल्याबद्दल फार प्रसिद्धी होती. येथे तयार झालेलें रेशमी व सुती कापड, मोती, हिरेमाणकें वगैरे रत्ने, जडावाचें व नक्षीचें सामान इत्यादि पदार्थांस युरोपांत फार मागणी असे. हे सर्व पदार्थ जेथून येतात तो देश नक्की कोठे आहे. याची युरोपच्या व्यापाऱ्यांना कल्पनाहि नव्हती. ते अरब लोकांशीं व्यापार करीत व अरब लोक हिंदुस्थानचा माल त्यास पुरवीत.

कोलंबस ज्या सुमारास जन्मला त्या काळीं मात्र युरोपियन लोकांना हिंदुस्थानाविषयी प्रत्यक्ष माहिती करून घ्यावी. त्याशीं स्वतःच व्यापार करावा अशी इच्छा होऊं लागली होती.

कोलंबस हा इटाली देशांतील जिनोआ शहरचा रहिवासी. बालपणापासून दर्यावर्दीपणाची व धाडसाची त्याला आवड होती. त्याने त्या वेळची भूगोलाविषयींची सर्व माहिती मिळविली. त्यावरून त्याची खात्री पटली की, पृथ्वी वाटोळी नारिंगासारखी आहे; व म्हणून पूर्वेकडे जाण्याऐवजीं पश्चिमेकडे जरी सरळ जात राहिलें तरी हिंदुस्थान देशाला पोचणें शक्य आहे. ही कल्पना बरोबर होती, हें आता मुलांना देखील कळतें. पण चारशें वर्षांपूर्वी लोकांना ती कल्पना मुळीच पटत नव्हती.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

युरोपच्या पश्चिमेस अटलांटिक महासागर आहे. त्यांतील कॅनेरी बेटांपर्यंतची माहिती लोकांना होती. पण पुढे अफाट समुद्र असून दुसरें कांही नाही असें सर्व मानीत. कोलंबसाच्या मनाने घेतलें की, पश्चिमेकडेच आणखी पुढे गेल्याने हिंदुस्थानचा स्वतंत्र जलमार्ग आपणास सापडेल. पण तो स्वतः गरीब होता. प्रवासाला लागणारीं जहाजें व खलाशी ठेवण्यास लागणारा पैसा त्याजपाशीं नव्हता. म्हणून त्याने स्पेन देशाचा राजा फर्डिनंड व राणी इझाबेला ह्यांना आपली कल्पना समजावून सांगितली. राजाराणींनी त्यास मदत देण्याचें कबूल केलें; इ. स. १४९२ च्या ऑगस्ट महिन्यांत कोलंबस आपल्या विख्यात सफरीवर निघाला. बरोबर तीन जहाजें होतीं. त्यांवरील खलाशी मोठ्या नाखुशीने किंवहुना जबरदस्तीने-त्याबरोबर जाण्यास राजी झाले होते. जहाजें निघून तीन दिवस होतात न होतात तों एकाचें सुकाणूं च विघडलें. तें दोघा नावाड्यांनीच विघडविलें होतें. मोठ्या मुष्किलीने तें दुरुस्त करून कोलंबस पुढे निघाला. कॅनेरी बेटांत पोचेपर्यंत आणखी एक जहाज विघडलें व तें सुधारण्यासाठी या बेटांवर तीन आठवडे मुक्काम करावा लागला. या अडचणींनी कोलंबस मागे फिरेल ही खलाशांची आशा मात्र निष्फल झाली. कारण जहाज दुरुस्त होतांच कोलंबसाने पुढचा प्रवास सुरू केला.

आता मात्र अथांग व अफाट समुद्राची हद्द लागली. जिकडे पाहावें तिकडे खाली पाणी आणि वर आकाश; दुसरें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कांही नाही. दररोज आपण किती मैल प्रयास केला हें कोलंबस काळजीपूर्वक मोजी; पण त्याची खलाशांना मात्र दाद देत नसे, कारण आपल्या देशापासून आपण फार दूर आलों या कल्पनेनेच ते घाबरावयाचे ! एके दिवशीं आकाशांतून एक एक मोठी उल्का (पडणारा तारा) पडली. खलाशांना वाटलें हा फार मोठा अपशकुन झाला; व ते मागे फिरण्याचा आग्रह करूं लागले. पण कोलंबस कसचा त्यांना भीक घालतो ? सुदैवाने हवा पाठीकडून व अनुकूल वाहत होती आणि जहाजें झपाट्याने चाललेलीं होतीं.

ज्याला जमीन प्रथम दिसेल त्याला एक मोठें बक्षीस मिळेल, असें स्पेनच्या राजाने जाहीर केलें होतें. म्हणून जो तो पश्चिमेकडे सारखी नजर लावी. एके दिवशीं निना नांवाचें जहाज सर्वांत पुढे होतें त्यावरून 'जमीन दिसली' अशा अर्थाची तोफ उडाली ! पण जी जमीन वाटली तो काळा ढग होता !

आता मात्र खलाशांनी हातपाय गाळले. त्यांची समजूत घालतां घालतां कोलंबसाच्या नाकीं नव आले ! शेवटी आणखी तीनच दिवस पुढे जावयाचें असें ठरलें. तिसऱ्या दिवशीं त्यांना जमीन जवळपास असल्याचीं स्पष्ट चिह्नें दिसूं लागलीं. जमिनीवरच राहणारे असे कांही पक्षी त्यांना आढळले. तसेंच कांही झाडांच्या फांद्या व त्यांवर ताजीं फळें हीं आढळलीं. तेव्हा सर्वांना मोठी उमेद आली. त्याच रात्रीं कोलंबसाला दूर कोठे तरी दिवा दिसल्याचा भास झाला.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

त्याने "चांगलें बारकाईने न्याहाळून पहा." असा सर्व खलाशांना हुकूम सोडला; व ज्याला जमीन प्रथम दिसेल त्याला स्वतःच्या पदरचेंहि एक वक्षीस देण्याचें वचन दिलें.

शेवटी त्याच रात्रीं पहाटेस दोन वाजतां पिंटा जहाजाच्या कप्तानने जमीन दिसल्याची तोफ उडविली. सर्व रात्र तशींच घालवून कोलंबस सकाळीं पाहतो. तों त्यास एका बेटाचा वालुकामय किनारा दिसला. त्यासरशीं 'जमीन, जमीन' अशी आनंदाची आरोळी सर्व जहाजांमधून उठली !

कोलंबस कांही निवडक लोकांसह बेटावर उतरला. त्याने एक खांब उभारून त्यावर स्पेन देशच्या राजाचें निशाण लावलें व त्याच्या नांवाने हा प्रदेश काबीज केला असें पुकारलें.

या बेटांतील लोक अत्यंत अडाणी व नागवे उघडे होते. कोलंबस व त्याची मंडळी पाहतांच त्यांनी भिऊन पळच काढला. ते तांबूस रंगाचे होते. त्यांनी आजपर्यंत गोऱ्या रंगाचीं माणसें कधी पाहिलीं नव्हतीं. हीं माणसें बहुधा स्वर्गांतील देव असावें, असें त्यांना वाटलें. कोलंबस व त्याचे कप्तान यांनी या लोकांना धीर यावा म्हणून लाल टोप्या, रंगीत काचेचे मणी, वगैरे जिन्नस त्यांना नजर केले. त्यांनी ते अगदी खूष झाले. मग ते कापसाचें सूत, पोपट व आपले कांही खाण्याचे कंदमूलादिक पदार्थ घेऊन जहाजांपाशी पोहत आले. अशा रीतीने उभयपक्षी दोस्ती झाल्यावर

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कोलंबसाने त्यांपैकी एका माणसाच्या मदतीने (बऱ्याच अंशीं खुणांनी) असा पत्ता लावला की, त्या बेटाच्या आसपास आणखी पुष्कळ बेटें आहेत व तेथे सोनें पुष्कळ आहे. मग ही मंडळी तिकडे गेली. त्या वेळीं त्यांना क्यूबा बेटाचा शोध लागला. कोलंबसास वाटलें, आपण ज्या हिंदुस्थान देशाचा शोध करीत होतों तो हाच; म्हणून त्याने त्यास 'इंडीज' म्हणण्यास सुरवातहि केली. व तेथील लोकांस 'इंडियन' म्हणूं लागले. पुढे खरी स्थिति कळल्यावर या बेटांस 'वेस्ट इंडीज' असें नांव पडलें. आणखी कांही बेटांचा शोध कोलंबसाने लावला.

यानंतर स्पेन देशच्या राजाची खातरी करण्याकरितां तांबड्या इंडियन लोकांपैकी कांही माणसें, तिकडील कांही वस्तु व प्राणी, आणि झाडांचे व फुलाफळांचे नमुने बरोबर घेऊन कोलंबस परत स्पेन देशास गेला.

राजाने त्याचें अपूर्व स्वागत करून फार सन्मान केला व त्याने सांगितलेली हकीकत फार लक्षपूर्वक ऐकली. आता कोलंबसाबरोबर फिरून 'इंडीज' कडे जाण्याबद्दल खलाशांत चढाओढ लागली ! त्याने आणखी तीन खेपा या प्रदेशाकडे केल्या व कांही नवा प्रदेश शोधून काढला. तिसऱ्या खेपेस त्यास दक्षिण अमेरिकेचा किनारा लागला होता. इकडे स्पेनच्या लोकांना या परक्या माणसाच्या उत्कर्षाचा हेवा वाटूं लागला. त्यांनी राजाराणीस खोट्यानाट्या चहाड्या सांगून त्याचें मन कलुषित केलें. त्यामुळे कोलंबसाचें उत्तर

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वय वऱ्याच हालअपेष्टांत गेलें. इ. स. १५०६ सालीं या धाडसी वीराचा अंत झाला.

यानंतर थाड्याच दिवसांनी अमेरिगो याने कोलंबसाच्या तिसऱ्या सफरीच्या मार्गाने अधिक शोध केला व दक्षिण अमेरिकेचा पक्का शोध लावला. यामुळे या नवीन खंडास 'अमेरिका' असें नांव पडलें. या शोधाने जगाच्या इतिहासाला एक नवीनच वळण लागलें.

प्रश्न

(१) खरें किंवा खोटें हें लिहा.

(१) कोलंबसाने अमेरिकेचा शोध लावला नाही—

(२) अमेरिगो यानें अमेरिकेचा शोध लावला—

(२) स्मृति चांचणी:—(१) प्राचीन काळीं हिंदुस्थानची प्रसिद्धी कशाकरितां होती ? (२) कोलंबसाचें चरित्र थोडक्यांत लिहा. (३) कोलंबसाचें उत्तर वय हाल अपेष्टांत कां गेलें ?

धडा ३५ वा

द्रौपदी व सत्यभामा

पांडव वनवासांत होते. त्यावेळीं एकदा श्रीकृष्ण त्यांना भेटण्यास गेला. कौरवांच्या दुष्टपणामुळे पांडवांवर आलेल्या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आपत्तीने श्रीकृष्णास फार वाईट वाटलें. त्यांचा समाचार घेऊन दोन समाधानाच्या गोष्टी त्यांना सांगाव्या, हा श्रीकृष्णाचा उद्देश होता.

येतांना त्याने आपली धाकटी पत्नी सत्यभामा हिलाहि बरोबर आणलें होतें. सत्यभामा मानी स्वभावाची स्त्री होती. क्षुल्लक कारणावरून तिला राग येत असे; व दिवसांतून ता किती वेळां रुसेल फुगेल याचा नेम नसे. श्रीकृष्णहि तिच्याशीं मोठ्या खुबीने वागून तिचा रुसवा काढी. पण चांगली सुस्वभावी पत्नी स्वतःला, पतीला व कुटुंबांतल्या सर्व माणसांना कशी सुखी करते, याचा सत्यभामेला चांगला धडा मिळावा व तिच्या वर्तनांत सुधारणा व्हावी, हाहि हेतु तिला आणण्यांत श्रीकृष्णाच्या मनांत होता. मात्र तो त्याने बोलून दाखविला नव्हता.

श्रीकृष्ण भेटल्यामुळे पांडवांना व विशेषतः द्रौपदीला फार आनंद झाला. रानावनांत राहत असूनहि द्रौपदीच्या दक्षतेमुळे पांडवांचा संसार अत्यंत सुखाने चालला होता. हें पाहून सत्यभामेला मोठा अचंबा वाटला. कोणावर रागावणें नाही, धुसफुसणें नाही; चेहरा सदा आनंदी. झाडपाल्यांचीच झोपडी. पण ती झाडून, सारवून स्वच्छ ठेवलेली. घरांतील जिन्नस जेथल्या तेथे व्यवस्थितपणें ठेवलेले. ही टापटीप, नियमितपणा व आनंदाचा संसार पाहून सत्यभामा द्रौपदीस म्हणाली, "काय हो वन्सं, आज आठ दहा दिवस झाले, पाहतें आहें; तुमच्या घरीं आपल्या सगळ्या गोष्टी

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

बिनबोभाट व सुखासमाधानानें होत आहेत. तुमची व तुमच्या पतींची बोलाचाली किंवा रुसवारुसवी कधी होत नाही; ते तुमच्यावर कधी रागावलेले दिशत नाहीत. उलट ते तुमच्या अगदी अर्ध्या वचनांत आहेत असें दिसतें. तुम्ही जें म्हणतां तें त्यांना मान्य. असा कोणता मंत्र किंवा औषधी तुमच्यापाशी आहे ? मला तरी सांगा ती !"

द्रौपदीः—सत्यभामावहिनी ! वेड्या तर नाही तुम्ही ? अहो, यांत मंत्र कसला व औषध कसलें ? मजजवळ यांतलें कांहीच नाही. व औषधाने आणि मंत्राने का कोठे पति स्वाधीन होत असतात ? छेः छेः ! असल्या कल्पना मनांत देखील आणूं नका ! पुष्कळ वेड्या बायका मंत्र, तोडगे व औषधें यांच्या नादाला लागतात व स्वतःच्या किंवा पतीच्या जिवाला अपाय करतात. तुम्हीं असल्या फंदांत मुळीच पडूं नका !

सत्यभामाः—काय म्हणतां ? मंत्रतंत्र कांही नाही ? मग कसल्या उपायांनी तुम्हीं पतींना इतकें स्वाधीन करून ठेवलें आहे ?

द्रौपदीः—सांगतें ऐका. पत्नीचें काम घरची व्यवस्था पाहण्याचें. तें तिने टापटिपीने केलें; वेळेला सुग्रास अन्न पतीला मिळेल असें केलें; बाहेरून थकूनभागून आलेल्या पतीचें प्रसन्न मुद्रेने स्वागत करून त्याला समाधान वाटेल असें गोड भाषण केलें; मुलांची शुश्रूषा चांगली केली; पाहुणे,

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अतिथि यांचा सत्कार करून त्यांना प्रसन्न ठेवलें, म्हणजे कोणता शाहणा पति असंतुष्ट राहील बरें ?

मी या सर्व गोष्टींविषयीं फार काळजी घेतें. दागिने, कपडे यांचा लोभ मला नाही. पुष्कळ स्त्रिया या बाबतींत आपल्या पतींना छळतात. आपली ऐपत किती आहे. आपल्या वस्त्रभूषणांवर पतीला किती खर्च करतां येईल, हें न पाहतां, मला अमुक पाहिजे, तमुक पाहिजे असा लकडा पतीच्या मागे लावणाऱ्या स्त्रियांचें पतीशीं कसें जमावें ? मी कोणत्याहि गोष्टीबद्दल हट्ट धरून बसत नाही. देवाने दिलेल्या स्थितींत संतोषानें राहतें. काटकसरीने राहणाऱ्या पत्नीला गरिबीचा संसारहि सुखाचा करतां येतो, हें मला या वनवासांत चांगलें कळून आलें आहे.

सर्वांत महत्त्वाची गोष्ट ही की, क्वचित् पति रागावले तरी त्यांच्या तोंडाला तोंड देऊं नये. शब्दाने शब्द वाढतो; व भांडण रुसवा असले प्रकार वाढतात. चूक कोणाकडूनहि झाली असली तरी कोणी तरी नमतें घेतल्याशिवाय भांडण मिटत नाही; व गोड भाषणानें उत्तर दिलें म्हणजे बहुधा रागावलेल्या माणसाचा राग शांत होतो, असा माझा अनुभव आहे. प्रेमानेच प्रेम वाढतें. मी आपल्या पतीवर अढळ प्रेम करतें, त्याच्या सुखासाठी सदोदित झटतें; त्याचें सुख तें माझें सुख. त्यांचा संतोष तोच माझा संतोष असें मानतें; म्हणून माझे पतीहि माझा शब्द कधी खाली पडूं देत नाहीत.

हाच माझा मंत्र व हीच माझी औषधि बरें, सत्यभामाबाई ?

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

या भाषणाचा सत्यभामेवर फार परिणाम झाला, तिने द्रौपदीचे मनापासून आभार मानले, दुसऱ्या दिवशीं श्रीकृष्ण-सत्यभामा पांडवांचा निरोप घेऊन द्वारकेस परत गेले !

प्रश्न

(१) स्मृति चांचणीः—(१) वनांतल्या द्रौपदीच्या संसाराचें वर्णन करा. (२) श्रीकृष्णाच्या मनांत पांडवांच्या भेटीला येण्यांत कोणते हेतु होते ? (३) पति आपल्या ताब्यांत राहावा म्हणून बायकांनी कसें वागावें ?

(२) समानार्थी शब्द सांगून त्यांचा वाक्यांत उपयोग करा—सुग्रास, सुस्वभाव, धुसफुसणें, अर्धें वचन, स्वागत.

धडा ३६ वा

स्फुट श्लोक

वानोत निंदोत सुनीतिमंत
चळो असो वा कमला गृहांत ।
हो मृत्यु आजीच घडो युगांतीं
सन्मार्ग टाकून भले न जाती ॥ १ ॥
योजी हिताप्रति निवारुनि पापकर्मे
वर्णी वरेच गुण झांकुनियां कुकर्मे ।

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

दे आपणास, असतां व्यसनीं त्यजीना
सन्मित्रलक्षण असें वदतात जाणा ॥ २ ॥
श्रुतेंचि की श्रोत्र न कुंडलाने
दानेंचि की पाणि, न कंकणाने ।
साजे तथा देहहि हा न आनें
परोपकारेंचि, न चंदनाने ॥ ३ ॥
आली जरी कष्टदशा अपार
न टाकिती धैर्य तथापि थोर ।
केला जरी पोत बळेंचि खालें
ज्वाला तरी ते वरती उफाळे ॥ ४ ॥
वृक्ष फार लवती फलभारें
लोंबती जलद घेउनि नीरें ।
थोर गर्व न धरी विभवाचा
हा स्वभाव उपकारपराचा ॥ ५ ॥

वामनपंडित.

प्रश्न

(१) स्मृति चांचणीः—(१) भल्या लोकांचा मार्ग कोणता ?
(२) सन्मित्राचीं लक्षणें सांगा.
(३) थोर लोकांचें मन कसें असतें, उदाहरण देऊन स्पष्ट करा.

(२) कृतिपरः—(१) सन्मित्र लक्षण सांगणारा श्लोक मुखपाठ म्हणा व त्याचा सरळ अर्थ लिहा.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

धडा ३७ वा

हजरत महंमद पैगंबर

मुसलमानी धर्माचे संस्थापक महंमदसाहेब यांचा जन्म अरबस्तानांत मक्का येथे इ. स. ५७१ या सालीं झाला. त्या वेळचे अरब लोक मूर्तिपूजक होते. मक्का हें त्यांच्या देवतांचें प्रमुख स्थान होतें. तेथील देवळांची व्यवस्था ज्या कुरेशी नामक कुलाच्या हातीं होती, त्यांतच महंमदसाहेब जन्मास आले, त्यांचे आईबाप लहानपणींच वारले, म्हणून त्यांचें पालनपोषण त्यांच्या चुलत्याने केलें. या वेळीं त्यांच्या घराण्याची स्थिति चांगलीशी नव्हती, यामुळे महंमदसाहेबांस लहानपणीं गुराख्याचा धंदा करावा लागला.

त्यांचें वय सरासरी पंचवीस वर्षांचें झालें, त्या संधीस त्यांची सचोटी, शांत स्वभाव व प्रेमळपणा पाहून खदीजा बिबी नांवाच्या श्रीमंत विधवा स्त्रीने त्यांच्याशीं विवाह केला. तेव्हा त्यांची गृहस्थिति बरीच सुधारली.

महंमदसाहेब लहान होते तेव्हांपासून त्यांचें लक्ष धर्ममार्गाकडे होतें. त्यांनी यहुदी व ख्रिस्ती धर्माशीं आपला परिचय करून घेतला. त्यामुळे मूर्तिपूजेवरील त्यांची भक्ति हळू हळू कमी होत गेली. पुढे वयाच्या चाळिसाव्या वर्षाच्या सुमारास ईश्वर एकच आहे असें आपल्या बांधवांस

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सांगण्याचा ईश्वराकडून आपणास संदेश आला आहे, अशी त्यांची दृढ भावना झाली; व त्याचप्रमाणे मी ईश्वराचा पैगंबर (प्रेषित अथवा दूत) आहें असें ते म्हणवूं लागले.

दोन तीन वर्षांत त्यांचे बरेच अनुयायी झाले. पण त्यांनी मूर्तिपूजेवर केलेल्या झणझणीत टीकेने जुन्या धर्माच्या अनुयायांत विलक्षण खळबळ उडाली. त्यांनी महंमदसाहेबांचा छळ करण्यास आरंभ केला; तथापि महंमदसाहेबांनी आपलें धर्मोपदेशाचें काम तसेंच चालूं ठेवलें. यामुळे तर मूर्तिपूजकांना फारच राग आला. पुढे त्यांनी महंमदसाहेबांस ठार करण्याचा घाट घाताला. हें जेव्हा त्यांस कळलें, तेव्हा ते मदीना येथे निघून गेले. या गोष्टीस हिजरा अथवा देशत्याग म्हणतात; व याच (इ. स. ६२२) वर्षापासून हिजरी सन सुरू होतो.

मदीनेस मात्र महंमदसाहेबांचा जम उत्तम बसला. तेथील लोकांनी लवकरच त्यांच्या धर्माचा स्वीकार केला. यापुढे केवळ धर्मोपदेशाने आपलें काम भागणार नाही; कट्टर मूर्तिपूजकांपासून आपला बचाव करण्यासाठी हातांत शस्त्र घेतलें पाहिजे. असें महंमदसाहेबांनी ठरविलें; व त्याप्रमाणे दहा वर्षें युद्ध करून त्यांनी मक्का व सर्व अरबस्थान आपल्या ताब्यांत आणलें व तेथे मुसलमानी धर्माची स्थापना केला.

महंमदसाहेब आता राज्यकर्तेहि बनले होते व त्यांस खलीफाची पदवी प्राप्त झाली होती. तथापि त्यांनी आपली

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

साधी राहणी मुळीच सोडली नाही. त्यांनी त्या वेळच्या आडदांड व रानटी अरबांना शिस्त लावून त्यांचें एक प्रबल राष्ट्र बनविलें. त्यांच्यांतील बालहत्या, जुगार, दारूबाजी वगैरे वाईट चाली मोडून टाकल्या. अरब लोकांत एका पुरुषानें अनेक बायका करण्याची चाल होती. कोणीहि चारांपेक्षा जास्त बायकांशीं लग्न लावूं नये असा त्यांनी कडक नियम घातला.

थोड्याच दिवसांत महंमदी धर्माचा प्रसार पूर्वेस सिंधु नदीपर्यंत व पश्चिमेस ईजिप्तपर्यंत झाला. तरवारीच्या जोरावर धर्माचा प्रसार करण्यास कांहीच हरकत नाही, असें पुढे पुष्कळ मुसलमानांस वाटे. पण हजरत पैगंबरांचीं वचनें ज्या कुराण ग्रंथांत संग्रहीत केलीं आहे त्यांत या मतास आधार नाही.

मुसलमान लोकांची आपल्या धर्मावरील श्रद्धा फार दांडगी असते. धर्मासाठी ते प्राण देखील देण्यास तयार असतात. त्यांच्यांत जातिभेद मुळीच नाही. यामुळे त्यांच्यांत एकी चांगली राहते.

इ. स. ६३२ मध्ये महंमदसाहेबांचा अंत झाला.

प्रश्न

(१) खरें किंवा खोटें हें लिहा.

(१) पूर्वी अरब लोक मूर्तिपूजक होते.....

(२) महंमदसाहेबांचा जन्म मदीनेस बसला. नाही.....

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

(२) स्मृति चांचणी:—(१) महंमद पैगंबराचें चरित्र थोडक्यांत लिहा. (२) मुसलमानी धर्मांत कोणत्या गोष्टी सांगितल्या आहेत? (३) मुसलमानापासून कोणती गोष्ट शिकण्यासारखी आहे?

धडा ३८ वा

हॉस्पिटल

डॉ. घारपुरे—वर्धा येथील सिव्हिल सर्जन यांचा मुक्काम सिंदी येथे असतांना एक कुणबी त्यांच्याकडे आला व म्हणाला, "साहेब, माझा मुलगा घरीं पोटदुखीने फार बेजार आहे. पोटांत मुळी अन्न ठरतच नाही, कृपा करून त्याला एकदा येऊन पहा."

डॉक्टर साहेब फार दयाळू होते. त्यांनी जाऊन मुलास तपासलें, पोटांत रोग झाला असून ऑपरेशन (चीरफाड) केल्याशिवाय तो बरा होणें शक्य नाही असें त्यांना आढळलें. ते म्हणाले, "पुंडलीकबुवा, घाबरण्याचें कांही कारण नाही. याला वर्ध्याला हॉस्पिटलांत घेऊन या. तेथे मुलाला लवकर आराम पडेल." पुंडलीकबुवा पडला अडाणी कुणबी. शस्त्रक्रिया व

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

चीरफाड म्हणतांच तो घाबरला. पण चारचांघांनी त्याची समजूत घातली, तेव्हा मुलाला घेऊन तो वर्ध्यास गेला. डॉक्टरांनी ऑपरेशन केलें, तें चांगलें झालें; आठच दिवसांत मुलगा हिंडूं फिरूं लागला. डॉक्टरांनी विचारलें. "कसें काय नारायण ? तुला फार भय वाटत होतें ना ऑपरेशनचें ? मग आता कसें काय वाटतें ?"

नारायणः—आता नाही वाटत त्याचें, पण का हो ! तुम्हीं मला कसलें औषध हुंगण्यास दिलेंत तेथपर्यंत मला सर्व माहीत आहे. पुढे पाहतों तों पोटाला पट्या बांधून मला खाटेवर निजविलें होतें असें आढळलें, मध्ये काय झालें कांहीच आठवत नाही.

डॉक्टर :—(हसून) तुला कांही समजूं नये, म्हणूनच तर तें भुलीचें औषध हुंगावयास दिलें होतें. त्यामुळे चीरफाड करतांना फार सोय होते. पूर्वी अशी सोय नव्हती. त्या वेळीं रोगी रडून ओरडून गोंधळ करीत; त्यांना घट्ट धरून ठेवावें लागे. नाहीतर ते मध्येच हालावयाचे व त्यामुळे हत्यार वेडेंवाकडें लागून अपाय व्हावयाचा. असे अपाय पूर्वी होतच असत, या गुंगीच्या औषधामुळे आम्हांला आता पुष्कळ रोग शस्त्रक्रियेने बरे करतां येतात.

नारायणः—मला तुमचें सर्व हॉस्पिटल पाहावयाचें आहे. दाखवितां का ?

डॉक्टरः—हो हो, मोठ्या आनंदाने. मला या वेळीं सगळी

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कडे हिंडून तपासणी करावयाची असते. चल माझ्याबरोबर.

डॉक्टरांनी नारायणाला प्रथम सर्व वॉर्ड (रोग्यांच्या खोल्या) दाखविले. पुरुषांचे, बायकांचे व लहान मुलांचे वॉर्ड वेगवेगळे होते. प्रत्येक रोग्यास स्वच्छ बिछान्यावर निजविलें होतें. त्यांना पथ्याचें देणें, त्यांना स्नान घालणें, अगर ओल्या फडक्याने अंग पुसून घेणें, त्यांना वेळच्या वेळीं औषधपाणी



देणें, हीं कामें तेथे स्वच्छ पोशाक केलेल्या नर्स-बाया-करीत होत्या. डॉक्टर प्रत्येक रोग्यास त्यांच्या प्रकृतीबद्दल प्रश्न विचारीत व पथ्यापाण्यांत कांही फरक करावयाचा असल्यास त्याबद्दल सांगत.

पलीकडे मुख्य डॉक्टर व त्यांच्या हाताखालचे डॉक्टर यांच्या बसण्याच्या खोल्या होत्या. तेथे ते रोग्यांना तपासीत

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

त्यांनी औषधाचा कागद लिहून दिला, म्हणजे रोग्यांना कांपाउंडरकडून औषध मिळे.

एका खोलींत रोग्यांची थुंकी, रक्त, लघवी वगैरे तपासण्याचें सर्व सामान मेजावर व्यवस्थित रीतीने ठेवलेलें होतें. डॉक्टर म्हणाले की, अशा तपासणीने रोगाचा अंदाज चांगल्या तऱ्हेने होतो. आणखी एक मौज त्यांनी दाखविली. एका प्रकारच्या किरणांनी आपल्या शरिरांतील हाडें तेवढीं स्पष्ट दिसतात. असें त्यांनी सांगितलें व तशा तऱ्हेने काढलेला एका माणसाच्या मांडीचा फोटो त्यांनी दाखविला. त्या माणसाला चुकून एक बंदुकीची गोळी लागली होती. ती गोळी या फोटोंत अगदी स्पष्ट दिसत होती. अशा तऱ्हेनें गोळी कोठे आहे याचा नक्की पत्ता लागला, म्हणजे भलती कडेच चीरफाड न करतां नेमकी पाहिजे तेथेच करतां येते.

मग डॉक्टरांनी नारायणास ऑपरेशनची खोली दाखविली. तेथील सामग्री व व्यवस्था पाहून त्याला फारच आनंद झाला. नानातऱ्हेचीं शस्त्रें, चाकू, सुऱ्या, पकडी, चिंमटे इत्यादि हत्यारें स्वच्छ लखलखीत दिसत होतीं. शस्त्रक्रियेसाठी रोग्यांस निजविण्याचें मेज देखील मौजेचें होतें. त्याला मध्ये बिजागऱ्या होत्या. त्यामुळे त्याचा कोणताहि भाग पाहिजे तितका खालवर करून रोग्याला आराम वाटेल असें करतां येत होतें. त्या दिवशीं एक लहानसें ऑपरेशन नारायणाने प्रत्यक्ष पाहिलें.

नारायण म्हणाला, "डॉक्टरसाहेब, खरेंच किती उपयोगी

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आहे हें हॉस्पिटल ! पण शहरांतच या सर्व सोयी असतात. आमच्या खेड्यांत कोठून त्या मिळायला ?"

डॉक्टर म्हणाले, "खरें आहे. हें सर्व काम फार खर्चाचें आहे. म्हणून सरकारला जिल्ह्याच्या मुख्य ठिकाणांखेरीज इतर ठिकाणीं ठेवणें शक्य होत नाही. तहसिलीच्या अथवा इतर मोठ्या गावीं लहान लहान दवाखाने असतात व तेथे किरकोळ रोगांवर इलाज करतात. दहा पंधरा मैलांच्या टापूंत असा एखादा दवाखाना बहुधा असतो. कांही फिरते डॉक्टरहि सरकार नेमतें. बहुधा प्लेग, पटकी वगैरे साथींच्या रोगांबद्दल लोकांना महिती देतात व औषधें पुरवितात. देवीची लस टोचण्याची व्यवस्था बहुतेक ठिकाणीं करण्यांत आली आहे. यापेक्षा जास्त व्यवस्था होईल; पण त्यास आपल्याकडील धनिक लोकांना धर्मार्थ पैसा देण्यास तयार झालें पाहिजे. युरोप, अमेरिका वगैरे देशांत कोट्यवधि रुपये खर्चून उदार श्रीमंतांनी गरिबांची सोय केली आहे. आपल्या इकडेहि मुंबई, कलकत्ता वगैरे ठिकाणीं अशीं धर्मार्थ हॉस्पिटलें आहेत. पण त्यांची संख्या याहून पुष्कळ वाढणें जरूर आहे."

नारायण व त्याचे वडील दुसऱ्या दिवशीं आपल्या गावीं परत गेले. जातांना पुंडलिकबुवा म्हणाला, "डॉक्टरसाहेब, तुमचे उपकार मी कसे फेडूं ? माझा मुलगा तुम्हीं मृत्यूच्या दाढेंतून सोडविला." डॉक्टर म्हणाले, "यांत उपकार कसले ? तें आमचें कामच आहे. उपकार देवाचे माना."

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

प्रश्न

(१) टिपणें लिहाः—

भुलीचें औषध, कांपाउंडर, मृत्यूची दाढ, सिव्हिल सर्जन, लस टोचणें.

(२) खरें किंवा खोटें हें लिहा.

(१) डॉक्टर लोक श्रीमंतानाच चांगलें औषध देतात.....

(२) गुंगीच्या औषधामुळे चिरफाड करणें सोईचें झालें.....

(३) अपूर्ण वाक्यें पूर्ण कराः—

(१) × × × श्रीमंतांनी × × × × रुपये खर्चून गरिबांची सोय × × × × ×

(२) हिंदुस्थानांत × × × हॉस्पिटलें निघणें × × × × आहे.

धडा ३९ वा

लबाड कोल्हा व भोळसट हरण

(प्रवेश १ ला.)

(एका गुहेंत सिंह आजारी पडला आहे व त्याचा मित्र कोल्हा समाचारास आला आहे.)

सिंहः—मित्रा, कोल्होबा, मला अजून बरें वाटत नाही रे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कोल्हाः—असें काय ? बरेच दिवस झाले आपल्यास आजारी पडून. माझ्याच्याने आपली कांही सेवा होणें शक्य असल्यास आपण सांगावी. मी तयार आहें सेवेला.

सिंहः—कोल्होबा, तुझे आभार आहेत. पण मला वैद्यांनी सांगितलेलें पथ्य अमळ बिकट आहे रे. ते म्हणतात की हरणाचा मेंदू खाल्ल्याखेरीज मला गुण येणें शक्य नाही.

कोल्हाः—काय ? हरणाचा मेंदू ? हें मात्र बिकट खरें. हें काम माझ्याने होणें कठीण दिसतें. हरण किती चपळ जनावर; तें कसचें मला सापडतें ? बरें सापडलें तरी त्याला उचलून आणण्याची ताकद तरी माझ्या अंगीं कोठे आहे ?

सिंहः—तें मला ठाऊक आहे रे ! मी तुला त्याला पकडून आणावयास सांगत नाही. त्याचें मन वळवूनच त्याला येथवर आणलें पाहिजे.

कोल्हाः—(जरा विचार करून) बरें आहे. पाहतों खटपट करून.

(प्रवेश २ रा)

(कोल्हा निघून जातो व थोड्या वेळांत हरणापाशीं पोचतो.)

कोल्हाः—राम राम, हरणोजीराव. कसें काय कुशल आहे ना तुमचें ?

हरणः—राम राम ! आपल्या कृपेने सर्व कांही ठीक आहे; पण आपण आज इकडे कोणीकडे आला ?

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कोल्हाः——म्हणजे ? ती बातमी अजून तुमच्यापर्यंत पोचलीच नाही असें दिसतें.

हरणः——कोणती बातमी बुवा ? मला नाही माहीत !

कोल्हाः——अहो, सिंह अगदी अत्यवस्थ असून मरणाच्या दारीं बसला आहे. सिंह म्हणजे सर्व जनावरांचा राजा. त्याच्यामागून राज्यावर बसण्याला त्याला मुलगाहि नाही तेव्हा आपल्यामागून राज्याचा वारस कोणाला ठरवावा या फिकिरींत तो आहे.

हरणः——असें काय ? कोणाला वरें निवडील सिंह आपला वारसदार ?

कोल्हाः——त्याचीच तर पंत्याला चाईत पडली आहे. आपण राजा व्हावें असें पुष्कळ पशूंना वाटत आहे; पण सिंहाच्या मतें यांपैकी बहुतेक पशूंमध्ये कांही ना कांही तरी दोष आहे. रानडुकर अंगाने व शक्तीने दांडगा; पण त्याला अक्कल कमी; अस्वलाच्या अंगीं शौर्य कांही कमी नाही; पण तें फार सुस्त व झेपाळू ! चित्ता हा दिसायला सुंदर; पण स्वभावाने तिरसट ! वाघ पसंत करावा. तर तो भलताच क्रूर व गर्विष्ठ यांपैकी सिंहाला एकहि पसंत नाही. त्याला फक्त हरणच आपल्या गादीस योग्य असें वाटतें तो म्हणाला, 'उंच व देखणा असून चपळ, तीक्ष्ण व अणकुचीदार शिंगांनी सापाची शिकार करणारा हरणच माझ्यामागे सिंहासनावर बसणें रास्त होईल'.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

[कोल्ह्याचें बोलणें हरणास खरें वाटतें; तो कोल्ह्याबरोबर सिंहाच्या गुहेंत जातो. सिंह त्याच्यावर झडप घालतो. पण तो सिंहाच्या पकडींतून निसटतो.]

सिंहः—अरेरे, निसटला हरण. आता तो फिरून कसचा हातीं लागतो ?

कोल्हाः—महाराज, आपण निराश होण्याचें कारण नाही. त्या मूर्खाला फिरून येथे आणतों; पाहा तर खरें !

सिंहः—काय, एक कान तुटल्यावर सुद्धा हरण पुनः माझ्या गुहेंत येईल म्हणतोस ! जर तूं त्याला येथे फिरून आणलास, तर कोल्ह्यासारखें हुशार जनावर नाही असें म्हणावें लागेल.

कोल्हाः—किंवा हरणासारखें अजागळ जनावर दुसरें नाही असेंहि म्हणतां येईल !

(प्रवेश ३ रा.)

कोल्हाः—राम राम, हरणोजीराव !

हरणः—अरे नीचा ! लाज नाही वाटत तुला फिरून मजशीं बोलावयाची ? एकदम चालता हो येथून; नाहीतर माझीं शिंगें खुपसून तुझा प्राण घेईन !

कोल्हाः—पण-पण झालें काय असें मजवर रागावायला ?

हरणः—अरे दुष्टा, माझा प्राण घेण्याचा बेत करून पुनः मलाच असें विचारतोस काय ?

कोल्हाः—काय वेडे आहां तुम्हीं हरणोजीराव ! हा

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

तुमचा केवळ गैरसमज झाला आहे. अहो, सिंहाला तुमच्याशीं कांही कानगोष्ट करावयाची होती. म्हणून तो तुमच्याजवळ आला. तुम्हीं उगीच घाबरून उडी मारली, त्यामुळे तुमच्या कानाचा तुकडा निघाला. ही गोष्ट सिंहाच्या मनाला इतकी लागली आहे म्हणतां ! "आता माझा कांही नेम नाही; हरणाला दोन समजुतीच्या गोष्टी सांगून तूं लवकर आण. नाहीच आला तो, तर मला आज दुसरा कोणी तरी राज्यपदावर नेमलाच पाहिजे." असें सिंहमहाराज म्हणाले. म्हणून मी फिरून तातडीने तुमच्याकडे आलों.

हरणः—खरें म्हणतां ?

कोल्हाः—अगदी खरें, तुम्ही जर न आलां. तर अखेरीस लांडग्याची स्थापना राज्यपदावर होईल असा रंग दिसतो.

हरणः—(सुस्कारा सोडून) हंः ! वाईट गोष्ट झाली. माझ्याकडून अमळ घाई झाली खरीच !

कोल्हाः—तुम्ही जर जलदी कराल तर कदाचित् अजूनहि तुमचें साधेल.

हरणः—ठीक आहे. चल तर मग. लांडग्यासारखा क्रूर व हलकट पशु राजा व्हावा, हें मला अगदी नापसंत आहे.

(प्रवेश ४ था)

[ते दोघे सिंहाच्या गुहेंत प्रवेश करितात.]

सिंहः—(मुद्दाम कण्हत) कोण आहे तें ?

कोल्हाः—मी आपला सेवक आहे महाराज !

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सिंह:—तुझ्याबरोबर आणखी कोण आलें आहे ?

कोल्हा:—हे माझे दिलदार दोस्त हरणोजीराव. मीं त्यांना सांगितलं की, आपण त्यांच्या कानांत कांही गुप्त गोष्ट सांगणार होतों; पण घाईने हे निसटल्यामुळे आपल्या दातांचा धक्का लागून यांच्या कानास इजा झाली. त्यांना आंता आपली चूक कळून आली आहे. व ते आपल्या हुकमाची वाट पाहत आहेत.

सिंह:—असं काय ? फार चांगलें झालें. पण त्यांना अमळ माझ्या जवळ येऊं द्या. अशक्तपणामुळे माझ्याने मोठ्याने बोलवतहि नाही.

हरण:—आ मी पुढे आलों सांगा महाराज आपला काय हुकूम आहे तो.

सिंह:—आणखी थोडें पुढे या हो ! माझी दृष्टीहि मंद झाली आहे.

[हरण जवळ जातो सिंह एकदम झडप घालून त्याला खाली पाडतो.]

आता मात्र पुरता सापडलास. या खेपेला मी तुला कसचा सोडतों ?

[सिंह त्याला खाण्यांत गुंतला असतां कोल्हा हळूच हरणाचें डोकें बाजूला काढून त्यांतील मेंदूच गट्ट करतो.]

सिंह:—(इकडे तिकडे पाहून) अरे ! पण याचा मेंदूच मला कोठे सापडेना !

कोल्हा:—या हरणाला मेंदू नव्हताच मुळी ! कारण मेंदू

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

असता; तर एकदा अद्दल घडल्यावर फिरून तो माझ्या शब्दावर विश्वास ठेवून ! येथे आलाच नसता !

प्रश्न

(१) कृतिपरः—(१) 'लबाड कोल्हा व भाळसट हरण' हा संवाद करून दाखवा. (२) हा संवाद गोष्टी रूपाने मुलांना सांगा.

(२) प्रत्येकाचें स्वभाव वर्णन करा व त्यांचीं चित्रें काढा.

(१) रानडुकर. (२) अस्वल. (३) चित्ता. (४) वाघ. (५) हरण. (६) कोल्हा. (७) लांडगा.

धडा ४० वा

कांही साथीचे रोग

पटकी, प्लेग व देवी (माता)

डॉ. घारपुरेः—

मुलांनो, आज मी कांही भयंकर साथीच्या रोगांविषयी माहिती सांगणार आहे. या रोगांनीं आपल्या प्रांतांत हजारों

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

लोक दरसाल मरतात. याचें मुख्य कारण लोकांना त्या रोगांची असावी तशी माहिती नसते हें होय.

(१) खेडेगावांत बहुधा दरसाल येणारी साथ म्हणजे कॉलरा अगर महामारी (पटकी) या रोगाची होय. ही बहुधा पावसाळ्याच्या सुरवातीस येते व महिना पंधरा दिवसच टिकते. पण तेवढ्यांत शेकडो माणसें मरून जातात! शेकडा ८० माणसें या रोगाने दगावतात, इतका हा रोग वाईट आहे. या रोगांत माणसाला उलट्या (ओकाऱ्या) व तांदळाच्या पेजेसारखे पांढरे रेच सुरू होतात; लघवी बंद होते; तहान लागून जीव कासावीस होतो; व अशक्तपणा झपाट्याने वाढून एका दिवसांत माणूस मरतो.



कालऱ्याचे जंतु

या दुखण्यांतून वांचणें कठीण, म्हणून तें न होईल अशीच खबरदारी घेणें जास्त उत्तम. याचे जंतु बहुधा घाण पाण्यांतून पोटांत जातात. कोठे तरी या रोगाने आजारी झालेला माणूस असतो. त्याचे रेच, उलट्या यांनी खराब झालेले कपडे नदीमध्ये अगर तलावांत लोक धुतात. त्याने पाणी विघडतें व तें उपयोगांत आणलें की, हा रोग पसरतो. या रोगाच्या प्रसाराला माशांची फार मदत होते.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अशा वेळीं पाणी, दूध वगैरे उकळून पिणें अत्यंत आवश्यक असते. उघडें शिळें अन्न, फाजील पिकलेलीं फळें वगैरे अगदीं खाऊं नयेत. आजारी माणसाच्या उलट्या, रेच वगैरे उघडे पडूं देऊं नये. त्यांवर फिनाईल अथवा राकेल (मातीचें तेल) टाकावें. सर्व मळ दूर नेऊन जाळून टाकावा. कपडे नदींत किंवा तलावांत धुऊं नयेत. प्रथम ते फिनाईलच्या पाण्यांत बुडवून अगर गरम पाण्यांत उकळून मग स्वच्छ पाण्याने धुऊन उन्हांत वाळवून घ्यावे.

आजाऱ्याला चांगल्या वैद्याचा उपाय ताबडतोब करावा. त्याला दूध, बर्फ, कांजी असे हलके पदार्थच खावयास द्यावे.

(२) दुसरा भयंकर साथीचा रोग म्हणजे प्लेग अथवा गाठीचा ताप हा होय. हा या देशांत सुमारे चाळीस वर्षांपूर्वी सुरू झाला. त्या वेळीं याने फार माणसें दगावलीं. आता त्यावरील इलाज माहीत झालेले आहेत, त्यामुळे तितकीं माणसें दगावत नाहीत.



प्लेगचे जंतु

या रोगांत प्रथम खूप, जोराचा ताप येऊन नंतर जांघा, काखा, गळा वगैरे ठिकाणीं गाठा उठतात. रोगाचा जोर फार असला तर दोन तीन दिवसांतच रोगी मरतो. ताबडतोब योग्य औषध-पाणी मिळाल्यास रोगी जगण्याचा बराच संभव असतो.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पण या रोगाचें कारण समजल्याने तो टाळणें मात्र आता सोपें झालें आहे. आता असें नक्की समजलें आहे की, हा रोग प्रथम उंदरांत सुरू होतो व आजारी झालेल्या उंदरास चावलेल्या पिसवा माणसाला चावल्या म्हणजे मनुष्यास प्लेग होतो. या प्रमाणे उंदीर व पिसवा ही साथ पसरवितात. याला इलाज दोनः—

(अ) पहिलाः—उंदीरच घरांत न राहतील अशा तजवीज करणें. ही खटपट गावच्या सर्व लोकांनी केली पाहिजे. एकट्या दुकट्याने करून काय उपयोग ? अलीकडे शहरांतील म्युनिसिपालिट्या या कामीं चांगला प्रयत्न करीत आहेत. उंदीर पकडण्यासाठी त्या लोकांना पिंजरे पुरवितात. उंदीर मरूं लागतांच राहतें घर सोडून मोकळ्या हवेंत दूर झोपडी करून राहणें, हा सर्वांत खात्रीचा उपाय होय. मात्र बाहेर झोपडींत राहण्यास जातांना घरांतील सामान होईल तितकें कमी न्यावें. व तें प्रथम उन्हांत पुष्कळ वेळ ठेवून मग न्यावें. नाही तर घरांतील प्लेगच्या पिसवा बाहेर आपणाबरोबर यावयाच्या !

(ब) दुसरा उपाय म्हणजे प्लेगची लस टोचून घेणें. हा फार उत्तम उपाय आहे. मात्र एकदा टोचून घेतलें म्हणजे फार तर सहा महिने त्या माणसाला प्लेग होण्याचा संभव नसतो. हा उपाय शहरांतील लोकांस जास्त उपयोगी आहे. सरकारने प्लेगची लस मोफत टोचण्याची तजवीज केली आहे. ही लस टोचून घेण्यापासून फक्त एक दिवस थोडा ताप येतो

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

व एक दोन दिवस हात दुखतो. यापेक्षा अधिक कांही होत नाही. खेडेगावांत देखील फिरते डॉक्टर हें काम करूं शकतात.

(३) तिसरा महत्त्वाचा रोग देवी अथवा माता हा होय. याला शीतला असेंहि म्हणतात. हा फारच भयंकर रोग आहे. यांत प्रथम फार जोराचा ताप येतो. तिसऱ्या चौथ्या दिवशीं अंगावर फोड उठूं लागतात व ते फुगून त्यांत एक प्रकारचें पाणी तयार होतें; आणि पुढे या पाण्याची पुवासारखी लस तयार होते. ही वेळ फार भीतीची असते; कारण ही लस चिघळल्यास फार मोठ्या जखमा होतात. हे फोड सर्वांगावर, नाकांत, डोळ्यांत देखील येतात; व रोग्याची शुश्रूषा झाली नाही तर मनुष्य जन्माचा आंधळा, लंगडा, वगैरे होण्याची भीति असते. सुमारे दहाव्या दिवसांपासून फोड वाळण्यास सुरुवात होते; व वीस दिवसांनंतर खपल्या पडूं लागतात.

ही साथ जलद पसरते म्हणून रोग्यास इतरांपासून अगदी वेगळा ठेवावा; व त्याचीं भांडीं, कपडे वगैरे इतरांच्या उपयोगांत येऊं देऊं नयेत. फोडांच्या बाबतींत फारच स्वच्छता ठेवली पाहिजे. नाहीतर तोंडावर देवाचे वण राहणें, जन्माचें आंधळें होणें वगैरेचें भय असतें.

हा रोग आयुष्यांत बहुधा एकदाच व तोहि लहानपणीं होतो. पूर्वी याने हजारों माणसें मरत किंवा जन्माचीं अधू होत. पण डॉ. जेनर या नांवाच्या इंग्रज वैद्याने यावर एक उत्कृष्ट

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

इलाज शोधून काढला आहे. त्याने आता या रोगापासून होणारी मृत्युसंख्या फारच कमी झाला आहे. अगदी लहानपणींच मुलाला देवीची लस टोचली म्हणजे पुढे सहसा त्याला देवी येतच नाहीत. आल्याच तर त्यांपासून फार कमी त्रास होतो. म्हणून देवी काढवून घेण्याच्या बाबतींत सरकार आता सक्ता करतात. तुमच्या गावांत देवी टोचणारा डॉक्टर आला म्हणजे तुम्हीं त्याला सर्व प्रकारची मदत द्या व तुमच्या गावचें एकहि मूल देवी काढल्याशिवाय राहूं देऊं नका. सुमारे चवदाव्या वर्षाच्या सुमारास फिरून एकदा देवी काढविल्या तर देवीची भीति मुळीच राहणार नाही.

प्रश्न

(१) स्मृति चांचणीः—(१) पुढील रोगांची थोडक्यांत माहिती लिहा—पटकी, प्लेग व देवी. (२) कॉलरा रोग होऊं नये म्हणून काय करावें ? (३) प्लेग व देवी यांचा प्रसार होऊं न देण्यासाठी तुम्ही आपल्या गावांत काय कराल ?

(२) कृतिपरः—तुम्ही वर्गांतील मुलांसमोर महामारी, गाठीचा ताप व माता या रोगावर व्याख्यानें द्या.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

धडा ४१ वा

अन्योक्तिसंग्रह

तें श्वान एक तुकड्यास्तव चार नाना
दावी धन्यास जठरार्थ कसें पहाना।
दे आळवून जरि हस्तिप 'बाप भाई'
घे तोंचि घास गजराज; कशी बढाई ॥ १ ॥

वामन

उभा राहे एके चरणिं धरणीतें धरुनियां
तपश्चर्या वाटे करित जणुं डोळे मिटुनियां।
बका ऐशा ढोंगें तव अमित मासेच ठकती
परिज्ञाते तूझें कपट लवलाही उमजती ॥ २ ॥

चिपळूणकर

सिंहाचा छावाही मदमत्त गजासि देखुनी धावे
थोरांची प्रकृतिच ही, कां तेथे वय न योग्यता पावे ॥ ३ ॥

रेंदाळकर

संपेल रात्र, उगवेल अहा ! तमारी
होतां प्रभात कमळें फुलतील सारीं।
संकल्प कोशगत भृंग करा मनाशीं
एम्हास तों उपडुनी गजराज नाशी ॥ ४ ॥

रेंदाळकर

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

शशमंडळांत कोल्हा म्हणतो 'मी सिंह' वल्गना करितो;
जोंवरि न पाहिला गजमुक्ताफळ कवळभक्षिता हरि तो ॥ ५ ॥

मोरोपंत

प्रश्न

(१) स्मृति चांचणी—(१) बगळा साधू कसा असता ? (२) थोराची प्रकृति कशी असते ? (३) कुत्रा व हत्ती यांच्या स्वभावाची तुलना करा. (४) अन्योक्ति म्हणजे काय ?

(२) मुखपाठ म्हणा:—(१) संपेल रात्र, उगवेल.....
(२) परिज्ञाते तूझें कपट.....

धडा ४२ वा

वाघाची शिकार

(पुढील मजकूर सरदार बाबासाहेब घोरपडे यांच्या रोजनिशींतून घेतला आहे.)

मुक्काम आमगाव,
ता० ३—५—२२

आमगावच्या डाक बंगल्याच्या समोरच एका तंबूंत आमचा मुक्काम होता. दुपारचें जेवण आटोपून आराम करीत

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पडलों होतों. इतक्यांत माझा नोकर येऊन म्हणाला, "हुजूर, बाहेर दोन माणसें आलीं आहेत व तीं हुजूरची गाठ घेऊं इच्छीतात."

मी म्हटलें, "जा, पाठव त्यांना मजकडे." हीं माणसें ओळखीचींच निघालीं. शेजारच्या गावचे ते मुकादम होते. ते म्हणाले, "आमच्या गावच्या आसपास एका वाघाने फार उपद्रव केला आहे. आतापर्यंत त्याने तीन माणसें मारलीं. आपण मेहेरबानी करून त्याची. शिकार कराल तर आमच्या गावावर मोठे उपकार होतील."

मी त्यांना चटकन् आश्वासन दिलें. माझ्या नोकराने झटपट तासाभराच्या आंत सर्व सामग्री तयार केली व मी हत्तीवर स्वार होऊन निघालों. बरोबर माहुताखेरीज आणखी दोन माणसें घेतलीं.

मुकादमाने सांगितलेल्या गावानजीक आम्ही पोचतों तों तेथे आम्हांस माणसांचा एक थवाच भेटला. पांच सहा माणसें आम्हांला पाहतांच धावत पुढे आलीं व त्यांनी सांगितलें की, वाघाने आणखी एक मुलगा पळविला ! तो गुरें राखण्यास म्हणून जो गेला तो परत आलाच नाही. गुरें तशींच धावत गावाकडे परत आलीं; त्यांपैकी कांहींना वाघाने जखमी केलेंच होतें.

एकूण हा वाघ म्हणजे लहानसहान प्रकरण नव्हे व याची शिकार संभाळूनच केली पाहिजे, असें दिसून आलें. वाघाला एकदा माणसाची चटक लागली, म्हणजे तो बहुधा मनुष्य-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वस्तीपासून फारसा दूर जात नाही. जमलेल्या लोकांनी जवळच एक दाट गर्द झाडी दाखविली व त्याच बाजूने त्यांचीं जनावरें गावाकडे दौडत आलीं, असेंहि त्यांनी सांगितलें. यावरून वाघ बहुधा तेथेच कोठे तरी असावा, असा अंदाज मीं बांधला. आता वेळ न घालवितां त्याचा शिकार करणेंच इष्ट आहे असें मीं ठरविलें.

ज्या माणसाचा मुलगा नाहीसा झाला होता तो स्वतः चांगल्यापैकी शिकारी होता. त्याने मजबरोबर येण्याचें आपण होऊन कबूल केलें व आम्ही त्या दाट झाडीकडे जाऊं लागलों. जातां जातां माझी रायफल बंदूक तर ठीक आहे ना. हें मी पाहिलें. या बंदूकीने एकामागून एक पांच वार उडवितां येत असत.

गुरें जेथन बाहेर पडलीं होतीं त्याच झाडींत माहुताने हत्ती घातला. रान दाट असल्यामुळे समोरचा रस्ता दिसणें मुष्किलीचें झालें होतें. जमीन मऊ दलदलीची होती व धावत गेलेल्या जनावरांचे खूर तीवर उमटले होते. खुरांच्या मागामागाने आम्हीं रस्ता चालत होतों.

थोड्याच वेळांत आमच्या हत्तीने बुजल्यासारखें करून 'चीं चीं' असें ओरडण्यास सुरवात केली. त्याला वाघाचा वास आला असला पाहिजे. आमच्याभोवतीं गवत व देवनळाचें दाट रान असल्यामुळे आम्हांला कांहीच दिसत नव्हतें. हत्ती वरून आम्हीं आलों होतों, म्हणूनच आमचा निभाव लागला.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

थोडें अंतर असेंच चालून गेल्यानंतर आम्हांला एक मैदान लागलें व तेथे एक भयंकर देखावा दिसला. एका बाजूला एक मेलेला बैल, एका बाजूला एक मुलगा (हाच नाहींसा झालेला मुलगा) व मध्ये वाघोबाची स्वारी प्रशस्तपणें बसलेली ! वाघ फार दांडगा होता. एवढा वाघ आजपर्यंत माझ्या पाहण्यांत आला नव्हता. तो शांतपणें बसला होता; त्याची कोणतीच हालचाल या वेळीं दिसून येत नव्हती.

मीं आपली बंदूक दोन वेळां वर उचलली व पुनः खाली ठेवली. वाघावर गोळी झाडण्याचें धैर्य मला होईच ना. कारण मुलगा बरोबर वाघाच्या बाजूस होता. त्याला गोळी लागली तर ? अशी भीति वाटे, मुलगा अगदी निपचित मेल्यासारखाच पडला होता. पण न जाणों कदाचित् जिवंत असला, तर विनाकारण त्याला मारण्याचें पाप आपल्या माथीं यावयाचें !

"हुजूर, जरा थांबा, तो पहा वाघ उठण्याचा बेतांत आहे," माझा माहूत म्हणाला ; "हं ! घ्या बंदूक व धरा नेम."

माहुताच्या तोंडून हीं अक्षरें निघतात न निघतात; तों वाघाने ताडकन् उडी मारली व तो बाजूच्या जंगलांत शिरला. जातांना तो आडवा झाल्याने मला नेम मारणें अगदी सुलभ झालें. मीं एक दोन-तीन गोळ्या झाडल्या. त्या सर्व त्याला लागल्या. पण धावत्या जनावरावर नेम मारतांना त्याच्या मर्मस्थलीं गोळी मारणें अशक्य होतें, तथापि तीन गोळ्यांत

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आपलें काम होईल असें मला वाटलें होतें. माझा हा अंदाज मात्र चुकला. तिसरी गोळी लागताच वाघ थबकला. त्याने दुःख व संतापदर्शक एक भयंकर गर्जना केली; व क्षणार्धांत मागे वळून आमच्यावर हल्ला करण्यासाठी उडी मारली !



"आला-आला" असें माहूत म्हणत आहे, तों तो अगदी

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

जवळ आला. मीं आणखी एक गोळी झाडली; पण नेम चुकला, आता माझ्या बंदुकींत एकच गोळी शिल्लक राहिली होती. पुन्हा बंदूक भरण्यास वेळ नव्हता. म्हणून एकदम गोळी न झाडतां वाघ अगदी नजीक येईतों पर्यंत वाट पाहावी, असें मीं ठरविलें.

सुमारे पंचवीस फूट लांबीची एकच उडी मारून वाघाने आम्हांस गाठलें. एकदम माहुतावरच झडप घालावयाची, असा त्याचा बेत होता. पण सुदैवाने उडा जरा चुकून ती हत्तीच्या गंडस्थलावरच पडली. हत्तीहि कसलेला शिकारी हत्ती होता. त्याने एकदम आपल्या सोंडेचा विळखा वाघाच्या अंगाभोवतीं घातला व त्याला एक मिनिटभर घट्ट आवळून धरलें; एवढें मिनिटच मला पाहिजे होतें. मीं नेमका वाघाच्या डोक्यावर नेम धरला व गोळी झाडली. ती बरोबर त्याच्या मस्तकांत घुसली. लगेच त्याची पकड सैल पडून तो धाडकन् जमिनीवर कोसळला व क्षणार्धांत गतप्राण झाला !

मुलाचा बाप तत्काळ खाली उतरला. अहाहा ! त्याचा आनंद गगनांत मावेना ! त्याचा मुलगा जिवंत होता. त्याला भयंकर जखमा झाल्या होत्या व रक्तस्रावाने त्याला फार अशक्तता आली होती. पण तो जिवंत होता. पुढे तो बराहि झाला !

आम्हीं तें वाघाचें धूड हत्तीवर लादून गावांत आणलें. तेव्हा लोकांचा आनंद काय विचारावा ? लोकांनी आमचे मनापासून आभार मानले हें सांगावयास नकोच !

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

प्रश्न

(१) स्मृति चांचणी—(१) वाघाची शिकार कशी करावी लागते ? (२) सरदारसाहेबांनी वाघाची शिकार कशी केली ?

(२) कारणें सांगा:—(१) हा वाघ म्हणजे लहान सहान प्रकरण नव्हे. कारण.....

(२) लोकांनी सरदारसाहेबांचे आभार मानले. कारण.....

धडा ४३ वा

घोषयात्रा

कौरव व पांडव हे द्यूत खेळले व त्यांत पांडव हरले. द्यूतांतील कराराप्रमाणे युधिष्ठिर आपले चार बंधु व पत्नी द्रौपदी यांजसह अरण्यांत दिवस काढूं लागला.

पण दुष्ट कौरवांचें एवढ्याने समाधान झालें नाही. अरण्यांत त्यांच्या कशा हालअपेष्टा होत असतील; त्या पाहाव्या व आपण भोगीत असलेलें राज्यवैभव दाखवून त्यांना हिणवावें, असा त्यांनी बेत केला. आणि त्या भागांत असलेले

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

घोष-म्हणजे गाई बैलांचे खिल्लारखाने--यांची देखरेख करण्याचें निमित्त करून त्यांनी पांडव राहत होते त्या द्वैतवनांत प्रवेश केला.

वाटेंत त्यांना एक तलाव लागला. तेथे चित्ररथ गंधर्व आपल्या स्त्रियांसह स्नान करण्यास आला होता. त्यामुळे चित्ररथाच्या शिपायांनी कौरवांना त्या वाटेने जाण्याची मनाई केली. कौरवांना आपल्या शक्तीची घमेंड होतीच. ते मनाईचा हुकूम मानीनात; तेव्हा लढाई जुंपली. लढाईंत कौरवांचा सपशेल पराजय झाला व चित्ररथाच्या सैन्याने त्यांना कैद करून आपल्या बरोबर चालविलें.

पांडव येथे जवळच राहतात. हें कौरवांच्या सेवकांना माहीत होतें. त्यांनी धावत जाऊन पांडवांना ही बातमी कळविली. भीम म्हणाला, "ठीक ! औषधावांचून खोकला गेला. आमच्यापुढे तोरा मिरवायला आले होते नव्हे का ! भोगा म्हणावें आपल्या कर्माचीं फळें !"

भीमाचें हें भाषण युधिष्ठिरास रुचलें नाही. तो म्हणाला, "बाबा भीमा, असें बोलूं नये. अरे, कांही झालें तरी ते आपले भाऊ आहेत ना ? त्याची कोणीं मानखंडणा केली तर त्यांत आपल्याला कांही मोठेपणा येईल का ? परक्या शत्रूंनी आपल्या भाऊबंदांना कैद करावें; हें मला बरें वाटत नाही. त्यांचें आपलें भाऊबंदकीचें भांडण असेल व तें भांडतांना ते शंभर कौरव एकीकडे व आपण पांच पांडव एकीकडे, असें होईल; पण परक्या शत्रूशीं प्रसंग पडला असतां ते शंभर व

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आपण पांच मिळून आम्ही एकशेंपांच झालों पाहिजे. अर्जुना, भीमा सर्वजण एकदम उठा व कौरवांची सुटका करा."

युधिष्ठिराची आज्ञा बंधूंनी मान्य केली. त्यांनी गंधर्वांवर निकराचा हल्ला करून कौरवांना सोडविलें व धर्मराजापुढे आणून उभें केलें.

या वेळीं दुर्योधनादिकांचे चेहरे पाहण्यासारखे होते. ज्यांची फजिती करण्यास आपण निघालों त्यांच्याच कृपेने या वेळीं आपली सुटका झाली, हें पाहून दुर्योधनाला मरणप्राय दुःख झालें. पण युधिष्ठिर म्हणाला, "बाबा सुयोधना, तुला वाईट वाटण्याचें कांही कारण नाही. तूं आता स्वस्थ चित्ताने घरीं जा !"

केवढी ही युधिष्ठिराची उदार बुद्धि ! त्याला धर्मराज असें नांव पडलें, तें अगदी बरोबर आहे.

प्रश्न

(१) रिकाम्या जागीं योग्य शब्द लिहा.

(१) कौरवांना आपल्या शक्तीची.....होती.

(२) दुर्योधनादिकांचे.....पाहण्यासारखे होते.

(आशा, रथ, घोडे, घमेंड, चेहरे)

(२) स्मृति चांचणीः—(१) युधिष्ठिराचा व भीमाचा स्वभाव वर्णन करा. (२) कौरवांची फजिती कशी झाली ? (३) भाऊबंदकीचा परिणाम कोणता होतो ?

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

धडा ४४ वा

दळण-वळणाचीं साधनें

रामराव एकदा मुलांसह उमरावतीच्या बाजारांत गेले. त्यांनी मुख्य मुख्य पेठा व त्यांतील ठळक ठळक दुकानें मुलांना दाखविलीं. तऱ्हेतऱ्हेचा माल पाहून मुलांना मौज तर वाटलीच, पण हा सर्व माल येतो कोठून, असा त्यांनी प्रश्न केला.

रामराव म्हणाले, "फार दूरदूरच्या देशांतून. सर्वच माल कांही आपल्या देशांत होत नाही; व सर्व तऱ्हेचा माल प्रत्येक देशांत बनणें शक्यहि नाही. म्हणून व्यापारी लोकांना माल वेगवेगळ्या देशांहून आणावा लागतो. ह्या पहा काड्याच्या पेट्या; ह्या बहुधा स्वीडन-नार्वे अगर जपान या देशांतून येतात. बरीचशी साखर जावा अथवा मारिशस या बेटांतून येते. तलम सुती व लोकरीचें कापड बहुधा इंग्लंड देशांतून येतें. उत्तम रेशमी कपडा चीन देशांतून येतो. मातीचें तेल, बहुधा ब्रह्मदेश, रशिया, अगर अमेरिकेंतून येतें. असे किती जिन्नस सांगूं ? हीं ठिकाणें आपल्यापासून हजारों मैल दूर आहेत.

यमूः—इतक्या लांबचा माल आपल्या येथे आणतात तरी कसा बाई ?

रामरावः—आता पूर्वीपेक्षा प्रवासाचीं व मालाची नेआण करण्याचीं साधनें पुष्कळ वाढलीं आहेत.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अगदी अडाणी माणसांना केवळ पायीं चालण्याखेरीज अगर वस्तु आपल्याच अंगावर वाहून नेण्याखेरीज दुसरा मार्ग नसे. पण थोड्या सुधारलेल्या लोकांना घोडा बैल वगैरे पशु माणसाळवून त्यांचा उपयोग स्वारीच्या किंवा वाहतुकीच्या कामीं करण्याची सुरवात केली.

अगदी अलीकडच्या काळापर्यंत सर्व प्रवास व मालाची नेआण बैलगाडीने अगर बैल, घोडीं, गाढवें, उंट यांवर मालाच्या गोण्या लादून होत असे. अद्यापहि खेड्यांतील माल शहरांत असाच येतो. पण अशाने किती वाट चालणार व किती माल नेणार ? ओझ्याचीं जनावरें फार तर ताशीं तीन चार मैल चालणार. पण तीच अगदी सावकाश चालणारी आगगाडी देखील ताशीं पंधरा वीस मैल चालते; व साठसाठ,



आगगाडी

शंभरशंभर उतारू बसतील असे वीस पंचवीस डबे ओढून नेते. एक मालगाडी आली की, हजारों खंडी माल स्टेशनावरील गोदामांत उतरतो !

आता हिंदुस्थानच्या एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत तीन चार दिवसांत जातां येतें. पण माझ्या आजोबांनी

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

काशीयात्रा केली, त्या वेळीं त्यांना परत येण्यास दीड वर्ष लागलें होतें. आता असें कांही दिसतें का? काशी, प्रयाग, गया वगैरे प्रमुख तीर्थस्थानें स्वस्थपणें पाहून माणूस महिन्याच्या आंत घरीं परत येतो. हें सर्व आगगाडीमुळेच ना!

जमिनीवर जी गोष्ट आगगाडीनें केली, तीच समुद्रावर आगबोटींनी केली आहे. आगबोटी नव्हत्या तेव्हा शिडें बांधलेल्या जहाजांतून प्रवास व मालाची नेआण होत असे. पण ती फार सावकाश होत असे; शिवाय ती फार अनिश्चित असे. वारा अनुकूल असेल, तर हीं जहाजें चालावयाचीं, वारा बंद झाला किंवा उलट्या दिशेनें वाहूं लागला की, कित्येक दिवस जहाजांना एका ठिकाणीं पडून राहावें लागे, आगबोटीचें तसें कांही नाही कशीहि हवा असो, आगबोट सपाट्यानें मार्गक्रमण करीतच असते व बहुधा नेमक्या वेळीं ती बंदरांत येऊन हजर होते!



आगगाड्या व आगबोटी यांना बिनधोक पणें फिरतां येण्यास आणखीहि कांही गोष्टींचा उपयोग झाला आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

होकायंत्र नसेल तर समुद्रावर दिशामूल होऊन कोणीकडे जावें हेंच कित्येकदा समजणार नाही. समुद्रांत अनेक ठिकाणीं असलेले खडक फार भयंकर असतात. म्हणून दूर पर्यंत प्रकाश पाडून दीपस्तंभ जहाजांना धोक्याची सूचना देतात.

पण या दोहींपेक्षाहि तारायंत्राचा उपयोग फार मोठा आहे. दूरची बातमी जलद पोचवून व्यापार, दळणवळण यांच्या बाबतींत तारायंत्राचा कसा उपयोग होतो हें आपण पूर्वी (तिसऱ्या पुस्तकांत) पाहिलेंच आहे. पण आगगाडीच्या प्रवासाला तर तारायंत्राचा उपयोग अतिशयच होतो. किंबहुना तारायंत्रें नसतीं तर आगगाडीचा उपयोग हल्लीसारखा धडाक्याने झालाच नसता. गाडी सुटण्यापूर्वी पुढील स्टेशनावरून तारेने अशी खबर यावी लागते की, पुढील रस्ता मोकळा आहे; अशी खबर नसेल तर दोहोंकडून धावत येणाऱ्या गाड्यांची टक्कर होऊन गाड्यांचा व आंतील उतारूंचा चक्काचूर होऊन जाईल ! अर्थात् तारायंत्र म्हणजे आगगाडीचा डोळाच होय.

आजकाल तारांच्या मदतीवांचून बातमी एका ठिकाणाहून दुसरीकडे पाठविण्याची युक्ति निघाली आहे. त्यामुळे समुद्रावरील प्रवास पूर्वीहून फारच कमी धोक्याचा झाला आहे. एका जहाजावर जर कांही आकस्मिक संकट आलें तर त्याची खबर आसपासच्या सर्व जहाजांना देतां येते. त्यामुळे लवकर मदत मिळून बहुधा त्या जहाजावरील लोकांचा बचाव होतो.

याशिवाय महत्त्वाचीं साधनें म्हणजे पक्कया सडका,

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

नदीनाल्यांवरील पूल, डोंगरी घाटांतील बोगदे वगैरे होत. पक्क्या सडका नसत्या तर मोटारींचा उपयोग फारसा झाला नसता. आजकालहि एखाद्या आडवळणीं असलेल्या खेड्याचा प्रवास पावसाळ्यांत करून पाहावा, म्हणजे पक्क्या सडकांची किंमत कळून येईल. पूर्वीच्या काळीं पावसाळ्यांत बहुधा प्रवास बंदच पडे. आता तर होण्याचें कारण नाही. आपल्या देशांतील बहुतेक ठळ ठिकाणें आता पक्क्या सडकांनी एकमेकांस जोडलीं गेलीं आहेत. अर्थात् दळणवळण व व्यापार यांची वाढ होणें साहजिक नाही काय ?



प्रश्न

(१) उपयोग सांगा—होकायंत्र, दीपस्तंभ, तारायंत्र.

(२) स्मृति चांचणी—(१) दळणवळणाचीं साधनें कोणतीं ?

(२) तारायंत्र आगगाडीचा डोळा आहे, हें कसें ?

(३) पूर्वीच्या व हल्लीच्या समुद्रप्रवासांत कोणता फरक आहे ?

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

धडा ४५ वा

सृष्टि-ज्ञान व यंत्रांचा उपयोग

रामरावः—व्यापार व दळणवळण यांचीं साधनें अलीकडे कशीं वाढलीं आहेत हें आपण आतापर्यंत पाहिलें. "पण हीं साधनें कशाने वाढलीं ?" असा तुम्ही साहजिकच प्रश्न कराल. त्याचें उत्तर असें आहे की, हीं साधनें सृष्टिज्ञानाच्या वाढीमुळे माणसाला प्राप्त झालीं. या ज्ञानाचा उपयोग करून माणसाने अनेक यंत्रें बनविलीं व त्यांच्या साहाय्याने आगगाड्या, आगबोटी यांसारखीं प्रवासाचीं साधनेंच काय, पण कापडाच्या गिरण्या, मोठमोठे लोखंडी सामानाचे कारखाने वगैरे काढून मालाची-म्हणजे माणसाला उपयोगी पडणाऱ्या सर्व तऱ्हेच्या पदार्थांची-पैदासहि फार मोठ्या प्रमाणावर सुरू केली. हें कसें तें आता आपण पाहूं. पण अगोदर यंत्र म्हणजे काय हें तुम्हांला सांगितलें पाहिजे. तुमच्या पाहण्यांत कोणकोणतीं यंत्रें आहेत सांगा पाहूं ?

यमूः—शिवण्याचें यंत्र, पिठाची चक्की, कापडाच्या गिरणींतील यंत्रें वगैरे.

रामरावः—पण यंत्र म्हणजे गुंतागुंतीचें, ज्यांत अनेक चक्रें आहेत; व चामड्याच्या पट्ट्यांनी, नाही तर साखळीने

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

तीं एकमेकांस जोडलीं आहेत असें कांही तरी असतें, अशी तुमची समजूत दिसते. पण हें चूक आहे. जड धोंडा उचलून पलीकडे सारण्यास उपयोगांत आणलेली तरफ, विहिरींतून पाणी ओढण्यास लावलेला रहाट, लाकूड काढण्यास लागणारी करवत हीं सर्व यंत्रेंच होत. यंत्रानें माणसांचे श्रम कमी होतात व थोड्या वेळांत सफाईदार व अधिक काम होतें.

उदाहरणार्थ, कापड विणण्याची कलाच घेऊं. लोकर किंवा



कापूस यांचें वस्त्र बनविण्यास प्रथम त्यांचें सूत काढलें पाहिजे. अगदी प्रथम हातांनी वळूनच सूत काढावें लागे; व जशी चटई विणतात तसे ह्या सुताचे धागे हातानेच एकमेकांत गुंतवून कपडा विणावा लागे. मग तकली अथवा चाती, नंतर चरखा यांचा शोध लागला; आणि सूत पूर्वीपेक्षा जलद व सफाईदार निघूं लागलें. हातमागावर कपडा विणतां आल्यावर कपड्यांत किती सुधारणा झाली असेल बरें ! आणि आता तर या सर्व यंत्रांपेक्षा वाफेने चालणाऱ्या चात्या व माग

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

जेथे आहेत अशा अलीकडील गिरण्यांतून हजारोंपट अधिक माल उत्पन्न होत असतो. नागपूरच्या एम्प्रेस मिलमधील सुंदर व तलम कपडा किती जलद निघतो व किती स्वस्त देतां येतो, हें पाहिलें म्हणजे यंत्रांचा उपयोग व्यवहारांत किती होतो हें तुमच्या ध्यानांत येईल.



(हातमाग)

वसंतः—पण माणसांना ह्या युक्तचा सुचल्या तरी कशा ?

रामरावः—हें पाहा, 'गरज ही युक्तीची आई आहे,' अशी म्हण आहे, हिचा अर्थ असा की, माणसाला गरज पडली

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

म्हणजे ती भागविण्याची त्याला अक्कल सुचते ! जशा माणसाच्या गरजा वाढत गेल्या तशीं त्या पुरविण्याचीं साधनेंहि त्याला शोधून काढावीं लागलीं. पण युक्ति तरी सर्वांनाच सुचते असें नाही. जे आपल्या ज्ञानेंद्रियांचाविशेषतः डोळ्यांचा उपयोग काळजीपूर्वक करतात, त्यांनाच या युक्त्या सुचतात. हवा, पाणी, वाफ, विद्युत् या सर्व सृष्टीच्या विनमोल देणग्या आहेत. त्यांमध्ये विलक्षण शक्ति साठविलेली आहे. त्यांचे व्यापार-कामें-सदोदित चालूच असतात. हवा कधी संथ



(ट्रॅमगाडी)

असते, तर कधी जोराने वाहते; पाणी कधी थंड, कधी उष्ण, कधी गोठून बर्फ झालेलें, तर कधी उष्णतेने वाष्परूप बनलेलें असतें. वीज कधी नुसती लकलक करते, तर कधी कडकडाट करून वस्तूंचा नाश करते. हे सर्व व्यापार जो काळजीपूर्वक पाहतो, त्यास त्यांचा उपयोग आपल्या कामीं कसा करून घ्यावा हें समजूं लागतें. चहादाणीवरचें झाकड़ थडथड

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

उडतांना पाहून जेम्स वॅट याला वाफेच्या शक्तीचा उपयोग करण्याची कल्पना सुचली व वाफेचें एंजिन निघालें. मध्ये जाड असलेल्या काचेंतून पदार्थ मोठे दिसतात हें कळल्यामुळेंच पुढे चश्मे, दुर्बिणी, सूक्ष्मदर्शक यंत्रें वगैरे बनविणें शक्य झालें. विद्युत्शक्तीचा शोध लावल्याने तर जगांत अद्भुत चमत्कार



(विमान एरोप्लन)

करून दाखवितां आले आहेत. तारायंत्रें, विजेचे दिवे, विजेने चालणाऱ्या ट्रॅमगाड्या, आगगाड्या व मोठेमोठे कारखाने यांनी गेल्या पांच पन्नास वर्षांत जगाचें स्वरूप पालटून टाकलें आहे. यंत्रांच्या साहाय्याने माणसांना पक्ष्यांसारखें उडतां देखील येऊं लागलें आहे. आता डाक विलायतेहून हिंदुस्थानास विमानांतून येऊं लागली आहे.

सारांश, पृथ्वी, पाणी, अग्नि, हवा व वीज यांना माणसाने आपले दास बनविलें आहे. तुम्हीं पुराणांतील गोष्ट

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri



पवनें चक्की

ऐकिली आहे ना. की रावणाच्या घरीं वरुणदेव पाणी भरीत असे, वायु केर काढीत असे व चंद्रसूर्य प्रकाश पाडीत असत. या गोष्टी आता प्रत्यक्ष खऱ्या झाल्या आहेत. वायु आपल्या पवनचक्क्या चालवितो; अग्नि वाफ बनवितो. वरुण तर बिचारा वाफेच्या रूपाने आपल्यासाठी काय करीत नाही ? आकाशांत चमकणाऱ्या विजलीला माणसाने कामाला जुंपलीच आहे. एवढा प्रखर सूर्यनारायण, पण त्याला माणसाचे फोटो काढावे लागत आहेत !

हा सगळा कशाचा परिणाम ? हा शास्त्रीय ज्ञानाचा !

प्रश्न

(१) स्मृति चांचणीः—(१) यंत्र म्हणजे काय ? (२) अडकित्ता, रहाट हीं यंत्रें कशीं ? सिद्ध करा. (३) मनुष्याने पृथ्वी, पाणी, अग्नि, हवा व वीज यांना आपले दास कसे बनविले ?

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

(२) स्पष्टिकरण करा—(१) गरज ही युक्तीची आई आहे. (२) सृष्टीचे व्यापार जो काळजीपूर्वक पाहतो त्यास त्यांचा उपयोग कसा करून घ्यावा हें समजूं लागतें.

धडा ४६ वा

बालभक्त प्रह्लाद

भाग १ ला

पूर्वी देव व दैत्य यांचीं सारखीं युद्धें चालत. दैत्य हे स्वभावाने क्रूर, जुलमी व दुष्ट असत; पण शरिराने दांडगे व युद्धांत कुशल असल्यामुळे पुष्कळ वेळां ते युद्धांत देवांचा पराजय करीत व त्यांचा राजा जो इंद्र त्याचें पद हिरावून घेत. हिरण्यकशिपु हा असाच एक पराक्रमी दैत्य होता. तो शूर तर होताच पण बुद्धिमान् व धोरणीहि असून त्याचा निश्चय फार दांडगा होता. त्याने अत्यंत घोर तपश्चर्या करून भगवान् ब्रह्मदेवांस प्रसन्न करून घेतलें. ब्रह्मदेवांनी "वर माग" असें म्हणतांच हिरण्यकशिपु म्हणाला, "भगवन्, आपण उत्पन्न केलेल्या कोणत्याहि प्राण्याकडून मला मृत्यु नसावा; तसेंच दिवसा किंवा रात्रीं, आंत अथवा बाहेर, पृथ्वीवर

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

किंवा आकाशांत कोठेच मला मरण येऊं नये." ही प्रार्थना ऐकून ब्रह्मदेव म्हणाले, "दैत्यराज, मागितलेले वर खरोखर देणें कठीण आहे. पण तुझ्या भक्तीकडे पाहून हेहि मी तुला देत आहें."

याप्रमाणे वर मिळतांच हिरण्यकशिपूला अस्मान ठेंगणें झालेंसें वाटूं लागलें. आता आपणास कोणतेंच भय नाही असें वाटून त्याने देवांचा वैरभाव धरण्यास सुरवात केली. त्याने त्रैलोक्य जिंकून देव, ऋषि, मानव, यक्ष वगैरे झाडून सर्वांना आपल्या सत्तेखालीं आणलें इंद्राचा हकालपट्टी करून त्याच्या सुंदर नंदनवनाचा उपभोग घेण्यास सुरवात केली. शिवाय त्याने सर्व त्रैलोक्यास छळण्यास आरंभ केला. सर्व जग जणूं कांहीं आपल्याच ऐषआरामासाठी निर्माण केलें होतें, अशा भावनेने तो राज्य करी. लोक, देव, ऋषि, सर्व त्याच्या नांवाने चरफडत, पण या दैत्याचें त्यांच्या हातून काय होणार ? अशीं अनेक वर्षें लोटलीं.

या उन्मत्त दैत्यापासून आपली मुक्तता फक्त भगवान् विष्णुच करूं शकतील असें वाटून अखेरीस देव, ऋषि व सर्व लोक त्यांना शरण गेले. तेव्हा ते म्हणाले, "देव हो, भिऊं नका. सज्जनांचा छळ करणाऱ्यांचा शेवटी नाश होणारच. तो आपला मुलगा प्रह्लाद याचा जेव्हा छळ करूं लागेल, तेव्हा त्याचें मरण ओढवलेंच असें तुम्हा समजा."

हिरण्यकशिपु ज्या वेळीं तप करण्यास दूर पर्वताच्या गुहेंत जाऊन बसला होता, त्या वेळीं त्याची पत्नी 'कयाधू ही

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

गर्भवती होती व ती नारदमुनींच्या आश्रमांत राहिली होती. तेथे असतांनाच ती प्रसूत झाली व भक्तश्रेष्ठ प्रह्लादाचा जन्म झाला. प्रह्लादाचे बाळपण नारदांच्या सहवासांत गेल्यामुळे दैत्य कुलांतील दुष्ट गुणांऐवजीं प्रह्लादांत दया, क्षमा, शांति वगैरे सद्गुण च येऊं लागले. त्याचे लहानपणचे खेळसुद्धा ईश्वरभक्तीचे असत.

पुढे हिरण्यकशिपु परत आला. तेव्हा साहजिकच त्याला आपल्या पुत्रानेहि आपल्याप्रमाणेच पराक्रमी, साहसी व देवांचा शत्रु बनावें असें वाटे, म्हणून त्याने प्रह्लादास दैत्यगुरूच्या स्वाधीन करून त्यास सब शस्त्रास्त्रविद्या शिकविण्याविषयीं हुकूम केला. गुरुजींनी तसें करण्याचा यत्न केला, पण व्यर्थ. प्रह्लादाचें तिकडे लक्षच लागेना. तो असें च म्हणत असे. "श्रीहरि ! श्रीहरि!" गुरुजींनी रागें भरून पाहिलें, शिक्षा देऊन पाहिली, तरी कांही उपयोग होईना. तेव्हा त्यांनी ही हकीकत हिरण्यकशिपूस सांगितली.

प्रश्न

(१) समानार्थी शब्द देऊन त्यांचा वाक्यांत उपयोग करा:—साहसी, क्षमा, घोर, हकालपट्टी, उन्मत्त, अस्मान ठेंगणें होणें.

(२) स्मृति चांचणी:—(१) हिरण्यकशिपूची गोष्ट लिहा.
(२) हिरण्यकशिपूने कोणता वर मिळविला ?
(३) प्रह्लादाचें लक्ष शिकण्याकडे कां लागत नसे ?

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

धडा ४७ वा

बालभक्त प्रह्लाद

भाग २ रा

ही हकीकत ऐकून हिरण्यकशिपु म्हणाला, "बाळ, तूं आतापर्यंत काय काय विद्या शिकलास, त्याची मी आज परीक्षा घेणार आहें. तर म्हणून दाखव पाहूं तूं काय शिकलास तें !", प्रह्लाद म्हणाला, "हे तात, भगवान् विष्णूचें स्मरण, कीर्तन व मनन हेंच माझें अध्ययन, बाकी सर्व मी व्यर्थ समजतों !" हे शब्द ऐकतांच हिरण्यकशिपु क्रोधाने लाल झाला. तो म्हणाला, "मूर्खा, कोणी शिकविली ही कुबुद्धि तुला ? त्या कपटी विष्णूची, आमच्या प्रत्यक्ष शत्रूची, तूं भक्ति करतोस ! अरे कुलांगार कारट्या ! बऱ्या बोलाने तूं हा मार्ग सोड, नाही तर माझ्याशीं गाठ आहे. पुत्र म्हणून मी तुझी क्षणमात्रहि गय करणार नाही." प्रह्लादाने शांतपणें उत्तर दिलें, "पिताजी, आपणास योग्य वाटेल तें शासन मला देण्यास आपण समर्थच आहां. पण मला जो मार्ग सत्य व हितकर वाटतो त्याप्रमाणे मला वागलेंच पाहिजे !"

या शांत उत्तराने दैत्यराजाचा संताप अधिकच भडकला, तो म्हणाला; "अरे नीचा, माजलास तूं ! ठीक आहे पाहतोंच तर आता तुझी मजा ! कोण आहे रे तिकडे ? शिपाई, या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कारट्याला तिकडे नेऊन याला शंभर फटके मारा. याने विष्णूचें नांव सोडन दिलें तरच याला सोडा."

शिपायांनी फटके मारले. प्रह्लादाच्या अंगांतून रक्ताच्या धारा लागल्या. तरी त्याची शांति ढळली नाही. तो तोंडाने नारायण, श्रीहरि, असें म्हणतच होता.

शिपायांनी ही खबर सांगितली, तेव्हा हिरण्यकशिपु संतापाने वेडा झाला. तो म्हणाला, "दैत्य हो, ज्या अधमाने वराहाचें रूप घेऊन प्रत्यक्ष माझा भाऊ हिरण्याक्ष मारला त्याची हा कारटा भक्ति करतो; त्याअर्थी हा माझा पुत्र नसून शत्रु होय. काय वाटेल तें करून याचा नाश करण्याची मी तुम्हांस हुकूम देतों! आताच्या आता या कारट्याला जगांतून नाहीसा करा!" हिरण्यकशिपूने प्रह्लादाच्या वधाचे भयंकर उपाय चालविले. मत्त हत्तीकडून त्याला तुडविलें; भयंकर कड्यावरून खाली ढकललें; विष पाजलें; उकळत्या तेलाच्या कढईत फेकलें! पण "जय श्रीहरि" असें म्हणून प्रह्लाद या सर्व दिव्यांतून यत्किंचित् इजा न होतां सुरक्षित राहिला. 'देव तारी त्याला कोण मारी?'

आता मात्र काय करावें हें हिरण्यकशिपूस समजेना: अधिकच चिडून जाऊन त्याने प्रह्लादास विचारलें. "कारट्या रात्रंदिवस 'नारायण, श्रीहरि' असा घोष करतास! कोठे आहे रे तो तुझा नारायण! दाखव मला!"

प्रह्लाद:—महाराज, भगवान सर्वत्र भरला आहे, जळीं, स्थळीं, काष्ठीं, पाषाणीं सर्वत्र त्याची वस्ती आहे!

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

हिरण्यकशिपुः—असें काय ? मग तो समोरच्या खांबांतहि असेलच !

प्रह्लादः—होय महाराज !

हिरण्यकशिपुः—बरें आहें. पाहतों तर !

असें म्हणून हिरण्यकशिपूने ताडकन खांबावर लाथ मारली ! त्यासरशीं विजेप्रमाणे कडकडाट झाला व लखकन प्रकाश पडला. खांब दुभंग झाला व त्यांतून भगवंताची मूर्ति नारसिंहाच्या रूपाने बाहेर पडली. नारसिंहाने एका क्षणाचाहि विलंब न लावतां नखांनी हिरण्यकशिपूचें पोट फाडून



CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

त्याचा वध केला. हाच नारसिंह अवतार होय. ब्रह्मदेवाच्या वराने अजिंक्य झालेल्या हिरण्यकशिपूच्या नाशासाठी देवाने हा अर्धवट सिंह व अर्धवट मनुष्य असा अवतार घेऊन, धड रात्र नाही धड दिवस नाही, अशा वेळीं त्याचा वध केला; व देवांना व मनुष्यांना एक भयंकर आपत्तींतून मुक्त केलें.

भक्तराज प्रह्लाद याची दैत्यांच्या सिंहासनावर स्थापना करून भगवान स्वस्थानीं निघून गेले.

मुलांनो, या गोष्टीतपासून आपणास पुष्कळच बोध घेतां येण्या जोगा आहे. आपल्याला जें सत्य वाटतें तेंच बोलावयाचें व तेंच आचरावयाचें, मग त्याचा परिणाम कांहीहि होवो; अशाच वाण्याने वागणारा मनुष्य खरा श्रेष्ठ होय व अशा महात्म्यांत प्रह्लाद हा फार श्रेष्ठ महात्मा होऊन गेला यांत संशय नाही.

प्रश्न

(१) विरुद्धार्थी शब्द लिहा:—

(१) कुबुद्धि..... (२) समर्थ.....

(३) प्रत्यक्ष..... (४) महात्मा.....

(२) अर्थ स्पष्ट करा:—

(१) देव तारी त्याला कोण मारी ?

(२) परमेश्वर सर्वत्र भरला आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

(३) स्मृति चांचणीः—हिरण्यकशिपूने प्रह्लादाचा छळ कसा केला ? प्रह्लाद सुरक्षित कसा राहिला ? प्रह्लादाच्या चरित्रापासून कोणती गोष्ट शिकण्यासारखी आहे ?

धडा ४८ वा

कसें हो साधतें तुम्हांला हें बाई ?

राधाबाई एक दिवस दुपारच्या वेळीं गंगूबाईंच्या घरीं बसावयास गेल्या. तेव्हा त्यांच्या घरच्या टापटिपांकडे व सामानासुमानाच्या शोभेकडे पाहून त्या चकितच झाल्या. गंगूबाई कांही घरच्या श्रीमंत नव्हत्या. त्यांच्या यजमानास सारा ५० रुपये पगार मिळे. घरहि आपलें लहानसें दोनचार खोल्यांचें होतें, पण दोनचार सुंदर तसबिरी, नक्षीचें भरतकाम केलेलीं चारपांच तबकें; टेबलावर पसरलेले सुंदर जाळीदार रुमाल व त्यावर ठेवलेली सुरेखशी फुलदाणी, वगैरे जिनसांना त्यांच्या बैठकीस उत्कृष्ट शोभा आली होती. त्यांना दोन मुलें होतीं. त्यांच्याहि अंगावर साधेच पण ठाकठिकीने शिवलेले कपडे दिसत होते. व ते अगदी स्वच्छ होते.

राधाबाई—"गंगूबाई, फार आनंद होतो बाई तुमच्या घरची शोभा पाहून. कसें हो तुम्हांला हें सर्व साधतें ? कोठून

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आणले हे सगळे जिन्नस तुम्ही ? बाजारांतून का ? मग यांना किंमती बऱ्याच पडल्या असतील ?

गंगूबाई:—खरें सांगूं का राधाबाई ? साऱ्या वस्तु आम्हांला फारच स्वस्तांत पडल्या आहेत. काय जराशी किंमत पडली ती या तसबिरींतील चित्रांना. बाकी त्यांच्या चौकटी देखील आमच्या घरींच केल्या आहेत. हीं फुलदाणींतील कागदी फुलें मीं स्वतःच कातरलीं. हें मेजावरील कापड मी स्वतःच विणलें. हीं भरतकामाचीं ताटें मींच तयार केलीं. अहो ! आम्हां गरिबांना असले जिन्नस विकत घेणें परवडेल कसें ? स्वतःच फावल्या वेळीं थोडें थोडें काम करून मीं यांतील बहुतेक जिन्नस तयार केले !

राधा०:—आणखी हें मुलीचें झबलें व मुलाचा पोशाक ?

गंगूबाई:—तीहि मींच घरीं शिवलीं !

राधा०:—धन्य आहे बाई तुमची ! हें सगळें तुम्ही कसें हो करूं शकलां ? घरचें स्वयंपाकपाणी तर तुम्हींच करीत असाल ? का कोणी आहे मदतीला ?

गंगूबाई:—छे हो ! चेष्टाकरतां कीं काय आम्हां गरिबांची ?

राधा०:—नाही हो ! अगदी मनापासून विचारलें मीं ! कारण मी आपली विचार करतें आहें मघांपासून की तुम्हांला हें सर्व करण्यास फावतें तरी कसें ? माझ्या घरीं स्वयंपाकाला ब्राह्मण आहे; भांडीं घासणें, धुणीं धुणें, निवडणें, पाखडणें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

इत्यादि कामांसाठी एक गडी व एक कुळंबीण आहे. पण आमच्या घरीं नाही अशी शोभा व स्वच्छता दिसत. तरी मी स्वतः बघत असतें कित्येक गोष्टींकडे.

गंगूबाई:—त्याचें असें आहे, राधाबाई. या गोष्टी स्वतःची हौस व दक्षता यांवर अवलंबून असतात. आणि वेळ फावण्याविषयी म्हणाल तर ज्यांना काम पुष्कळ त्यांनाच वेळ अधिक मिळतो. [राधाबाई आश्चर्याने पाहतात.] अशा चकित नका होऊं ही अगदी अनुभवाची गोष्ट आहे. वेळेचा सदुपयोग केला, रिकामी एक घटका देखील जाऊं द्यावयाची नाही, असें म्हटलें कीं कामाचे डोंगर पडतात ! फावत नाही, फावत नाही, म्हणणारे लोक बहुतकरून आळसांतच काल काढीत असतात. तुमचीच गोष्ट घ्या. रागावूं नका हो, पण घरचा स्वयंपाक, मुलांचे कपडे शिवणें. स्वतःचे व तिकडचे कांही कपडे दुरुस्त करणें वा थोडाबहुत कशीदा व भरतकाम करणें या गोष्टी करण्यास मला जर वेळ मिळतो, तर तुम्हांस तो कां मिळूं नये ? पण याला हौस व उद्योग पाहिजे. 'थेंबें थेंबें तळें साचे' असें म्हणतात ना ? तशीच रोज थोडीं थोडीं कशिद्याचीं व नक्षीचीं कामें तुम्हीं केलीं. तर थोड्याच दिवसांत तुमचा दिवाणखाना किती सुंदर दिसेल ? शिवाय घराची बरीचशी शोभा त्याच्या स्वच्छतेवर अवलंबून असते. माझ्या घरांत तुम्हांस धुरळा व केरकचरा कोठेच दिसणार नाही. कारण माझें सारखें त्याच्या सफाईकडे लक्ष असतें. वेळच्या वेळीं सर्व गोष्टी करण्याची व जेथल्या वस्तु तेथे

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ठेवण्याची सवय ठेवली म्हणजे टापटीप व स्वच्छता राखणें अगदी सोपें होतें. करून पहा तुम्हीं एकदा आपल्या घरीं तसा प्रयत्न.

राधा०:——खरेंच बाई; तुम्ही सांगतां हें अगदी खरें, मीहि आजपासून असा प्रयत्न करून पाहतें. पण शिकवालना मला तुम्ही हें नक्षीकाम व चित्रकला ?

गंगूबाई:——होय. मोठ्या आनंदाने.

प्रश्न

(१) स्पष्टिकरण करा:——(१) थेंबें थेंबें तळें साचे.
(२) वेळेचा सदुपयोग म्हणजे काय ?

(२) स्मृति चांचणी:——(१) गंगूबाईच्या घराचें वर्णन करा ? (२) गंगूबाई आपला सारा दिवस कसा घालवितात ? (३) राधाबाईना गंगूबाईसारखें कां येत नव्हतें ?

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

धडा ४९ वा

केवढें क्रौर्य हें !

[एका मरणोन्मुख पक्षिणीचे उद्गार.]

[श्लोक]

क्षणांक्षणिं पडे, उठे परि वळें उडें बापडी,
चुके पथहि येउनी स्तिमित दृष्टिला झापडी;
किती घळघळां गळे रुधिर कोमलांगांतुनी,
तशीच निजकोटरा परत पातली पक्षिणी ॥ १ ॥
म्हणे निजशिशुं प्रती, "अधिक बोलवेना मला,
तुम्हांस अजि अंतिचा कवळ एक मी आणिला;
करा मधुर हा, चला भरवितें तुम्हां एकदा,
करो जतन यापुढे प्रभु पिता अनाथां सदा ॥ २ ॥
अहा ! मधुर गाउनी रमविलें सकाळीं जनां,
कृतघ्न मज मारितील नच ही मनीं कल्पना;
तुम्हांस्तव मुखीं सुखें धरुनि घास झाडावरी,
क्षणैक बसल्यें न तों, शिरत बाण माझ्या उरीं ॥ ३ ॥
निघून नरजातिला रमविण्यांत गेलें वय,
म्हणून वधिलें मला, किति दया, कसा हा नय !
उदार बहु शूर हा नर खरोखरी जाहला,
वधून मज पाखरा निरपराध कीं दुर्बला ॥ ४ ॥
म्हणाल भुलली जगा विसरली प्रिया लेंकरां,

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

म्हणून अति संकटें उडत पातलें मी घरा;
नसे लवहि उष्णता, नच कुशींत माझ्या शिरा,
स्मरा मजवरोवरी परि दयाघना ईश्वरा" ॥ ५ ॥
असो; रुधिर वाहुनी नच भिजो सुशय्या तरी,
म्हणून तरुच्या तळीं निजलि ती द्विजा भूवरी;
जिवंत वहु बोलकें किति सुरम्य तें उत्पल,
नरें धरुनि नाशिलें खचित थोर बुद्धी बल ! ॥ ६ ॥
मातींत ते पसरले अति रम्य पंख
केलें वरी उदर पांडुर निष्कलंक !
चंचू तशीच उघडी, पद लांबवीले
निष्प्राण देह पडले, श्रमही निमाले ! ॥ ७ ॥

ना. वा. टिळक

प्रश्न

(१) स्मृति चांचणीः—(१) केवढें कौर्य हें ! या कवितेंतील गोष्ट सांगा. (२) पक्षिणीने मनुष्याला कोणता दोष दिला ? (३) पक्षीण घरट्यांत कां गेली नाही ?

(२) कविता पूर्ण लिहाः—

(१) म्हणे निजशिशूंप्रती.....

(२) म्हणाल भुलली जगा.....

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

धडा ५० वा

भेडाघाटची यात्रा

भाग १ ला

पुष्कळ दिवसांपासून आम्ही भेडाघाटची कीर्ति ऐकत होतों. शेवटी तो पाहण्याचा योग गेल्या नाताळच्या सुटींत आला.

आम्ही उमरावतीहून गोंदियाच्या मार्गाने प्रवास केला. गोंदियापासून जबलपूरपर्यंत बी. एन्. रेलवेच्या छोट्या गाडीने प्रवास करावा लागतो.

आम्ही जबलपूर येथील स्टेशनाजवळील राजा गोकुलदास यांच्या धर्मशाळेंत मुक्काम केला.

दुसऱ्या दिवशीं आम्ही एक मोटार लॉरी भाड्याने केली, व भेडाघाटकडे निघालों. हें ठिकाण जबलपूरच्या नैऋत्येस सुमारे तेरा मैल अंतरावर आहे. जबलपूरकडून इटारसीकडे जाणाऱ्या रेल्वे रस्त्यावर भेडाघाट नांवाचें स्टेशन लागतें. तेथून हें ठिकाण सुमारे तीन मैल पडतें. मोटारी किंवा तांगे यांनी जाण्याची ऐपत नसलेले लोक हाच मार्ग पसंत करतात.

जबलपूरच्या आसपास टेकड्या पुष्कळ आहेत, या टेकड्यांमधूनच मोटारचा रस्ता गेला आहे. त्याचां नागमोडी वळणें, भोवतालची गर्द झाडी, मधून मधून बाजूला लागणारे

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

तलाव व झुळझुळ वाहणारे इत्यादिकांनी झरे हा रस्ता



मदनमहाल, जबलपूर

फारच मोहक झाला आहे. मात्र मोटार वरीच सावधगिरीने हाकावी लागते.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

जातांना वाटेंतच आम्हीं एक प्रेक्षणीय ठिकाण पाहिलें. तें मदनमहाल हें होय. हें स्थान टेकडीवर असून तें पूर्वीच्या गोंड राजांच्या वेळच्या किल्ल्याचा एक पडका अवशेष आहे. एका उंच टेकडीवर एकच प्रचंड गोलाकृति शिला व तिजवर एक पडकीशी इमारत, एवढेंच आता तेथे दिसतें. पण एका काळीं हें राणी दुर्गावतीचें आवडतें निवासस्थान होतें! त्या वेळीं येथे किती इमारती असतील व त्या माणसांनी किती तरी गजबजलेल्या असतील! पण आतां?

या किल्ल्याच्या पायथ्याशीं गढा नांवाचें खेडें आहे. तें पूर्वी मोठें शहर असून गढामंडलयाच्या गोंड राज्याची राजधानी होतें. त्या वेळीं ज्याचें नांवहि फारसें ऐकूं येत नसे, त्या जबलपूरचें आज शहर झालें आहे व गढा मात्र एक खेडें बनलें आहे. हा कालाचा महिमा!

याच्या पुढे दोन चार मैल ंतरावर तेवर नांवाचें खेडें आहे. हें खेडें प्राचीन हिंदुस्थानांत त्रिपुर या नांवाचें प्रसिद्ध शहर होतें व तें हैहयवंशी क्षत्रिय राजांची राजधानी होतें.

असो. नर्मदा नदी जसजशी जवळ येत चालली, तसतसा आमचा रस्ता बराच उताराचा व नागमोडीचा होऊं लागला. अखेरीस एका दगडी पुलावरून पलीकडचा चढाव चढल्यावरोबर आमची मोटार भेडाघाटच्या धर्मशाळेनजीक येऊन पोचली.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

प्रश्न

(१) चूक किंवा बरोबर हें सांगाः—

(१) जबलपूरच्या आसपास पुष्कळ टेकड्या नाहीत.....

(२) किल्ल्याच्या माथ्यावर गढा नांवाचें खेडें आहे.....

(२) समानार्थी शब्द सांगून त्यांचा वाक्यांत उपयोग कराः—निवासस्थान, कालाचा महिमा, अवशेष, योग.

(३) विरुद्धार्थी शब्द सांगाः—१ प्राचीन, २ पायथा, ३ आवडते, ४ नागमोडी.

धडा ५१ वा

भेडाघाटची यात्रा

भाग २ रा

भेडाघाट हें पूर्वीचें भृगुक्षेत्र हाय. येथे पूर्वीं भृगुऋषीचा आश्रम होता असें म्हणतात. खरोखर भृगुऋषींनी आश्रमासाठी शोधून काढलेलें ठिकाण फारच चित्ताकर्षक आहे. नर्मदा खडकाखडकांतून धावत येऊन एका मोठ्या खडकावरून खाल जागीं उडी घेते. त्यामुळे तेथे धबधबा बनलेला आहे. वरून

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

खाली कोसळणाऱ्या पाण्याचे तुषार केवळ पांढऱ्या स्वच्छ वाफेसारखे किंवा धुरासारखे दिसतात, म्हणूनच या धबधब्यास 'धुंआधार' असें म्हणतात. वर पांढरा स्वच्छ धूर व खालच्या बाजूस पाण्याच्या जंगी खळबळाटामुळे उसळणारा स्वच्छ दुधासारखा फेस यांची मौज पाहत आम्हीं दोन तास घालविले तरी तेथून जावेंसें वाटत नव्हतें.

मग आम्ही तेथून परतलों. वाटेंत जरा बाजूला वळून आम्हीं संगजिऱ्याच्या खाणी पाहिल्या. संगजिरा हा दगड पांढरा स्वच्छ व मऊ असून फार गुळगुळीत असतो. त्याचीं चित्रें वगैरे फार जलद बनतात. शिवाय हा औषधी कामास येतो.

येतांना आम्हीं गौरीशंकराचें देऊळहि पाहिलें. हें टेकडीवर असून त्याच्या भोवतीं तट आहे. मध्ये देऊळ असून भोवतालच्या भिंतीनजीक ओवऱ्या आहेत. त्यांमध्यें छिन्नविच्छिन्न झालेल्या चौसष्ट योगिनींच्या मूर्ति आहेत. मूर्तींच्या अवशेषांवरून त्या फार सुंदर असाव्या असें वाटतें. पण मुसलमानी अमलांत त्यांचा नाश झाला. देवळांत नंदीवर बसलेली शंकरपार्वतीची मूर्ति आहे. अशी मूर्ति इतरत्र फारशी दिसत नाही.

मग आम्हीं धर्मशाळेच्या जरा खालच्या बाजूस नदीची दरड उतरून गेलों. तेथे डिस्ट्रिक्ट कान्सिलच्या होड्या मिळतात. त्यांपैकी एका होडींत बसून आम्ही संगमरवरी खडक पाहावयास निघालों. नदीच्या वरच्या बाजूस धुंआधारेकडेच आमची

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

नाव चालू लागली. थोड्या वेळाने आम्हांस असें वाटलें, की



संगमरवरी खडक, जबलपूर

चीहोबाजूंनी खडकाने वेष्टिलेल्या एका संथशा तलावांत आपण

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आहों ; व समोर मुळा रस्ताच नसावा. पण अमळ पुढे जातांच, एक चिंचोळा रस्ता लागून त्यांतून नाव पुढे गेली. आता मात्र संगमरवरी खडकांची खरी मौज दिसूं लागली. दोहों बाजूस शुभ्र संगमरवरी खडकाच्या उंच उंच भिंती व मध्ये एक नागमोडीने वाहत गेलेला नदीचा संथ प्रवाह ! या भिंतीची उंची पुष्कळ ठिकाणीं पन्नास साठ फूट सहज भरेल. नदीचें पात्र बऱ्याच ठिकाणीं फारच अरुंद होतें, ज्या ठिकाणीं तें फार अरुंद आहे त्या ठिकाणास 'बंदरकूदी' (वानराची उडी) असें नांव पडलें आहे. बोटींतून जात असतां नावाडी या ठिकाणाबद्दल खऱ्याखोट्या पुष्कळशा आख्यायिका सांगत असतात. त्यांनी बरीच करमणूक होते. ही एवढी प्रचंड खिंड नदीच्या पाण्याच्या वेगाने शेकडो वर्षें खडक झिजून झिजून बनली आहे. हा विचार मनांत आला म्हणजे सृष्टीच्या पाण्याच्या शक्तीचें कौतुक वाटतें !

चांदण्या रात्रीं चंद्राच्या सौम्य प्रकाशांत जशी ताजमहाल पाहण्याची मजा आहे, तशीच या खडकांचीहि आहे. असें म्हणतात. पण आम्हांस ही मौज पाहण्यास वेळच नव्हता !

नाव धुंआधारेच्या थोडीशी अलीकडेच थबकते. कारण येथून पाण्याचा जोर फार वाढतो व नावपुढे जाऊं शकत नाही.

परत घाटावर येऊन पोचेतों तोंच संध्याकाळ झाली. म्हणून आम्ही परतलों व जबलपरहून रात्रीच्या गाडीने निघून दुसऱ्या दिवशीं उमरावतीस परत आलों.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

प्रश्न

(१) स्मृति चांचणी:—(१) तुम्ही भेडाघाटास गेला तर तेथे काय पहाल ? (२) उमरावती ते भेडाघाटचा प्रवास मार्ग सांगा. (३) भेडाघाटाचें वर्णन करा.

(२) टिपणें लिहा:—भृगुक्षेत्र, बंदरकुदी, धंआधार, संगजिरा, मदनमहाल.

धडा ५२ वा

म्युनिसिपालिटी (नगरसभा)

एलिचपूर येथे आज खूप गडबड दिसत होती. सकाळीं उजेडल्यापासून मोटारी, तांगे इकडून तिकडे, तिकडून इकडे धावत होते. त्यांवर निरनिराळ्या रंगांचे झेंडे फडकत होते. मोठमोठ्या अक्षरांनी लिहिलेल्या तक्तयांवर 'तांबड्या पेटींत मतें टाका' अथवा 'हिरव्या पेटींत मतें टाका' अशीं वाक्यें दिसत होतीं. कोणी असे झेंडे व पाट्या घेऊन पायींच मिरवीत होते व लोकांना जाहिरातीचे कागद वाटीत होते. कोणी बरोबर बाजे वाजवीत मिरवणूक काढीत होते !

"हें काय आहे, बाबा ? आज ही कसली धांदल सुरू आहे उजेडल्यापासून ?" केशवाने प्रश्न केला.

निळोपंत:—"केशव, आज आपल्या शहरच्या म्युनिसि-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पालिटीची निवडणूक आहे. तीन वर्षांनी एकदा अशी निवडणूक होते.

केशवः——पण बाबा, म्युनिसिपालिटी म्हणजे काय हें मला नीटसें माहीत नाही. आपल्या येथे रोज भंगी येऊन पायखाना साफ करतो, तो म्युनिसिपालिटीचा असे मीं ऐकलें आहे. तसेंच रस्त्यांत दिवे सुद्धा तीच लावते असें म्हणतात. पण ही म्युनिसिपालिटी म्हणजे आहे तरी काय ?

निळोपंतः——म्युनिसिपालिटी म्हणजे शहरांतील सफाई, दिवाबत्ती, रस्ते दुरुस्ती वगैरे कामें करणारें पंचांचें मंडळ; हिला नगरसभा असे म्हणतां येईल. सर्व प्रांताचा अथवा देशाचा कारभार सरकार स्वतःच्या हातीं ठेवतें; पण प्रत्येक ठिकाणच्या म्हणजे स्थानिक अशा कित्येक बाबी सरकार तेथील लोकांवरच बहुतेक अंशीं सोपवितें. लोकांना आपला कारभार स्वतःकरण्याची हळू हळू सवय लागावी, हा त्यांत उद्देश आहे. लोकांनी आपल्यापैकीच कांही पुढारी पंच म्हणून निवडून द्यावे व त्यांनी गावाचा कारभार पाहावा, अशी ही योजना असते. म्हणून अशा योजनेस स्थानिक स्वराज्य असें म्हणतात. हे पंच निवडून देण्याचीच गडबड आज सुरू आहे.

केशवः——पण म्युनिसिपालिटीचीं कामें तरी कोण-कोणतीं ?

निळोपंतः——सर्वांत महत्त्वाचें काम सफाई व आरोग्य-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

रक्षण हें होय. खेड्यापेक्षा शहरांत मनुष्यवस्ती दाट असते; त्यामुळे नानाप्रकारची घाण, मैला, केरकचरा हीं सारखीं साठत असतात. हीं जर वेळच्या वेळीं काढलीं गेलीं नाहीत, तर दुर्गंधी सुटून सर्व शहराचें आरोग्य बिघडेल, तेव्हा त्या बाबतींत दक्षता ठेवणें, मोऱ्या, गटारें बांधून गावांतील सांडपाणी बाहेर काढून लावणें, हें पहिलें महत्त्वाचें काम. सार्वजनिक पाणीपुरवठा हें दुसरें मोठें काम. रस्ते बनविणें व चांगले दुरुस्त राखणें हें तिसरें काम. शहरांत व्यापाराच्या निमित्तानें व इतर कारणांनी गाड्या, तांगे, मोटारी यांची रहदारी सारखी सुरू असते. यामुळे रस्ते फार लवकर खराब होतात; म्हणून त्याकडे म्युनिसिपालिटीस सारखें लक्ष द्यावें लागतें. दिवाबत्तीचें महत्त्व शहरांत किती आहे हें सांगण्याची गरज नाही. याशिवाय लोकांच्या प्राथमिक शिक्षणाचें कामहि म्युनिसिपालिट्याच करतात. आपल्या येथील सर्व प्राथमिक मराठी शाळा म्युनिसिपल शाळाच आहेत. प्लेग, कॉलरा वगैरे रोगांना प्रतिबंध करून, लोकांना जरूर ती मदत देणें हें कामहि म्युनिसिपालिटीच करते.

केशवः——अबब ! एकूण बरींच कामें करावीं लागतात या नगरसभेला ! पण हीं करावयास पैसा लागत असेल नाही ?

निळोपंतः——चांगला प्रश्न विचारलास ! पैशाशिवाय कसें चालेल ? सरकारने ज्या अर्थी हें काम लोकांवर सोपविलें आहे, त्या अर्थी या कामाला लागणारा पैसा लोकांकडून वसूल

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

करण्याचा अधिकार म्युनिसिपालिटीस देणें हें ओघानेच आलें. म्युनिसिपालिटी लोकांवर कांही कर बसविते, त्यांना पट्ट्या म्हणण्याची चाल आहे. घरपट्टी, पाणीपट्टी, भंगीपट्टी, अशा पट्ट्यांचीं नांवें तूं ऐकलीं असशीलच. या कराच्या पैशांतून म्युनिसिपालिटी आपला खर्च करते. बाहेरगावाहून येणाऱ्या मालावारहि म्युनिसिपालिटी कांही कर बसविते. याला जकात (आक्ट्राय) पट्टी म्हणतात. मोटारगाड्या, तांगे, सायकली वापरणारांवरहि लहानमोठ्या पट्ट्या बसतातच.

केशवः——एकंदर किती मंडळी असतात अशा कमिटीमध्ये !

निळोपंतः——त्याचा कांही नियम नाही. शहराच्या लोकवस्तीप्रमाणे त्यांची संख्या कमीजास्त असते. लोकांनी निवडलेल्या पंचांखेरीज सरकार आपल्यातर्फेहि कांही पंच निवडून देतें. व मग सर्व पंच मिळून आपला अध्यक्ष, उपाध्यक्ष वगैरे अधिकारी निवडतात. अर्थात् नगरसभेचा अध्यक्ष होणें हा मोठा मान समजला जातो; व त्याच्यावर जबाबदारीहि मोठी असते. यावरून लोकांत आज इतकी गडबड कां हें तुझ्या ध्यानीं येईल.

केशवः——होय, थोडीशी कल्पना आली. पण त्यासाठी एवढी धांदल कां करतात. हें नाही मला समजलें.

निळोपंतः——धांदल चढाओढीमुळे उत्पन्न होते. आताच मीं सांगितलें ना. म्युनिसिपालिटीचे सभासद व त्यांतल्या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

त्यांत अध्यक्ष होणें हें फार मानाचें समजलें जातें. लोकांचें कल्याण अकल्याण हें त्यांच्या बऱ्याच अंशीं हातीं असतें. म्हणून हा मान व अधिकार आपणांस मिळावा अशी इच्छा पुष्कळ लोकांस असते. अर्थात् म्युनिसिपालिटींतील एका जागेकरितां दोन तीनहि उमेदवार उभे राहतात. व मग 'मला मतें द्या', 'मला मतें द्या' अशी प्रत्येकाला मतदारांपाशीं याचना करावी लागते.

केशवः—पण हीं मतें कोण देतात ?

निळोपंतः—हा अधिकार म्युनिसिपालिटीला कर देणारांना असतो. वर्षाकाठीं कमींत कमी अमुक इतकी पट्टी भरणाऱ्याला मत (याला इंग्रजींत व्होट असें म्हणतात) असतें. या मतदानच्या सोईसाठीं शहराचे लहान लहान भाग पाडतात. त्यांस वॉर्ड म्हणतात. प्रत्येक वॉर्डाकडून एक अथवा दोन सभासद निवडावयाचे असतात.

मतदानाच्या वेळीं कोणाहि उमेदवाराची मतदाराला भीड पडूं नये यासाठीं गुप्तमतदानाची व्यवस्था केलेली असते; व याचसाठीं निरनिराळ्या रंगाच्या पेट्या बनवितात व कोणालाहि न दिसतां या पेटींत मतदाराला आपल्या मताचा कागद टाकतां यावा अशी तजवीज मतें देण्याच्या जागीं (याला पोलिंग स्टेशन असें म्हणतात) करण्यांत येते. आता आला ना तुझ्या ध्यानांत ह्या झेंड्यांचा व पाट्यांचा अर्थ ? ही सर्व उमेदवारांची मतें मिळविण्याची खटपट आहे. ज्याला सर्वांत जास्त मतें मिळतील तो उमेदवार निवडून येईल !

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

केशवः——आता आलें माझ्या लक्षांत सारें ! मग मत देणें हें काम सुद्धा जरा कठीणच आहे म्हणावयाचें !

निळोपंतः——खरें आहे. आपल्या वतीने चांगलीं माणसें निवडून गेलीं तरच म्युनिसिपालिटीचा कारभार चांगला चालेल. लबाड, स्वार्थी, पैसेखाऊ लोकांना जर आपण निवडून दिलें तर कारभार वाईट चालेल. असा प्रकार दुर्दैवाने पुष्कळ चालतो. अद्याप आपले लोक बरेच अडाणी आहेत. ते मतें देतांना फारसा विचार करीत नाहीत. पण ही गोष्ट फार महत्त्वाची आहे. मतदानाचा हक्क आपण काळजीपूर्वक उपयोगांत आणला, तरच आपलें स्थानिक स्वराज्य यशस्वी होईल.

प्रश्न

(१) आठवणीची चांचणीः——(१) म्युनिसिपालिटी म्हणजे काय ? (२) तिचा कारभार कसा चालतो ? (३) नगरसभेचीं कामें कोणतीं ? (४) नगरसभेला पैसा कोठून मिळतो ? (५) नगरसभेंत कोणाला निवडून द्यावें ? (६) गुप्त मतदान कां करतात ?

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

धडा ५३ वा

अश्वत्थामा व कर्ण

(नाटक)

[द्रोणाचार्यांच्या वधानंतर सेनापति कोणीं व्हावें याबद्दल द्रोणाचा मुलगा अश्वत्थामा व कर्ण यांमध्यें झालेलें भांडण पुढें दिलें आहे.]

(पितृशोकानें व्याकुल झालेल्या अश्वत्थाम्यास घेऊन कृपाचार्य येतो, दुर्योधन त्यांचें स्वागत करतो.)

दुर्योधनः—(त्यांजकडे पाहून) कोण कृपाचार्य ? अश्वत्थामाहि ? गुरो, मी अभिवंदन करतों. आचार्यपुत्रा ! ये रे बाबा, मला भेटूं दे !

(अश्वत्थाम्यास आलिंगून जवळ बसवितो.)

अश्वत्थामाः—(अश्रु ढाळीत) राजा, माझा तात कोठे आहे ? हाय ! हे ताता !

दुर्योधनः—आचार्यपुत्रा, या संकटीं तुझ्या आणि माझ्या दुःखांत कांही अंतर नाही. तुझा पिता व माझा पिता हे जुने मित्र, तूं व मी त्यांच्याजवळ विद्या शिकलों ! अर्थात् प्रत्यक्ष तातनिधनाचेंच दुःख मलाहि या वेळीं झालें आहे !

अश्वत्थामाः—राजा, तं माझ्यावर इतकी कृपा करतोस त्या अर्थी मीं आपला शोक टाकावा हेंच उचित होय. पण मला वाईट एवढेंच वाटतें की, मी जिवंत असतां त्या दुष्ट

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

धृष्टद्युम्नाने माझ्या पित्याचे केश धरून त्याचें शिर कापावें ! काय उपयोग असल्या संततीचा !

कर्णः——द्रोणपुत्रा, येथे दुसऱ्याने काय करावें ? ज्याच्यावर सर्वांचा भिस्त, त्यानेच आपल्या हातचें शस्त्र खाली टाकलें आणि आपली अशी अवस्था करून घेतली.

अश्वत्थामाः——अंगराज, काय बोलतां आपण हें ! दुसऱ्याने काय करावें ? ऐका काय करावें तें ! या धर्मराजाच्या बाजूने लढणारा प्रत्येक योद्धा व पांचाल वंशांत जन्माला आलेला प्रत्येक माणूस—मग तें मूल असो, तरुण असो, की म्हातारा असो, फार काय, तो मातेच्या गर्भांत असला तरी-त्याचा पूर्ण निःपात करण्याची मीं प्रतिज्ञा केली आहे !

दुर्योधनः——आचार्यपुत्रा, तूं वीरनायक आहेस. तुझ्या शौर्याची बरोबरी कोण करणार आहे ?

कृपाचार्यः——राजा, द्रोणाच्या पश्चात् हा त्याचा पुत्र संग्रामाचा भार आपल्या शिरावर घेण्यास समर्थ आहे. तर त्यालाच सेनापतिपदाचा अभिषेक करावा.

दुर्योधनः——गुरो, ही आपली योजना फार चांगली आहे. पण, या बाबतींत माझें पूर्वींच कर्णाशीं वचन गेलें आहे.

अश्वत्थामाः——राजा कौरवेश्वरा, तूं ह्या वेळीं माझ्यावर भार टाकून स्वस्थ बैस. सर्व पृथ्वी निःपांडव करून टाकतों व पांचाळांचें नांव सुद्धा पृथ्वीवर राहूं देत नाही. पहा तर खरा !

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कर्णः—बोलणें सोपें, पण करून दाखविणें फार कठीण. असें कर्म करण्याजोगे पुरुष ह्या कौरव सैन्यांत पुष्कळ निघतील !

अश्वत्थामाः—होय, अंगराज. कौरवसैन्यांत असे पुरुष पुष्कळ आहेत. मी जें बोललों तें दुःखाच्या भरांत बोलून गेलों. गर्वाने कोणा वीरपुरुषाचा धिक्कार करावा या बुद्धीने बोललों नाहीं.

कर्णः—मूर्खा, जो दुःखित झाला, त्याने रडत बसावें. जो वीर असेल त्याने शस्त्र घेऊन रणांगणांत उतरावें ! वायफळ बडबड काय कामाची !

अश्वत्थामाः—(संतापून) अरे नीचकुलोत्पन्ना सूतपुत्रा ! माझी निंदा करतोस काय ?

कर्णः—तूं माझ्या कुळाचा उल्लेख करून मला हिणवं पाहातोस; पण ध्यानांत ठेव. मीं सूत असेन व सूतपुत्र असेन; उच्च किंवा नीच कुळांत जन्म येणें ही गोष्ट दैवाधीन आहे. पण माझा पराक्रम मात्र माझ्या स्वाधीनचा आहे !

अश्वत्थामाः—मग तूं मघाशीं काय बोललास ? मला, अश्वत्थाम्याला रडून दुःखाचा प्रतिकार करायला सांगतोस काय ? पण ध्यानांत ठेव, माझें शस्त्रवीर्य तुजप्रमाणे गुरूच्या शापाने निष्फल झालेलें नाही. तं जसा आज रणांतून पळ काढलास, तसा मीं कधी रणांतून पळ काढलेला नाही. मग नुसते अश्रू गाळीत बसण्याचें मला कारण काय ?

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कर्णः—(संतापून) अरे वाचाळा ! व्यर्थ शस्त्र धारण करणाऱ्या ब्राह्मणाच्या पोरा ! पांचाळांच्या भीतीने तुझ्याच बापाने जसें शस्त्र टाकलें तसें तर मीं कधी टाकलें नाही ना !

अश्वत्थामाः—अरे नीचा ! माझ्या पित्याची निंदा करतांना तुला लाज नाही वाटत ! माझ्या पित्याचें शौर्य साऱ्या जगाला माहीत आहे व त्याने शस्त्र खाली कां टाकलें याचें कारण त्या वेळीं तेथे असलेल्या धर्मराजाला फार चांगलें माहीत आहे. रणांगणावर हा प्रकार झाला तेव्हा, अहो मित्रेवहादर, आपण कोणीकडे होतां ?

कर्णः—(किंचित् हसून) हो, हो मी मित्रा खरा. तं मात्र मोठा पराक्रमी, धैर्याचा मेरु आहेस नव्हे ! तुझ्या पित्याची आठवण होऊनच मला थोडा संशय आला ! मी तुला असें विचारतों की, शस्त्राचा त्याग केल्यावरहि तुझ्या धैर्यशाली पित्याला शत्रूचें निवारण करतां आलें नसतें काय ? सर्व लोकांसमक्ष आपला गळा कापला जात असतां त्याने स्वस्थ बसावें हा प्रकार अनुचित नव्हे काय !

अश्वत्थामाः—(क्रोधाने कापत) दुष्टा, सूताधमा ! तूं राजाचा आवडता झालास म्हणून वाटेल तसें बरळतोस काय ? दुःखाने किंवा दुसऱ्या कोणत्याहि कारणाने माझ्या पित्याने धृष्टद्युम्नाचा प्रतिकार केला नाही, एवढ्याच कारणाने तूं जीभ लांब करून त्याची निंदा करतोस काय ? हा पहा तुझ्या मस्तकावर मी माझा डावा पाय ठेवतों. (तसें करावयास जातो.)

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कर्णः—(तरवार उपसून) अरे दुष्टा, कशाला एवढी घमेंड ? तूं उच्च ब्राह्मण कुळांतला म्हणून अवध्य जरी असलास तरी हा तुझा उंच केलेला पाय मीं खड्गाने तोडलाच म्हणून समज !

अश्वत्थामाः—अरे मूर्खा ! मी जातीमुळे अवध्य झालों काय ? तर ही मीं जात टाकली पहा (यज्ञोपवीत तोडतो). बळ अंगांत सामर्थ्य असेल तर कर माझा वध ! किंवा हात जोडून शरण तरी ये !

(दोघेही शस्त्रें घेऊन एकमेकांवर प्रहार करावयास उठतात. कृप व दुर्योधन त्यांचें निवारण करून त्यांस शस्त्रें ठेवावयास सांगतात.)

कर्णः—राजा, सोड या वेळीं तूं मला; माझ्या आड नको येऊं. असल्या नीच बडबड्याला योग्य शासन झालेंच पाहिजे.

अश्वत्थामाः—राजा, सोड त्याला. माझ्या बाहूंनी चिरडून ठार ठार करतों त्याला ! स्नेहामुळे किंवा कार्यसिद्धीकडे नजर देऊन तूं ह्या गुरुनिंदक दुष्टाचा बचाव करूं इच्छीत असशील ! पण तें व्यर्थ आहे. तुजसारख्या चंद्रवंशाच्या भूषणाला या कर्णासारखा हीन कुळांत जन्मलेला साथीदार असावा हेंच मुळी अयोग्य ! अर्जुनाच्या वधाबद्दल तूं निःशंक रहा. तें काम मजकडे लागलें. सोड, या पाजी माणसाला. मीं आतांच ठार करून टाकतों. (कर्णावर प्रहार करावयास उठतो).

कर्णः—(खड्ग उचलून) अरे वाचाळा ब्राह्मणाधमा,

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

होतास कीं नव्हतास करून टाकतों पहा. राजा, सोड, सोड मला या वेळीं. नको आड येऊं माझ्या.

(अश्वत्थाम्यास मारावयास पाहतो. कृप आणि दुर्योधन त्याचें निवारण करतात.)

दुर्योधन :—अरे कर्णा, गुरुपुत्रा, काय तुमचा वेडेपणा हा !

कृपाचार्यः—वत्सा, अश्वत्थामा ! शत्रूंचा नाश करणें एकीकडेच राहून तुम्ही आपापसांत भांडतां काय ?

अश्वत्थामाः—मामा ! ह्या कटू जहरासारखें भाषण करणाऱ्या सूतपुत्राची एकदा चांगली खोड मोडावयाची मनांत आहे हो; पण काय करूं. सापडत नाही !

कृपाचार्यः—बाळा, आपल्याच पक्षांतील प्रमुख पुरुषाशीं भांडावयाची ही वेळ आहे का ?

अश्वत्थामाः—मामा, हें पहा मी माझें शस्त्र खाली टाकलें. हा नीच जिवंत असेल तोंवर मीं तें हातीं धरणार नाही. आता त्याला खुशाल सेनापति होऊं दे. भीमार्जुनांच्या भयाने हा राजा दुर्योधन गांगरून जाईल, त्या वेळीं त्याला होईल माझें स्मरण !

(शस्त्र खालीं टाकतो.)

कर्णः—तुझ्यासारख्याने शस्त्र हातीं ठेवलें काय अथवा टाकलें काय, दोन्ही सारखींच ! माझ्या हातीं जोंपर्यंत शस्त्र आहे तोंपर्यंत कोणीहि हातांत शस्त्र घेतलें नाही तरी चालेल; कारण माझ्या बाणांनी जो कार्यभाग होणार नाही तो दुसरा कोण करूं शकेल ?

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

(इतक्यांत पडद्यापलीकडे शब्द होतो) "अरे दुष्टा दुःशासना ! द्रौपदीसारख्या साध्वीचे केश धरून तिला फरफरा ओढणाऱ्या नीचा ! बरा सापडलास ! आता कोठे जाशील ? अहो दुर्योधन कर्ण प्रभृति वीर ! पांडवद्वेष्टे लोक हो ! पहा या नरपशूच्या छातीवर बसून मी याच्या रक्ताचा घोट घेतों. कोणाची छाती असेल तर या, सोडवा याला !"

(सर्व कान देऊन ऐकतात.)

अश्वत्थामाः—अहो अंगराज. अहो कौरवसेनापते, अहो द्रोणाचार्यनिंदक ! आहे आता प्रसंग तुमच्या वीर्याच्या परीक्षेचा. व्हा आता पुढे व अंगीं सामर्थ्य असेल तर सोडवा दुःशासनाला भीमाच्या तडाक्यांतून !

कर्णः—ऊं ! जारे, काय शक्ति आहे भीमाची मी जिवंत असतां आपल्या युवराजाच्या छायेलाहि स्पर्श करण्याची ! युवराजा दुःशासना ! भिऊं नको. हा मी आलोंच पहा !

(निघून जातो)

अश्वत्थामाः—राजा, कर्णाच्याने भीमाचें निवारण होणार नाही, यासाठी आपण च स्वतः त्याच्या रक्षणार्थ जावें हें बरें !

दुर्योधनः—कोण आहे रे ? माझा रथ आणा लौकर (असें म्हणून निघून जातो).

अश्वत्थामाः—मामा, आपण देखील तिकडेच जावें असें मला वाटतें. अरेरे, व्यर्थ रागाच्या भरांत मी शस्त्रत्याग केला !

(जातात.)

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

प्रश्न

(१) स्मृति चांचणीः—(१) अश्वत्थामाची प्रतिज्ञा सांगा. (२) अश्वत्थामा व कर्ण यांची चरित्रें थोडक्यांत लिहा.

(२) स्पष्टिकरण कराः—(१) उच्च किंवा नीच कुळांत जन्म येणें ही गोष्ट दैवाधीन आहे, पण माझा पराक्रम माझ्या स्वाधीनचा आहे. (२) बोलणें सोपें पण करून दाखविणें फार कठीण.

धडा ५४ वा

गुराख्याचें गाणें

कुरणावरतीं वडाखालतीं गाइ वळत बैसतों,
मजेने गाइ वळत बैसतों ।
स्फटिकापरि निर्मळ हा खळखळ झरा जवळ वाहतो ॥
पावा फुंकुनि मंजुळ नादें रान भरुनि टाकितों,
हिरवें रान भरुनि टाकितों
आनंदाने डोळे भरतां प्रभुजीला प्रार्थितों ! ॥
गाईमागे रानोमाळीं शीळ भरत हिंडतों
कधि कधी शीळ भरत हिंडतों,
दऱ्याखोऱ्या-राइ-ओहळावरी मौज मारितों ! ॥

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

(चाल बदलून) उन्हाची भीति कवणाला ?
पाऊस काय करिल तो मजला ?
भीतों कोठें मी थंडीला ?
श्रीमंतापरि गरिबा कोठें वारा तो दुखवितो,
गरिबा वारा नच दुखवितो !
देवाजीवरि सदा हवाला टाकुनि मी राहतों ! ॥ १ ॥
तृषा लागतां नीर झऱ्याचें ओंजळिने मी पितों
निर्मळ, ओंजळिने मी पितों !
क्षुधा लागतां कांदा-भाकर यथेच्छ मी जेवितों
फिरतां फिरतां करवंदें हीं तोडुनि मी भक्षितों
रानीं तोडुनि मी भक्षितों !
काठीनें मी काटे दाबुनि बोरें हीं तोडितों ॥
(चाल बदलून) धनिका ताट रुप्याचें जरी
पांचहि पक्वान्नें त्यावरी
नाही गोडि मुखाला परी !
गाईसंगें हिंडुनि रानीं थकुनि सुखें जेवितों
जाडें भरडें खाउनि धनिकाहूनि अधिक तोषतों ! ॥ २ ॥
पुच्छ उभारुनि थवा गाईंचा ज्या वेळीं नाचतो
मजेने ज्या वेळीं नाचतो,
मोर-मुकुट बन्सीवाल्यापरि मौज उभा पाहतों !
ओहळावरती थवा त्यांचा पाणी जेव्हा पिता
निर्मळ पाणी जेव्हा पितो
उभा राहुनि प्रेमें त्यांना शीळ अहा घालितों !

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

(चाल बदलून) कशाला मंदिल मज भरजरी
घोंगडी अखंड काळी शिरीं !
दंड करिं गाइ राखण्या परी !
कुवासना घालिति धिंगा तो महाल मी टाकितों,
नृपाचा महाल मी टाकितों !
गाईसंगें हवेंत ताज्या नित्यचि मी राहतों ! ॥ ३ ॥

भा. रा. तांबे.

प्रश्न

(१) गुराख्याचें गाणें हावभावयुक्त म्हणून दाखवा.
(२) गुराख्याच्या व श्रीमंताच्या जेवणाचें वर्णन करा.
(३) गुराखी श्रीमंताच्या वैभवाला कां तुच्छ समजतो ?

धडा ५५ वा

सती सावित्री

भाग १ ला

प्राचीन हिंदुस्थानांत जीं थोर स्त्रीरत्नें होऊन गेलीं, त्यांत साध्वी सावित्रीचा दर्जा फारच श्रेष्ठ आहे. तिच्या पतिप्रेमाला व कर्तव्यनिष्ठेला खरोखर उपमाच नाही.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

"जन्मसावित्री हो" असा आशीर्वाद वडील माणसें अद्यापहि विवाहित स्त्रियांना देतात. खरोबर याहून चांगला दुसरा आशीर्वाद देणें शक्यच नाही !

मद्रदेशाचा राजा अश्वपति याची ही एकुलती एक कन्या. ती रूपवान व गुणवान होती. ती वयांत आल्यावर राजास तिच्या विवाहाची चिंता लागली. पण बरेच दिवस वाट पाहूनहि कोणी तिला मागणी घालीना; तेव्हा राजा म्हणाला, "मुली, तूंच आता आपल्यासाठीं योग्य वर शोधून काढ."

बरोबर लवाजमा घेऊन सावित्री बरेच देश हिंडली. एके दिवशीं तिचा मुक्काम एका जंगलांत पडला. तेथे एका झोपडींत द्युमत्सेन या नांवाचा अंध गृहस्थ आपली पत्नी व पुत्र यांसह राहत होता. मुलाचें नांव सत्यवान असें होतें. त्याला पाहतांच सावित्रीचें मन मोहित झालें. चौकशी अंतीं तिला समजलें की, द्युमत्सेन हा पूर्वी शाल्वदेशाचा राजा होता. त्याच्या भाऊबंदांनीं त्याचें राज्य हरण करून त्याला वनांत हाकून दिलें होतें. तेव्हापासून ते अरण्यांत गरिबीमध्ये दिवस कठीण होतें. सत्यवान आपल्या प्रेमळ वर्तनाने आईबापांचें दुःख हलकें करीत असे.

सत्यवान सध्यां गरिबींत असला, तरी तो क्षत्रिय राजकुळांतच जन्मलेला आहे असें कळतांच सावित्रीला फार आनंद झाला; तिनें याच्याशींच विवाह करावयाचा, असा मनाने निश्चय केला. ती आपल्या नगराकडे परत आली.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ज्या दिवशीं सावित्री परत घरीं आली, त्या दिवशीं जगभर संचार करणारे नारदमुनि येऊन तिच्या पित्याशीं बोलत बसले होते.

इतक्यांत तेथे सावित्री आली व पित्यास आणि नारदास नमस्कार करून उभी राहिली. राजाने विचारलें, "बाळे! तूं कोणता पति पसंत केलास तें सांग नारदमुनींना." सावित्री म्हणाली, "मीं द्युमत्सेनाचा पुत्र सत्यवान यांना पति मानते आहे."

सत्यवानाचें नांव ऐकतांच नारद चपापले अश्वपतीने विचारलें, "महाराज, आपण असे चपापला कां? तिने पसंत केलेला कुमार अकुलीन व दुर्गुणी तर नाही ना!"

नारद म्हणाले, "राजा, तसें नाही, पण-पण त्या कुमाराबरोबर हिनें विवाह करूं नये हें बरें. तो अल्पायुषी आहे. आजपासून बरोबर एक वर्षाने त्यास मृत्यु आहे."

हें ऐकून राजा घाबरला व म्हणाला, "सावित्री, मग तूं दुसरा पति पाहावास हें बरें." सावित्री म्हणाली, "पिताजी, नारद म्हणतात तें खरें असलें, तरी आता माझा निश्चय बदलणें शक्य नाही. मीं त्यांना मानाने वरिलें आहे. ते माझे पति झालेच आहेत. आर्यस्त्रीच्या मनांत एकां पतीखेरीज अन्य पुरुषांचा विचार स्वप्नींहि येणें शक्य नाही."

नारद म्हणाले, "राजा, हिचा निश्चय अढळ आहे. जें होणार असेल तें चुकत नाही. तूं सत्यवानाशींच इचा विवाह कर."

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अखेरीस राजानें सावित्रीचा विवाह सत्यवानांशीं संमति लावून दिला.

प्रश्न

(१) स्मृति चांचणीः—(१) वडिल माणसें विवाहित स्त्रियांना कोणता आशीर्वाद देतात ? कां ?

(२) सावित्रीने कोणता पति पसंत केला ? कां ?

(२) कारणें सांगाः—(१) नारदाचें भाषण ऐकून राजा घाबरला. कारण—

(२) सत्यवानाचें नांव ऐकतांच नारद चपापले. कारण—

धडा ५६ वा

सती सावित्री

भाग २ रा

लग्न होतांच सावित्रीने राजभूषणें टाकून गरिबीचा पोशाक केला व द्युमत्सेनाच्या झोपडींतील सर्व कामें ती हौसेने करूं लागली. सासू, सासरा व पति यांच्या सेवेंत ती आनंदाने राहूं लागली.

सत्यवानाच्या प्रेमळ सहवासांत तिचे दिवस फार आनंदांत

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

जात होते. त्याच्या मृत्यूची तिथि जवळ येत चालली तशी तिच्या मुखावर चिंतेची छाया दिसूं लागली. तरी तिनें कोणास ती दिसूं दिली नाही. त्यांच्याशीं बोलतांना ती आपली मुद्रा सदोदित प्रसन्न अशीच ठेवी !

शेवटीं त्याचा घातवार तीन दिवसांवर आला. त्या तीन दिवसांत तिने पतीचा अपमृत्यु टाळावा म्हणून व्रत करून कडकडीत उपोषण सुरू केलें.

अखेरीस तो काळदिवस उजाडला ! आज सत्यवाना-संनिध सारखें राहावयाचें; त्याला सोडून दूर राहावयाचें नाही, असें तिने ठरविलें. सत्यवान, "होमासाठीं समिधा (पिंपळाचीं लांकडें) आणावयास, रानांत गेला. त्याच्या बरोबर सावित्रीहि गेली.

लाकडें तोडतां तोडतांच सत्यवानाचें कपाळ भयंकर दुखं लागलें व त्यास भोवळ आल्यासारखें वाटलें. तो म्हणाला, "मला अंमळ पडावेंसें वाटतें." सावित्रीच्या मांडीवर डोकें टेकून तो पडला. पण लगेच त्याची शुद्धि गेली व श्वास मंद चालूं लागला. सावित्रीने ओळखलें की, आली आपल्या पतीची अखेरची वेळ ! इतक्यांत एक भव्य व तेजःपुंज पुरुषाची आकृति दिसली. त्याच्या हातांत एक पाश होता.

यम हा आपल्या पाशाने माणसांचे प्राण आकर्षण करून नेतो, असें सावित्रीने ऐकलें होतें. तेव्हा हा च तो यमराज होय हे तिने ताडलें. पति मरणाने ती दुःखी झाली होती. तथापि

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

तिने धैर्य धरून यमास विचारलें, "महाराज, आपण कोण आहां व काय करीत आहां ?" यमाने आपला येण्याचा उद्देश सांगितला व तो सत्यवानाचे प्राण घेऊन जाऊं लागला.

सावित्री यमाच्या मागोमाग निघाली. यमानें मागें वळून पाहिलें व तो म्हणाला, "मुली, कशाला येतेस माझ्या मागें ?



घरीं जा व मृताच्या आत्म्यास शांति मिळावी म्हणून श्राद्धादि विधि कर.'

सावित्री म्हणाली, "महाराज, स्त्रियांचें पति हेंच दैवत

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आहे. तो जिकडे जाईल, तिकडे पत्नी जाईल. तिला दुसरी गति नाही."

सावित्रीच्या पतिभक्तीमुळे यमराज संतुष्ट झाले. तो म्हणाला, "बाळे, एक पति सोडून बाकीच्या कोणत्याहि बाबतींत तूं मला वर माग. मी देण्यास तयार आहें."

सावित्रीने प्रथम पित्याला मुलें, नंतर सासऱ्याला डोळे व राज्य मागितलें.

यम म्हणाला, "ठीक आहे. मिळेल तें त्याला. जा आता परत." तरीहि सावित्री त्याचा पिच्छा सोडीना. यमाने आणखी एक वर देऊं केला. तेव्हा ती म्हणाली, "मला सत्यवानापासून शंभर पुत्र होतील, असा आशीर्वाद द्यावा." यम "तथास्तु," असें म्हणून पुढें जाऊं लागला. तेव्हा सावित्री म्हणाली, "यमराज, आपल्याला धर्मराज असें म्हणतात व सत्यनिष्ठेबद्दल आपला लौकिक आहे. आपण दिलेला वर खोटा होतां कामा नये. आपण मला सत्यवानापासून शंभर पुत्र होतील असा आशीर्वाद दिला व माझ्या पतीस आपण घेऊन चाललां, हें कसें ?"

या प्रश्नाने यमराज गोंधळला. या पतिनिष्ठ व बुद्धिमान स्त्रीने आपणास शब्दांत पकडलें, हें त्याने ओळखलें शेवटी तो म्हणाला, "मुली, कमाल आहे तुझ्या चातुर्याची ! आपल्या पतिप्रेमाने तूं मला जिंकलेंस. सोडतों मी तुझ्या पतीला. त्याच्या सहवासांत तूं दीर्घकालपर्यंत सुखाने रहां, असा माझा आशीर्वाद आहे."

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सावित्रीने पूज्यभावाने यमराजास नमन केलें. सावित्री पतीच्या शवाजवळ परत आली. हळू हळू सत्यवानाचे डोळे उघडले. तो म्हणाला, "किती वेळ मला झोप लागली ही! तूं मला जागें कसें केलें नाहीस ? उशीर होईल ना घरीं जाण्याला !"

सावित्रीने खरा प्रकार सत्यवानास सांगितला. तेव्हा आपणास यमाच्या पाशांतून सोडविणाऱ्या पत्नीबद्दल त्याला किती अभिमान वाटला असेल बरें ?

सावित्रीच्या पतानिष्ठेमुळेच तिचें नांव अजरामर झाले आहे. भारतकन्या हें सावित्री-चरित्र सदोदित दृष्टीसमोर ठेवतील काय ?

प्रश्न

(१) कारणें लिहाः—(१) सावित्रीने राजभूषणें टाकून दिलीं. कारण.....

(२) भारतकन्यांनी हे सावित्रीव्रत सदोदित दृष्टी-समोर ठेवावें. कारण.....

(२) स्मृति चांचणीः—(१) सावित्रीचें चरित्र लिहा. (२) हिंदुस्त्रिया सावित्रीचें व्रत कां करितात ? (३) सावित्रीव्रत कोणत्या महिन्यांत येतें ? (४) या व्रताचे दिवशीं वडाची पूजा कां करतात ?.....

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

धडा ५७ वा

जन्मभूमि

पोटासाठी भटकत जरी दूरदेशीं फिरेन,
मी राजाच्या सदनिं अथवा घोर रानीं शिरेन;
नेवो, नेतें जड तनुस या दूरदेशास दैव,
राहे चित्तीं प्रिय मम परी जन्मभूमी सदैव ॥ १ ॥
या संसारीं जरि निजशिरीं वाहतों क्लेशराशी
चिंताज्वाला निशिदिनीं जरी जाळिती मन्मनासी;
होतें जेव्हा स्मरणचि तुझें, जन्मभूमी ! क्षणैक
तेव्हा शांत स्थिर मन कसें होतसे, जाय दुःख ॥ २ ॥
जेथे माझें जनन घडलें पूर्वपुण्यें च थोर,
जेथे गेले दिवस असतां बाळ सौख्यांत फार;
जेथे होते करित वसती पूर्वज प्रेमभावें
कां त्या भूमीप्रति चिर न म्यां पूज्यभावें स्मरावें ? ॥ ३ ॥
निःसत्त्व गे जरि तुला म्हणतील लोक
मानीन मी लवहि त्यांस नसे विवेक;
लक्ष्मीस देइ जननाप्रति वारिराशी
सेवार्थ तो सतत सिद्ध तुझ्या पदांशीं ॥ ४ ॥

वासुदेवशास्त्री खरे

प्रश्न

(१) स्मृति चांचणीः—(१) कवीने कोणत्या मातृभूमीचें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वर्णन केलें आहे ? (२) कवीची मातृभूमि निःसत्त्व नाही हें सिद्ध करा. (३) पोटासाठी दूरदेशांत असलों तरी मातृभूमीची आठवण येते तो कां ?

धडा ५८ वा

हा हिंद देश माझा !

आनंदकंद ऐसा । हा हिंद देश माझा ॥ ध्रु० ॥
सत्यासि ठाव देई । वृत्तीस ठेवि न्यायी ।
सत्त्वासि मानि राजा । हा हिंद देश माझा ॥ १ ॥
जगदीश जन्म घेई । पदवीस थोर नेई ।
चढवी स्वधर्म साजा । हा हिंद देश माझा ॥ २ ॥
जनकादि राजयोगी । शुक वामदेव त्यागी ।
घुमवीति कीर्तिबाजा । हा हिंद देश माझा ॥ ३ ॥
दमयंती जानकी ती । शीलास भूषवीती ।
नटली नटेश गिरिजा । हा हिंद देश माझा ॥ ४ ॥
विश्वास मोह घाली । ऐसी मुकुंदमुरली ।
रमवी जिथे निकुंजा । हा हिंद देश माझा ॥ ५ ॥
गंगा हिमाचलाची । वसती जिथें सदाची ।
होऊनि राहि कलिजा । हा हिंद देश माझा ॥ ६ ॥
पृथुराज, सिंह, शिवजी । स्वातंत्र्यवीर गाजी ।
करिती रणांत मौजा । हा हिंद देश माझा ॥ ७ ॥

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

तिलकादि जीव देहीं। प्रसवूनि धन्य होई।
मरती स्वलोककाजा। हा हिंद देश माझा॥ ८॥
जगिं त्याविना कुणीही। स्मरणीय अन्य नाही।
थोरांत थोर समजा। हा हिंद देश माझा॥ ९॥
पूजोनि त्यांसि जीवें। वंदोनि प्रेमभावें।
जयनाद हाचि गर्जा। हा हिंद देश माझा॥ १०॥

आनंदराव टेकाडे.

प्रश्न

(१) स्मृति चांचणीः—(१) माझा हिंद देश कसा आहे, सविस्तर वर्णन करा. (२) हिंददेशांत कोणकोणते स्वातंत्र्यवीर झालें आहेत ?

(२) टिपणें लिहाः—जनक, शुक, वामदेव, दमयंती, जानकी, पृथु, सिंह, शिवजी, तिलक.....

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

परिशिष्ट

कवितांच्या स्पष्टीकरणार्थ टीपा

धडा ६ वा. उद्योग व नशीब

संपन्न–श्रीमान्. दुर्बळ–अशक्त, पण या ठिकाणीं दरिद्री असा अर्थ घ्यावा. ओंगळ–घाणेरडा. अधमाधम–अत्यंत नीच. हे.....गति–हा सर्व गुणांचा परिणाम. यदर्थी–या बाबतींत. संदेह–संशय. करंटा–अभागी, कमनशिबी. प्रपंच–व्यवसाय, संसारांत उपयोगी पडणारा कामधंदा. केल्यावेगळें–केल्याशिवाय. दुश्चित्तपणा–दुर्लक्ष, हयगय. थारा–ठिकाण, जागा. दुश्चित्तपणाचा थारा मोडावा–अंगीं आळस, हयगय यांना थारा देऊं नये.

धडा १२ वा. सीतागीत

वियोग देऊनी–आम्हांला सोडून. रिघालों–शिरलों. धामीं–घरीं. मृषा–खोटें. भागें–थकत असें. विलोकिती पाहतात. धणी–लाभ, प्राप्ति. तुटीं–कमीपणा. महादेव—ईश्वर, शंकर. चित्तवृत्ति–मन. कर्णनासाछेद–कान, नाक कापणें. वेदशास्त्रार्थज्ञ–वेद व शास्त्रें याचा अर्थसमजणारे, शाहाणे. क्रुद्ध–रागावलेला. पापिष्ठ–अत्यंत पापी. पिष्ट–पीठ. घ्राण–नाक. मायामृग–कपटानें हरिणाचें रूप घेतलेला मारीच राक्षस. स्वर्ण–सोनें. लेखिला–वाटला. परिणामीं–शेवटीं. जगदेकशूर–जगांतला एकच शूर पुरुष, अर्थात् त्याच्या तोडीचा शूर पुरुष नाही

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

असा. मोकलीला-सोडला. विदारी-फाडलें. स्वामीवाणी-माझ्या पतीसारखी. कंप-भीतीने कापणें. माया-कपट, लबाडी. शब्दरोपें-शब्दरूपी बाणांनीं, कडक भाषणानें. वांछितोसी-इच्छा करतोस. अग्रज-वडील भाऊ. माझ्या.....लावावया-मीं तुझी बायको व्हावें या हेतूने. पादत्राण-जोडा किंवा वहाण. शिरीं...वाहे-हलक्या माणसाला मोठेपणाचा मान कसा मिळेल ? मूर्तिमंत-प्रत्यक्ष. नरकींचा जाच-नरकलोकांत भोगावा लागणार त्रास. दापितां-रागें भरलें असतां. सध्यांफळ झालें-तावडतोब फळ मिळालें. छद्म-कपट. लेखा-शक्ति, योग्यता. महाकाय-मोठें आहे अंग ज्याचें असा. दशमुख-रावण. हरी तो-पळवतो. कोमेला-दुःखी झाला.

धडा १७ वा. शबरीगीत

सुखस्यंदी-ज्यांतून सुख वाहात आहे असा. उन्माद-वेड. दोष-चुका, अपराध.

धडा २३ वा. स्फुट अभंग

स्फुट-फुटकळ, एकाचा दुसऱ्याशीं संबंध नाही असे.

(१) रसाळ-गोड. आत्मा-अनुभवीं-ईश्वराच्या साक्षात्कारानें. चोखाळिल्या-शुद्ध, पवित्र केल्या. आत्मा...वाटा-ज्याचें मन ईश्वरचिंतनाने पवित्र झालें आहे.

(२) अंगें-स्वतः. दासत्व-नोकरी. किंकर-चाकर.

(३) आत्मखूण-ईश्वराची ओळख पटल्याची खूण. मैंद-कपटी, ढोंगी.

(४) इक्षुदंड-ऊस. गर्दभ-गाढव. अश्व-घोडा.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

धडा २७ वा. बालवीराची प्रतिज्ञा

शुद्धशील-पवित्र, निर्मळ स्वभाव. एकनिष्ठ-एकावरच निष्ठा (भक्ति) आहे असा. एकनिष्ठ राहीन-त्यांची इमानें इतबारें सेवा करीन. सान-लहान निरपेक्ष-फायद्याची आशा न बाळगतां. प्रसन्न मनाने-आनंदाने. व्यय-खर्च.

स्पष्टीकरणार्थ टीपा-पुरवणी.

धडा ३० वा. चिमणा सरदार

चिमणा-लहानसा. रणीं-लढाईवर. सर्वे-बरोबर. दृढ-बळकट. ढाल-तलवारीचा वार अंगास लागूं नये म्हणून आपल्या समोर धरतात ती वस्तु. प्यारा-लाडका. कलिजा-काळीज. वतन-सरकारी काम करण्याबद्दल दिलेलें कायमचें उत्पन्न. नरवीर-पराक्रमी पुरुष. बापसे सवाई-बापापेक्षा अधिक.

धडा ३६ वा. स्फुट श्लोक

(१) वानोंत-स्तुति करोत. सुनीतिमंत-नीतीने चालणारे लोक. कमला-लक्ष्मी, संपत्ति. युगांतीं-युग म्हणजे एक फार लांबलचक काळ, त्याच्या शेवटी; अर्थात् पुष्कळ दिवसांनी. सन्मार्ग-चांगला रस्ता, चांगलें आचरण.

(२) योजी हिताप्रति-हितकर गोष्टी करावयास लावतो. व्यसन-संकट.

(३) श्रुत-विद्या. श्रोत्र-कान. कुंडल-कानांतील एक दागिना. पाणि-हात. आनें-दुसऱ्या पदार्थानें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

(४) कष्टदशा-वाईट अवस्था. पोत-जळता काकडा. ज्वाला-आगीचा लोट. उफाळे-उसळते, वर येते.

(५) जलद-ढग. नीर-पाणी. विभव-ऐश्वर्य, संपत्ति. उपकारपर-लोकांवर उपकार करणें हाच ज्यांचा स्वभाव आहे असे लोक.

धडा ४१ वा. अन्योक्तिसंग्रह

अन्योक्ति-एकाला उद्देशून लिहिलेल्या कवितेचा अर्थ जेव्हा दुसऱ्याला लागूं पडतो तेव्हा त्या कवितेस अन्योक्ति म्हणतात. या धड्यांतील पहिल्या श्लोकांत कुत्र्यासंबंधीं जें म्हटलें आहे, तें हांजीहांजीखोर लाळ घोट्या मनुष्यास लागूं पडतें; त्याच-प्रमाणे दुसऱ्या श्लोकांत बगळ्याचें जें वर्णन आहे तें ढोंगी व लबाड मनुष्याला लागूं पडतें. याप्रमाणेच इतर अन्योक्ती-विषयीं समजावें.

श्वान-कुत्रें. चार-चेष्टा. जठरार्थ-पोटाकरितां. आळवून-मनधरणी करून. हस्तिप-माहूत. बढाई-मोठेपण, बडेजाव. तपश्चर्या-पुण्य मिळविण्याकरितां शरिराला कष्ट देणें. बक-बगळा. अमति-मंद बुद्धीचे, मट्ठ. ज्ञाते-जाणते. लवलाहीं-चटकन. छावा--छोकरा. मदमत्त-उन्मत्त झालेला, पिसाळलेला. प्रकृति-स्वभाव. तमारी-सूर्य. संकल्प-बेत. कोशगत-कमळा-च्या गाभ्यांत अडकलेला. भृंग-भुंगा. पद्मास-कमळाला. शश-ससा. गजमुक्ताफळकवळ-हत्तीच्या डोक्यांतील मोत्यां चा घास. हत्तीच्या मस्तकांत मोतीं सापडतात असा पूर्वीच्या लोकांचा समज असे. भक्षिता-खाणारा.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

धडा ४९ वा. केवढें क्रौर्य हें !

स्तिमित–मिटलेली, झाकलेली. झापडी–अंधेरी. रुधिर–रक्त. कोटर–घरटें. शिशु–मूल. अंतिचा–शेवटचा. कवळ–घांस. जतन–रक्षण. कृतघ्न–उपकार न स्मरणारा. क्षणैक–एकक्षणभर. नय–न्याय. दयाघन–[घन–मेघ, ढग]–मेघ जसे पाण्याचा वर्षाव करतात, तसा दयेचा वर्षाव करणारा, ईश्वर. सुशय्या–चांगला बिछाना. द्विजा–पक्षीण. भू–जमीन. उत्पल–कमल (कमळासारखी नाजुक पक्षीण). उदर–पोट. पांडुर–पांढरें. निष्कलंक–स्वच्छ. निमाले–संपले, नाहींसे झाले.

धडा ५४ वा. गुराख्याचें गाणें

स्फटिक–काचेसारखा स्वच्छ व पारदर्शक दगड. पांवा–बांसुरी. मोरमुकुट वन्सीवाला–मोराच्या पिसांचा मुकुट घातलेला श्रीकृष्ण. अखंड–सदोदित. दंड–काठी. कुवासना–नांदतात वाईट बुद्धि; श्रीमंतांच्या महालांतच दुष्ट वासना, दुष्टवासना. असें कवि म्हणतो.

धडा ५७ वा. जन्मभूमि

सदन–घर. तनु–शरीर. क्लेशराशी–दुःखांचे ढीग; अनेक दुःखें. चिंताज्वाला–काळजी हीच आग, तिची ज्वाला. जनन–जन्म. निःसत्त्व–जींत कांही सत्त्व (उपयोगी भाग) नाहीं अशी. विवेक–विचार. वारिराशी–समुद्र. लक्ष्मीस...पदांशीं–कवीची जन्मभूमि कोंकणप्रांत होता. त्याच्या शेजारीं समुद्र आहे हें प्रसिद्धच आहे. पूर्वी देवी राक्षस यांनी समुद्राचें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मंथन केलें, त्या वेळीं त्यांतून लक्ष्मी निघाली, अशी कथा पुराणांत आहे. तिचा येथें उल्लेख आहे. लक्ष्मीला जन्म देणारा समुद्र जिच्या शेजारीं आहे ती भूमि निःसत्त्व कशी असेल? असा कवीचा मतलब आहे.

धडा ५८ वा. हा हिंद देश माझा !

कंद-मूळ, गड्डा. आनंदकंद-आनंदाचें मूळ, उगमस्थान. ठाव-जागा, आश्रय. सत्त्व-सरळ व बाणेदार वर्तन. जगदीश जन्म घेई-ईश्वर अवतार घेतो. पदवी-योग्यता. साजा-चांगला, योग्य. जनकादि राजयोगी-राजा असून योग्या-प्रमाणें निरिच्छ असणारे जनकासारखे लोक. त्यागी-सर्व सुखाचा त्याग करणारे संन्यासी. दमयंती, जानकी (सीता) हीं पवित्र साध्वी स्त्रियांचीं उदाहरणें होत. नटेश-शंकर. गिरिजा-पार्वती. विश्व-जग. मोह घाली-वेड लावी; जादूनें भारल्याप्रमाणें करून सोडी. मुकुंद-श्रीकृष्ण. निकुंज-वेलीचा मंडप. हिमाचल-हिमालय पर्वत. कलिजा-काळीज; अत्यंत आवडती वस्तु. पृथुराज-पृथ्वीराज चव्हाण, दिल्ली-अजमीरचा राजा. सिंह-चितोडचा प्रख्यात राणा प्रतापसिंह. शिवाजी-मराठी राज्याचा संस्थापक. हीं सर्वशूर योद्ध्यांचीं उदाहरण आहेत. गाजी-धर्मासाठीं प्राण देणारा वीर. तिलकादि-श्रीयुत बाळ गंगाधर टिळकांसारखे. काज-कार्य, काम. मरती-आपला देह लोककल्याणार्थ झिजवितात. स्मरणीय-स्मरणकरण्यास योग्य.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सुलभ वाचनपाठमाला

मराठी चवथें पुस्तक

सी. पी. अँड बरार एज्युकेशनल बुकडेपो,
जबलपूर, नागपूर, अमरावती.

Weight & quality of paper .... 28 lbs. White Printing

Size of paper .... 20"×30"

Weight of cover paper .... 60 lbs.

Price .... -/5/9

Printed by B. B. Kapur at the N. K. Press, Lucknow.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar